मेहता मराठी ग्रंथजगत

अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला
वाहिलेले
दर्जेदार मासिक

◆ मे, २०१५ ◆
◆ किंमत १५ रुपये ◆

मूळ किंमत रु. ६४०/-

ग्राहकांसाठी प्रकाशन पूर्व नोंदणी किंमत - रु. ५४०/-

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सदस्यांसाठी
प्रकाशन पूर्व नोंदणी
किंमत - रु. ४२५/-

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे
जेष्ठ विनोदी साहित्यिक, कथाकथनकार
प्रा. द. मा. मिरासदार यांचा ८९ वा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या प्रसंगी **मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे**
प्रा. द. मा. मिरासदार यांच्या गाजलेल्या साहित्यकृतींचं
दर्शन घडवणारे छायाचित्र त्यांना भेट देण्यात आले.

मेहता मराठी ग्रंथजगत

। मे २०१५ । वर्ष पंधरावे । अंक पाचवा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
साहित्यवार्ता	८
पुरस्कार	३४
संमेलन वार्ता	४०
पुस्तक परिचय	
सचिन तेंडुलकर	५०
नानक निरंकारी कवी	६२
मृत्यूचं अमरत्व	७०
श्रद्धांजली	८८
बालनगरी	९३

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सुपरहीरोंची स्पर्धा

मे महिन्याचा अंक हा बालसाहित्याला प्राधान्य देणारा असावा असा आमचा प्रयत्न असतो. दरवेळी ते जमतेच असे नाही. मुलांना प्रिय असणाऱ्या सुपरमॅनसारख्या कॉमिक्सच्या हीरोंबद्दलचे आकर्षण स्थलकालाच्या मर्यादा जुमानत नाही असा अनुभव येतो. असं सुपरहीरो आपले लेखक निर्माण करण्यात कमी पडतात.

स्पायडर मॅन, सुपरमॅन, बॅटमन या खरे तर कॉमिक्स बुक्समधील व्यक्तिरेखा. परंतु आज त्या जगभरच्या मुलांना आपल्या घरातल्याच एखाद्या सदस्यासारख्या जवळच्या वाटतात. त्यांच्या कॉमिक्सममधल्या पराक्रमांनी, साहसांनी आबालवृद्ध स्तिमित होतात. हे कॉमिक्सचे नायक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी शक्य करून दाखवतात. या प्रत्येक हीरोचा पोशाख वेगळा असतो; त्याला अवगत असणाऱ्या सिद्धी वेगळ्या असतात. शत्रूशी लढण्याची त्याची शैली वेगळी असते. आपल्याला एखाद्या गुंडाबद्दल, मवाल्याबद्दल किंवा सत्तास्थानी असलेल्या जुलूम करणाऱ्या व्यक्तीबद्दल खूप चीड आली तरी आपणास निमूट बसून राहावे लागते; तेच काम सुपरहीरो चुटकीसरशी करून दाखवतो. एका परीने ही आपल्या अतृप्त इच्छेचीच पूर्तता होत असते. त्यामुळे त्या सुपरहीरोबद्दल आपल्याला आकर्षण वाटते. १९३०साली अमेरिकेत आर्थिक मंदीच्या काळात माणसे हवालदिल झाली होती. त्यावेळी त्या खचलेल्या, उदासीन अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी अशा महापराक्रमी व्यक्तिरेखांच्या साहसांनी मनाला उभारी आणण्याचा नकळत प्रयत्न झाला. त्याला मुलांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. पालकांनीही दाद दिली. त्यांनाही या सुपरहीरोच्या रूपात इच्छापूर्तीचा एक पर्याय उपलब्ध झाला. सुपरहीरोचे बलदंड शरीर, त्याच्या

अंगी असणाऱ्या वेगवेगळ्या सिद्धी, त्याच्यातील देशप्रेम वगैरे गुणविशेष या सर्वांचा संकलित प्रभाव सकारात्मक होई. सुपरहीरोचे शरीर हे त्यांचे खरे वैभव. सुपरचार्ज केल्यासारखे, कोणालाही भुरळ घालणारे, सौष्ठवपूर्ण असे त्याचे व्यक्तिमत्त्व ह्यांच्याशी आयडेंटिफाय होणे प्रत्येकाला शक्य होई.

कॉमिक्सच्या स्वरूपात नियमितपणे दर आठवड्याला किंवा महिन्याला घरोघर पोचणाऱ्या सुपरहीरोच्या चटकदार साहसकथांनी बालवाचक तर खूश होतच, त्यांचे पालकही त्यात रस घेत. आपल्या मुलांपुढे चांगले आदर्श असावेत ही त्यांची अपेक्षा कॉमिक्सच्या माध्यमातून सहजपणे पूर्ण होई.

कॉमिक्सचे निर्माते आणि प्रकाशक आपली कॉमिक्स अधिकाधिक वाचनीय, दर्शनीय आणि रोमांचकारक, नाट्यपूर्ण व्हावीत याबद्दल कटाक्ष बाळगतात.

कॉमिक्समधील सुपर हीरोंवर पुढे चित्रपट निघू लागले. तेही प्रेक्षकांना आकृष्ट करू लागले. तुफान उत्पन्न देऊ लागले.

कॉमिक्सच्या व चित्रपटांच्या अनुषंगाने इतर व्यावसायिक आपापले उद्योगधंदे वाढवू लागले.

सुपरहीरोचा पोशाख वैशिष्ट्यपूर्ण असतो. काही रेडिमेड कपडे बनवणाऱ्या उत्पादकांनी फॅशन डिझाइनर्सची मदत घेऊन सुपरमॅनच्या पोशाखात बदल सुचवले. नव्या फॅशनचे कपडे त्याला वापरायला लावले. तसे ड्रेस आपल्यालाही हवेत असे मुलांना वाटू लागले. त्यामुळे स्पायडरमॅन, सुपरमॅन, बॅटमॅनसारखे पोशाख दुकानात विक्रीसाठी येऊ लागले. या सुपरहीरोजवर आधारित खेळांची व क्रीडासाहित्याची निर्मिती होऊ लागली. त्यांच्या पोस्टर्सच्या भिंती भरू लागल्या. स्पायडरमॅनची वेगवेगळ्या आकारातील पोस्टर्स, प्रतिमा, बाहुल्या, खेळणी अशा उत्पादनांना चालना मिळाली. मुले त्यासाठी हट्ट करू लागली. पालकांना ती खेळणी घेणे भाग पडत गेले.

कॉमिक्स बुककडे एकेकाळी तुच्छतेने पाहिले जाई. कल्पनेच्या स्वैरभराऱ्या असणाऱ्या अवास्तव कथा म्हणून त्यांची बोळवण केली जाई; परंतु त्यांच्यावर निघालेल्या भव्य आणि अफलातून चित्रपटांनी या सर्व हीरोंना जित्याजागत्या व्यक्तीइतकेच सत्य बनवून पेश केले. त्यांच्या सुखदुःखाशी, त्यांच्या पेचप्रसंगांशी आपले नाते जडवले. त्यामुळे कॉमिक्समधील हे सर्व नायक खऱ्याखुऱ्या हीरोपेक्षाही अधिक प्रभावी ठरते. युद्धात पराक्रम गाजवणारे किंवा धारातीर्थी पडणारे सैनिक हे एका देशाचे

हीरो असतात. कॉमिक्सचे हीरो हे देशकालाच्या बंधनापलीकडे गेले. सर्वांनाच आपले वाटू लागले.

सुपरमॅन हा बंदुकीच्या गोळीपेक्षाही वेगाने धावू शकतो. हवेत उंच भरारी घेऊन दूरदूरची अंतरे अल्पावधीत पार करू शकतो. पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालायला त्याला चंद्राएवढाही वेळ लागत नाही. त्याची नजर क्षकिरणांएवढी तीक्ष्ण असते. त्याच्या अंगची ताकद पहाडांना हलवू शकते. एका हाताने तो रेल्वे उचलू शकतो. त्याला घायाळ करणारी गोष्ट एकच. ती म्हणजे क्रिप्टोनाइट स्फटिक. हा हिरव्या रंगाचा स्फटिक त्याला जायबंदी करू शकतो.

वंडर वुमन ही जानेवारी १९४२मध्ये वॉशिंग्टनच्या अंतरिक्षात अवतीर्ण होते. जन्मत:च अचाट शक्ती तिला लाभलेली असते. तीन वर्षाचे वय असताना ती कुठलेही झाड मुळासकट उपटून फेकून देऊ शकते. ती जलद धावू शकते. तिच्या मेंदूत रेडिओ बसवलेला आहे. अदृश्य रोबो विमान ताशी ५००मैल वेगाने उडवू शकते.

एका रेडिओ ॲक्टिव्ह (अणूभारित) कोळ्याने दंश केल्यावर पीटर पार्कर हा तरुण एकदम सुपरहीरो बनतो. तो कोळ्याप्रमाणे कशावरही चढू शकतो. भिंतीवर, इमारतीवर चढणे हा त्याला हातचा खेळ वाटतो. आपले जाळे पसरून तो कोणालाही पकडू शकतो. गरजेप्रमाणे त्याला नवे हात कधीही येतात.

अशा कॉमिक्स बुकच्या जगातल्या हीरोंनी सध्याच्या मुलामुलींच्या कल्पनाशक्तीत अभेद्य स्थान मिळवले आहे आणि चित्रपट निर्माते, खेळण्यांचे तसेच कपड्यांचे उत्पादक, टी-शर्ट उत्पादक, फॅशन डिझाइनर्स वगैरे त्यांचा उपयोग करून घेऊन प्रचंड कमाई करीत आहेत.

बॅटमन, स्पायडरमॅन, सुपरमॅन, आयर्नमॅन वगैरे चित्रपटांसाठी कोट्यवधी डॉलर्स खर्च करून भव्य सेटस् तयार करण्यात आले. त्यांचे खास पोशाख तयार करण्यात आले. त्यांचे जतन करण्यासाठी मेट्रॉपॉलिटन म्युझियम ऑफ सुपरहीरोज फॅशन अँड फॅन्टसी हे एक नवे संग्रहालय सुरू करण्यात आले आहे. अँड्र्यु बोल्टन हे त्याचे क्युरेटर आहेत. कॉमिक्स बुक्समधील पोशाखांचे नमुने त्यात ठेवण्यात आले आहे. त्या हीरोंशी संबंधित वस्तूही बघायला मिळतात. बॅटमन चित्रपटासाठी साठ प्रकारचे ड्रेस तयार करण्यात आले होते. ते सर्व या संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत.

या कॉमिक्सबुक हीरोजना देशोदेशीची मुले आपला हीरो मानतात. हे

हीरो मुख्यत: अमेरिकन आहेत; आणि अमेरिकेतील कॉमिक्सच्या निर्मात्यांनी वर्षानुवर्षे प्रसिद्धीचा झोत त्यांच्यावर पडत राहावा म्हणून प्रयत्न करून त्यांना जनमानसात स्थानापन्न केले आहे.

परंतु हे बहुतेक हीरो अमेरिकन असावे हे काही लोकांना आता खटकू लागले आहे. आपल्या देशातला आपला स्वतंत्र हीरो कॉमिक्समध्ये आपल्या मुलाबाळांना बघायला मिळायला हवा असे त्यांना वाटते.

फ्रेंचांनी याबाबत आघाडी मारली आहे.

तेवीस वर्षे वयाच्या डेव्हिड टोमास झेवस्की याने वेन्डोम नावाच्या फ्रेंच हीरोला जन्म दिला आहे. मोठमोठ्या इमारतींवरून लीलया उड्डाण करणारा हा हीरो. त्याला व्हेन्डोम हे नाव पॅरिसमधला रिट्झ हॉटेलजवळच्या एका चौकावरून देण्यात आले आहे. कॅप्टन मार्व्हलच्या कॉमिक्समधून टोमास झेवस्कीने प्रेरणा घेऊन हा चित्रपट काढण्याचे ठरवले. काही मित्रांच्या मदतीने अल्प खर्चात या चित्रपटाची निर्मिती करायची, फक्त चार दिवसात सगळे शूटिंग संपवायचे ही त्याची आरंभीची योजना होती. परंतु ते शूटिंग संपल्यावर हा पूर्ण लांबीचा चित्रपटच करायला हवा असे त्याला जाणवले आणि त्याने कथानकाला अधिक रंगतदार बनवले. त्याच्या आधीच्या छोट्या चित्रपटालाच अधिक व्यापक रूप देण्यात आले आहे. आपली छोटी फिल्म त्याने इंटरनेटवर टाकली. तिला लाखो प्रेक्षकांनी पसंतीची दाद दिली. बॅटमन आणि स्पायडरमॅन यांच्या मालिकेत बसणारा हा हीरो ढगळ काळा झगा घालतो. तो लॅटेक्सचा बनवलेला आहे. हा हीरो क्वासीमोडोशी झुंज देतो. तसेच नोत्रेदाम या पॅरिसमधील चर्चच्या घंटा-शिखरावर बसलेल्या संतापाने लाल झालेल्या अवाढव्य अग्निसर्पाशी लढून एस्लेराल्डा या तरुणीची सुटका करतो.

फ्रेंचप्रमाणे आता देशोदेशीचे सुपरहीरोही अवतार घेऊ लागतील.

कॉमिक्स बुक्सची मागणी वाढत आहे. आपल्याकडील हनुमान, जय गणेश, बाल भीम वगैरे कॉमिक्स (ॲनिमेशन फिल्म्स) इंग्लंड अमेरिकेतही चांगली कमाई करीत आहेत. आणखी काही हीरो आपणही निर्माण करू शकू. इतर देशही त्या दिशेने प्रयत्न करीत राहणारच. एकूण जागतिकीकरणात आपणही मागे राहता कामा नये.

पायरेटेड पुस्तकांचा सुळसुळाट

गाजलेल्या मराठी पुस्तकांच्या बनावट प्रती (पायरेटेड) अल्प किमतीत विकणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आश्वासन पोलिस वरचेवर देत. परंतु, या पुस्तकांची प्रमुख रस्त्यांवर विक्री सुरूच आहे. ही विक्री रोखण्यासाठी पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी प्रकाशक करत आहेत.

प्रामुख्याने जंगली महाराज रस्ता, डेक्कन, फर्ग्युसन रस्ता, डेक्कन कॉर्नर, कॅम्प या भागात अशा पुस्तकांचे स्टॉल जागोजागी आहेत. तेथे पुस्तके ५० ते ८० टक्के सवलतीत विकली जातात.

'मृत्युंजय', 'छावा', 'कोसला', 'युगंधर', 'ययाती', 'असा मी असामी', चाणक्य नीती', 'बटाट्याची चाळ', 'श्यामची आई', 'शाळा', 'बलुतं', 'उरलं सुरलं', 'फाळणीचे दिवस', 'जोगवा', 'अग्निपंख', 'द व्हाइट टायगर', 'वाइज अँड अदरवाइज', 'शक्ती' अशा पुस्तकांच्या पायरेटेड आवृत्त्या बाजारात आहेत. प्रकाशक अरविंद पाटकर म्हणाले, ''पायरसी रोखणे शक्य नाही. पण, अशी पुस्तके विकणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई केली पाहिजे. पायरसी वाढली, तर प्रकाशन व्यवसाय अडचणीत येऊ शकतो.''

गुगलला विरोध

सर्च इंजिनच्या प्राधान्यक्रमावरून युरोपियन युनियनने गुगलवर ठपका ठेवला असतानाच, आता अमेरिकेतही काही छोट्या कंपन्यांनी पुन्हा एकदा ऑनलाइन ॲडव्हर्टायझिंगसाठी गुगल अँड्रॉइडचा गैरवापर करीत असल्याचा आरोप केला आहे. या कंपन्यांनी अमेरिकेच्या कायदा विभागाकडे दाद मागितली आहे. त्यामुळे युरोपपाठोपाठ अमेरिकेतही गुगल संकटात सापडण्याची शक्यता आहे.

गुगलविरोधातील लढ्यासाठी मायक्रोसॉफ्ट, एक्पीडीया आणि नोकिया ऑवायजे या कंपन्यांनी 'फेअर सर्च' नावाची संघटना स्थापन केली असून आगामी काळात त्यात आणखी काही कंपन्या सहभागी होऊ शकतात. मोबाइल हॅण्डसेट्स बनविणाऱ्या कंपन्या गुगल सर्च, मॅप्स आणि गुगलच्या इतर उत्पादनांना प्राधान्य देतात, असा आरोप करण्यात आला आहे.

यापूर्वीसुद्धा स्वत:चीच उत्पादने इतर कंपन्यांवर लादत असल्याचा आरोप गुगलवर करण्यात आला होता. मात्र, २०१३ मध्ये यू. एस. फेडरल ट्रेड कमिशनशी एक करार केल्यानंतर गुगलचे कार्य सुरळीत सुरू होते. या वर्षीच्या सुरुवातीलाच कॅलिफोर्नियातील एका कोर्टाने गुगलविरोधातील एक याचिका फेटाळली होती. बाजारपेठेतील मक्तेदारी कायम राखण्यासाठी हॅण्डसेट बनविणाऱ्या कंपन्यांना गुगल सर्च हे डिफॉल्ट ठेवण्यासाठी सांगितले जाते. तसेच इतर स्पर्धकांची उत्पादने सर्च इंजिनवर टाकण्यास गुगल अनुत्सुक असते, असा दावा या याचिकेत करण्यात आला होता. परंतु, गुगल आणि हॅण्डसेट कंपन्यांमध्ये असा करार झाल्याची कागदपत्रे सादर करण्यात याचिकाकर्ते अपयशी ठरल्याने ही याचिका निकाली निघाली होती. गुगलचे सर्च इंजिन ग्राहकांना त्यांच्या आवडीची उत्पादने घेण्यापासून आडकाठी करीत असल्याचे सिद्ध होत नाही, असे न्यायाधीशांनी निकालपत्रात म्हटले होते.

गुगलच्या वाढत्या लोकप्रियतेचा धसका घेऊन प्रतिस्पर्धी कंपन्या आता एकत्रितपणे लढा देण्यास सज्ज झाल्या आहेत. यावेळी गुगल युरोपियन युनियनसारख्या संस्थेच्याही रडारवर असल्याने कंपनीपुढे मोठे आव्हान निर्माण होऊ शकते.

किरण बेदींच्या आयुष्यावर कॉमिक बुक

एक होतकरू टेनिस खेळाडू ते अमृतसरमध्ये दुचाकी चालविणारी पहिली तरुणी आणि एक यशस्वी पोलिस अधिकारी हा किरण बेदीं यांचा जीवनप्रवास मोठा रंजक आहे. हाच प्रवास छोट्या दोस्तांपर्यंत पोचविण्यासाठी किरण बेदींच्या दोन बहिणींनी एका कॉमिक बुकची निर्मिती केली आहे. 'टॉप कॉप' असे या पुस्तकाचे नाव असून, त्याचे ११ एप्रिलला प्रकाशित करण्यात आले.

अनेक कार्यक्रमांत विद्यार्थी आणि त्यांचे पालक एकाच आशयाचे प्रश्न विचारतात, याची उत्तरे मिळावीत या हेतूने हे कॉमिक तयार करण्यात आले

आहे. बेदी म्हणाल्या, ''तुम्ही स्वत: तुमचे 'रोल मॉडेल' व्हा. इतरांची नक्कल करण्याऐवजी त्यांच्याकडून प्रेरणा घ्या.'' रिता पेशवारिया मेनन आणि अनु पेशवारिया यांनी ते लिहिले आहे. या दोघीही बेदी यांच्या बहिणी आहेत. हे कॉमिक मराठी, हिंदी, पंजाबी, उर्दू, तमीळ, कन्नड आदी भाषांमध्ये येणार आहे.

संत गुलाबराव महाराज साहित्य संमेलन

पुण्यात आयोजित आठव्या श्री संत गुलाबराव महाराज साहित्य संमेलनाचे उद्घाटन लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या हस्ते झाले. गुलाबराव महाराज यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने भरविण्यात आलेल्या तीन दिवसीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विजय भटकर होते. उद्घाटन कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून गोविंदगिरी महाराज उपस्थित होते. या वेळी स्वागताध्यक्ष म्हणून खासदार अनिल शिरोळे यांनी प्रास्ताविक केले.

''आपण आजही अंधार युगात जगत आहोत, यासाठी गुलाबराव महाराजांसारख्या व्यक्तींचे विचार समजून घ्यायला हवेत व पुढच्या पिढ्यांनाही तसे संस्कार द्यायला हवेत,'' असे मत गोविंदगिरी यांनी व्यक्त केले. संतसाहित्याचा अभ्यास समाजजागृतीसाठी व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना संत गुलाबराव महाराज पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच, भैय्यासाहेब घटाटे लिखित समग्र गुलाबराव महाराज या चरित्रपर पाच खंडांचेही प्रकाशन करण्यात आले.

थोर व्यक्तींचे उदाहरण पाठ्यपुस्तकात मांडायचे की नाही यावरून आपल्याकडे राजकारण होते याबद्दल महाजन यांनी खंत व्यक्त केली. त्याहूनही चुकीचा इतिहास शिकवून आपण पुढच्या पिढीला संभ्रमित करत आहोत, याचीही जाणीव त्यांनी करून दिली.

''संत गुलाबराव महाराज हे स्वतंत्र प्रज्ञा असणारे तत्त्वचिंतक होते. एकाचवेळी अनेक शास्त्रांना भिडण्याची क्षमता असणारे महाराज म्हणजे एक चमत्कारच होता. साहित्य संमेलन घेण्यासाठी एकट्या गुलाबराव महाराजांचे साहित्य पुरेल, एवढी साहित्य निर्मिती त्यांनी करून ठेवली आहे. त्यांचा अधिकार मोठा होता. त्यांच्या विचारांवर चर्चा होणे आवश्यक असून, पुण्यात महाराजांचे स्मारक झाले पाहिजे.'' असे प्रतिपादन सदानंद मोरे यांनी केले.

डॉ. रंजना पत्की म्हणाल्या, ''ज्यात अद्वैत तत्त्वज्ञान आहे, असे भक्तिशास्त्र गुलाबराव महाराजांनी मांडले असून, 'सेवा, साधना आणि सख्य' असे भक्तीचे विविध भाव त्यांच्या साहित्यात दिसून येतात.''

भौतिकवाद आणि देववाद अशा दोघांच्या साहाय्याने मानवी अस्तित्वाचा खरा अर्थ उमजू शकतो. भाव आणि गुण एकत्र आले, की भक्तीचे आकलन होते. संत गुलाबराव महाराजांचे साहित्य अशाच भक्तीचे दर्शन घडविते, असे भय्यूजी महाराजांनी सांगितले.

अर्धवेळ ग्रंथपालांची स्थिती बिकट

''सत्तेत आलो, तर तुमचे प्रश्न नक्की मार्गी लावू'', असे आघाडी सत्तेत असताना आश्वासन देणारी नेतेमंडळी कुठे गायब झाली आहेत, याचा शोध राज्यभरातील अर्ध वेळ ग्रंथपाल आजपर्यंत घेत आहेत. न्यायालयाने सूचना देऊनही शासन ग्रंथपालांच्या प्रश्नांबाबत उदासीन असल्यामुळे ग्रंथपालांची अवस्था 'दीन' होत चालली आहे.

शिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी मिळावी, यासाठी २२५ पदवीधर ग्रंथपालांनी मुंबई, औरंगाबाद, नागपूर अशा उच्च न्यायालयाच्या खंडपीठापुढे याचिका दाखल केल्या होत्या. या खंडपीठांकडून ग्रंथपालांच्या बाजूने निकालही लागला. या निकालाच्या विरोधात शासनाने तीन वेळा सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तेथेही शासनाची याचिका फेटाळण्यात आली. तरीही शासनाकडून अद्याप न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. शासनाच्या या दुटप्पी धोरणाचा निषेध करत याचिकाकर्ते ग्रंथपाल सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याच्या तयारीत आहेत. यूजीसी व केंद्र शासनाच्या योजनांमध्ये ग्रंथपालाला शिक्षकाचा दर्जा दिला आहे, तर राज्य स्तरावर शिक्षकेतर कर्मचारी म्हणून ग्रंथपालांना ग्राह्य धरले जाते. २०-२२ वर्षे सेवा दिलेल्या अर्धवेळ ग्रंथपालांना वैद्यकीय प्रतिपूर्ती लाभ, घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, निवृत्तिवेतन योजना लागू केली जात नाही. असे अनेक प्रश्न वर्षानुवर्षे अनुत्तरित आहेत. तसेच राज्यातील धुळे, नंदुरबार, पुणे, बीड या जिल्ह्यांतील ग्रंथपालांसाठी एक निकष आणि राज्यांतील इतर ग्रंथपालांसाठी दुसरा निकष, असा भेदभाव करण्याचे कारणही समजत नाही असे ग्रंथपालांचे म्हणणे आहे.

चाळिशीतील 'सामना'

सहकारी साखर कारखान्यांमधील राजकारण वेगळ्याच शैलीमध्ये मांडणारा, बर्लिन चित्रपट महोत्सवात गाजलेला 'सामना' हा चित्रपट यंदा चाळीस वर्षे पूर्ण करीत आहे.

कवी रामदास फुटाणे यांनी निर्मिती केलेला 'सामना' १९७५ मध्ये प्रदर्शित झाला होता. लेखक विजय तेंडुलकर यांच्या धारदार लेखणीतून या चित्रपटाची संहिता उतरली होती. अभिनेता डॉ. श्रीराम लागू यांनी साकारलेला मास्तर, निळू फुले यांचा हिंदुराव पाटील यांच्या अभिनयाची जुगलबंदी आजही प्रेक्षक विसरलेले नाहीत. संगीतकार भास्कर चंदावरकर यांनी संगीतबद्ध केलेली 'सख्या रे घायाळ मी हरिणी,' 'या टोपीखाली दडलंय काय', 'कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे' अशी गाणी अजरामर आहेत. मराठीतील महत्त्वाच्या राजकीय चित्रपटांमध्ये 'सामना'चे नाव घेतले जाते. त्यामुळेच आजही चित्रपटांचे अभ्यासक, मास कम्युनिकेशनचे विद्यार्थी या चित्रपटाविषयी आवर्जून चर्चा करतात. चित्रपटाला चाळीस वर्षे होत असल्याचा आनंद दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी व्यक्त केला. 'आजच्या काळातही हा चित्रपट तरुणाईला समकालीन वाटतो. यातच त्याचे यश दडलेले आहे. विजय तेंडुलकरांनी किती द्रष्टेपणाने हे कथानक लिहिले होते याची कल्पना त्यावरून येते,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कलासंस्कृती परिवार या संस्थेच्या वतीने 'सामना' चित्रपटाची चाळिशी साजरी करण्यासाठी 'सामना : नाबाद ४०' या विशेष दृक्श्राव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल, अभिनेता डॉ. श्रीराम लागू, डॉ. मोहन आगाशे, निर्माता रामदास फुटाणे यांनी त्या वेळचे किस्से सांगितले.

'बालभारती'

शिक्षण खात्यामधील महत्त्वाची स्वायत्त संस्था म्हणून 'बालभारती'ने केलेल्या कामाकडे राज्य सरकारने दुर्लक्ष करणे अयोग्य आहे. केवळ नफ्यावर डोळा ठेऊन इतर संस्थांची जबाबदारी 'बालभारती'वर लादणे चुकीचे आहे, असा 'बालभारती' च्या कर्मचाऱ्यांचा पवित्रा आहे.

'बालचित्रवाणी'ची परिस्थिती खालावल्यानंतरच्या टप्प्यावर ती टिकविण्यासाठी आणि तेथील आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी बालभारतीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याची चर्चा सुरू झाली. त्यातच महाराष्ट्र

आगामी

मायकल जॅक्सन

मूळ लेखक
जे. रॅन्डी ताराबोरेली

अनुवाद
रेश्मा कुलकर्णी

किंमत - ७९५/- रु.
पोस्टेज - ५०/- रु.

विजेचा वेग धारण केलेली त्याची नृत्यशैली अद्‌भुत अशीच होती... ताल-सुरांच्या सुसाट प्रवाहात तार सप्तकातल्या त्याच्या एकाहून एक अशा सरस गाण्यांनी प्रेक्षकांच्या रोमारोमांत अनामिक बेहोबी भिनायची... त्याचा रंगमंचावरील देदीप्यमान वावर चाहत्यांच्या संवेदनाचा ताबा घ्यायचा...

अशा या 'किंग ऑफ पॉप'चा 'कलाकार' म्हणून आणि त्याच्या आयुष्यातील काही घटनांमुळे 'वादग्रस्त व्यक्ती' म्हणून करून दिलेला परिचय जितका परखड तितकाच हृदयस्पर्शी आहे.

त्याचं व्यक्तिमत्त्व वास्तव आणि दंतकथा यातील सीमरेषा धूसर करणारं आहे, ते त्यामुळेच!!!

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने 'बालभारती'कडे रॉयल्टी मागितली. या पार्श्वभूमीवर 'बालभारती'च्या कर्मचाऱ्यांनी संस्थेचे संचालक चंद्रमणी बोरकर याच्याशीही चर्चा केली.

रॉयल्टीचा प्रस्ताव मिळाल्याच्या माहितीला बोरकर यांनी दुजोरा दिला. मात्र हा प्रस्ताव मान्य वा अमान्य करण्याबाबतचे धोरण संस्थेच्या नियामक मंडळासोबत होणाऱ्या बैठकीनंतरच निश्चित होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी राज्य सरकारनेच एक समिती नेमली आहे. पाठ्यपुस्तक निर्मितीसाठी आवश्यक धोरणे ठरविण्यासाठी बैठका सुरू आहेत.

'बालभारती' मधील कर्मचाऱ्यांनी मात्र रॉयल्टीचा मुद्दा खोडून काढला. राज्यात सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी सुरू झाल्यावर 'बालभारती'ने मोठ्या संख्येने पुस्तकांची निर्मिती सुरू केली. त्यापूर्वीच्या काळात ती संख्या मोजकी होती.

'आयओटी'ला धोका

'इंटरनेट ऑफ थिंग्ज' (आयओटी) या नव्याने उदयाला येत असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर सायबर गुन्हेगारांकडून केला जाऊ शकतो, अशी भीती वेबसेन्स या सायबर सुरक्षा क्षेत्रात काम करणाऱ्या कंपनीने व्यक्त केली आहे.

'आयओटी' म्हणजे अशा उपकरणांची साखळी, की जी मानवी हस्तक्षेपाशिवाय परस्परांशी 'आयपी कनेक्टिव्हिटी'द्वारे संवाद साधते. इंटेलिजन्ट सिस्टीम्स, नेटवर्क इक्विपमेंट, कनेक्टिव्हिटी सर्व्हिसेस आणि डेटा इंटिग्रेशन या बाबींचा त्यात समावेश होतो.

'आयओटी ही कंपन्यांसाठी उद्योगातील मोठी संधी आहे; पण सायबर गुन्हेगारांपासून 'आयओटी'चा गैरवापर होण्याची शक्यता आहे. कारण आयओटी ही वाढती बाजारपेठ आहे. एकमेकांशी जोडलेल्या उपकरणांची संख्या वाढू लागल्याबरोबर त्या नेटवर्कमध्ये घुसखोरी करण्याचे आणि त्यांचा गैरवापर करण्याचे प्रयत्न सुरू होतील,' अशी भीती 'वेबसेन्स'चे प्रादेशिक संचालक सुरेंद्रसिंग यांनी व्यक्त केली. 'आतापर्यंत आयओटी नेटवर्कवर हल्ले झाले नाहीत; पण काही कनेक्टेड मेडिकल डिव्हाइसवर हल्ला करण्याचा प्रयत्न झाला होता,' असेही त्यांनी सांगितले.

'आयओटी तंत्रज्ञानामुळे प्रचंड कनेक्टिव्हिटी मिळालेली आहे. त्यामुळे

त्याच्या सुरक्षेचा विचारही तितक्याच गांभीर्याने करण्याची गरज आहे,' असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

'आयओटी'चा गैरवापर झाल्यास काय घडू शकते?

एखाद्या हॉटेलमधील तापमान नियंत्रणाच्या यंत्रणेवर हल्ला झाल्यास तेथील तापमान नियंत्रित करणे अशक्य होईल.

स्वयंचलित वाहनांच्या कार्यात बिघाड होऊ शकतो.

इंटरनेटशी जोडलेली वैद्यकीय उपकरणे हॅक झाल्यास एखाद्याच्या/ अनेकांच्या जिवांशी खेळ होऊ शकतो.

जागतिक वारसा दिन 'अक्षरधारा'त पुस्तक दालन

जागतिक वारसा दिनानिमित्त अक्षरधारा बुक गॅलरी, वास्तुशोध फाउंडेशन आणि एच.व्ही देसाई महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हेरिटेज' या विषयावरील पुस्तकांचे विशेष दालन तयार करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गिरीश पठाडे आणि डॉ. गणेश राऊत प्रमुख वक्ते होते.

या दालनात देश-विदेशातील वारसा स्थळांची माहिती देणारी १०० पेक्षा अधिक पुस्तके सवलतीच्या दरात उपलब्ध होती.

'जीवन घडवण्यासाठी वाचन फायद्याचे'

'सामाजिक चळवळ जगवण्यासाठी महापुरुषांच्या चरित्राचे वाचन आवश्यक आहे. वाचनामुळे माणूस सतत जागृत राहून इतरांना जागृत करतो,' असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी मांडले. भारतीय बौद्ध महासभा या संस्थेच्या वतीने भारतीय संस्कृतीचा मागोवा आणि बुद्धदर्शन, विपश्यना, पतंजली योगसूत्र या ग्रंथांचे प्रकाशन वैद्य यांच्या हस्ते झाले. बाबा आढाव, सुरेश घोरपडे, विलास वाघ, जयदेव गायकवाड, डॉ. सिद्धार्थ धेंडे आदी उपस्थित होते.

'मिरासदारी'चा पुनःप्रत्यय!

ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी मेहता प्रकाशनाने १५ एप्रिलला एका विशेष कार्यक्रमाचे

आयोजन केले होते. या वेळी ज्येष्ठ प्रकाशक अनिल मेहता यांनी मिरासदारांना केक भरवून शुभेच्छा दिल्या.

वयाच्या ८९व्या वर्षीही सळसळता उत्साह... कथेचे विविध पदर खुलवण्याची अनोखी शैली... हशा आणि टाळ्यांची मिळणारी दाद... ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द. मा. मिरासदार यांच्या कथाकथनाने मिरासदारी शैलीचा पुन:प्रत्यय साहित्यप्रेमींना आला.

विनोदी लेखनातील आपले आदर्श चिं.वि. जोशी यांची 'स्मरणशक्तीचे प्रोफेसर' ही कथा मिरासदारांनी मोठ्या उत्साहाने खुलवून सांगितली.

चाहत्यांनी मिरासदारांच्या पुस्तकांवर सह्या घेतल्या आणि संवादही साधला.

'चांगल्या लेखनाची जाहिरात करण्याची वेळ लेखकावर येऊ नये. चांगले साहित्य कोणत्याही प्रकारे वाचकांपर्यंत पोहोचते. आत्मस्तुती काही कामाची नसते. तत्त्वज्ञान आणि विनोद यांच्यातच दु:खाचा विसर पाडण्याची ताकद आहे. समाजात तत्त्वज्ञान आचरणारी माणसे फार थोडी असतात. त्यामुळे सर्वसामान्यांना घटकाभर दु:ख विसरण्यासाठी विनोदच उपयुक्त ठरतो,' असे मिरासदार यांनी सांगितले.

'मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसारासाठी साहित्य संमेलन आणि काही उपक्रम पुरेसे ठरणार नाहीत. मातृभाषेविषयीचा प्रेम आणि आदर वाटला पाहिजे. मात्र अलीकडे परकीय भाषेविषयीच जास्त प्रेम वाटू लागले आहे. कदाचित मातृभाषा मराठी भाषा भाकरी मिळवून देत नसल्याचेही कारण त्यामागे असू शकेल. मराठी भाषा रोजच्या व्यवहारात वापरण्याचा निग्रह केल्यास मातृभाषेविषयी प्रेम निर्माण होण्यास मदत होईल. मराठीत सही करणे, सोसायटीच्या नावाच्या पाटीत मराठी असणे, इंग्रजी शब्दांविना बोलणे अशा साध्या गोष्टींतून मराठीचा शक्य तितका वापर केला पाहिजे,' असेही प्रा. मिरासदार यांनी सांगितले.

जर्मन भाषेला भारतीय भाषा पर्याय

गत वर्षी केंद्रीय विद्यालयांमधून जर्मन भाषा शिकवणे बंद करण्याचा निर्णय घेणाऱ्या केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने आता याबाबत नवा तोडगा काढला आहे. केंद्रीय विद्यालयांमध्ये जर्मन हा वैकल्पिक विषय म्हणून ठेवण्यात येईल, मात्र त्या बदल्यात जर्मनीमधील शाळांमध्ये हिंदी अथवा अन्य भारतीय भाषा शिकवण्यात यावी, असा प्रस्ताव मंत्रालयाने ठेवला

आहे.

केंद्रीय विद्यालयांमधून अचानक जर्मन विषय बाद ठरवल्यानंतर दोन्ही देशांच्या राजकीय संबंधांमध्ये काहीसा तणाव निर्माण झाला होता. मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नवा तोडगा समोर ठेवला आहे. या प्रस्तावामध्ये जर्मनीतील किती शाळांमध्ये भारतीय भाषा शिकवली जावी, याचा उल्लेख नाही. त्याचप्रमाणे जर्मन शाळांमध्ये भारतीय भाषा शिकवण्यासाठी शिक्षकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा खर्च उचलण्याविषयीही सरकारने मौन बाळगले आहे.

केंद्रीय विद्यालय संगठन आणि गॉथे इन्स्टिट्यूट यांच्यामध्ये याविषयीचा सामंजस्य करार होणार आहे.

'सुगम मराठी व्याकरण व लेखन'चे प्रकाशन

''कविता नाटकांची समीक्षा होते; मात्र समाजमनावर दीर्घकाळ परिणाम करणाऱ्या मराठी पाठ्यपुस्तकांच्या समीक्षेकडे समीक्षकांचे दुर्लक्ष होत आहे, ही गंभीर बाब आहे,'' असे मत सहित्यिक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

व्याकरणकार मो. रा. वाळंबे लिखित 'सुगम मराठी व्याकरण व लेखन' या पुस्तकाच्या सुवर्णमहोत्सवी आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याच्या माजी मुख्य निवडणूक आयुक्त नीला सत्यनारायण, नितीन प्रकाशनचे नितीन गोगटे उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''पहिली ते एम.ए. पर्यंतची पाठ्यपुस्तके रंजनपर पुस्तकांपेक्षा समाजावर जास्त परिणाम करतात. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरही पाठ्यपुस्तकांच्या समीक्षेची चर्चा होत नाही. मो. रा. वाळंबे हे जुन्या पिढीतील आदर्श शिक्षक होते. त्यांनी लिहिलेला हा पुस्तक मराठीचा संदर्भग्रंथच आहे.''

नीला सत्यनारायण म्हणाल्या, ''भाषेचे सौंदर्य बिघडू नये. म्हणून तरुण पिढीने व्याकरणाचा पाया सोडू नये. मातृभाषेचे रक्षण आपण केले पाहिजे. त्यासाठी साध्या सोप्या भाषेत मराठीत लिहिले तर साऱ्यांना समजेल.'' प्रास्ताविक गोगटे यांनी केले. सूत्रसंचालन अमृता कावणकर यांनी केले. वैशाली कार्लेकर यांनी आभार मानले.

‘नेट न्यूट्रॅलिटी’ म्हणजे काय?

इंटरनेटवरील प्रत्येक बाइट हा सारखा असतो, मग तो यू ट्यूबसाठी वापरा, वर्तमानपत्र वाचण्यासाठी किंवा इंटरनेटवर सिनेमा पाहण्यासाठी वापरा, नाहीतर विकिपीडियावरील माहिती डाउनलोड करण्यासाठी वापरा. विजेचा प्रवाह घेतल्यावर तो खोली प्रकाशमान करण्यासाठी वापरता की एखादे होम अप्लायन्स किंवा विद्युत उपकरण चालवण्यासाठी वापरता, याच्याशी वीज कंपनीला काही देणेघेणे नसते. अगदी त्याच प्रकारे इंटरनेटच्या वापराची मुभा पाहिजे, यालाच ‘नेट न्यूट्रॅलिटी’ म्हणतात.

इंटरनेटवापराचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यावरून सध्या जोरदार चर्चा चालू आहे. फेसबुकचे संस्थापक मार्क झुकेरबर्ग यांनी आपण ‘नेट न्यूट्रॅलिटी’च्या बाजूने असल्याचे स्पष्ट केले. फेसबुकचा ‘इंटरनेट डॉट ऑर्ग’ हा कार्यक्रम ‘नेट न्यूट्रॅलिटी’च्या विरोधात असल्याचा आरोप यांनी फेटाळून लावला. फेसबुकच्या ‘इंटरनेट डॉट ऑर्ग’ कार्यक्रमासाठी भारतात रिलायन्स कम्युनिकेशन ही कंपनी भागीदार आहे. फेसबुकच्या या कार्यक्रमामुळे ‘नेट न्यूट्रॅलिटी’ला धक्का पोचतो असा अनेकांचा आक्षेप आहे.

‘इंटरनेट डॉट ऑर्ग’ हा फेसबुकने सुरू केलेला महत्वाचा कार्यक्रम असून, त्याद्वारे जगभरातील ५ अब्ज नागरिकांना इंटरनेटशी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यासाठी सॅमसंग आणि क्वॅलकॉम या बलाढ्य कंपन्यांशी फेसबुकने भागीदारी केली आहे. भारतात रिलायन्स कम्युनिकेशनच्या भागीदारीत सुरू करण्यात आलेल्या ‘इंटरनेट डॉट ऑर्ग’ कार्यक्रमाच्या माध्यमातून ३३ संकेतस्थळे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. मात्र हा कार्यक्रम ‘नेट न्यूट्रॅलिटी’च्या संकल्पनेला धोका निर्माण करणारा आहे असा मोफत इंटरनेट मोहिमेतील कार्यकर्त्यांचा आरोप आहे.

अलीकडे फेसबुकच्या वतीने थेट मार्क झुकेरबर्गला प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली तेव्हा जॉश कॉन्स्टीन यांनी इंटरनेट डॉट ऑर्ग आणि नेट न्यूट्रॅलिटीबाबत प्रश्न विचारला होता. त्याला उत्तर देताना मार्कने ‘नेट न्यूट्रॅलिटी’चे समर्थन केले. तसेच इंटरनेट सेवा पुरवठादारांनी भेदभाव करू नये आणि कुठल्याही मर्यादा ठरवू नयेत, असेही स्पष्ट केले.

एअरटेल 'बॅकफूट'वर

भारती एअरटेलच्या वादग्रस्त ठरलेल्या एअरटेल झीरो या संकल्पनेवर सोशल मीडियामधून मोठी टीका झाली; पण आता ग्राहक आणि नियामकाच्या कचाट्यात 'एअरटेल झीरो' ही घोषणा अडकण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळेच ही योजना मागे घेण्याचा कंपनीचा विचार आहे.

'एअरटेल झीरो' संकल्पना 'नेट न्यूट्रॅलिटी' विरोधात नसल्याचे एअरटेलकडून अनेकदा स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र वाढता विरोध पाहता कंपनीकडून 'एअरटेल झीरो' प्लॅन मागे घेतला जाऊ शकतो, कंपनीची डागाळलेली प्रतिमा सुधारण्यासाठी हा खटाटोप कंपनीला करावाच लागेल – गतवर्षी 'स्काइप' आणि 'व्हायबर'साठी अशाच स्वरूपाची वेगळी योजना जाहीर केली होती. मात्र त्यानंतर ती मागे घेणे कंपनीला भाग पडले.

'क्लिअरट्रीप'ची माघार

पर्यटन क्षेत्रातील कंपनी क्लिअरट्रीपनेही 'इंटरनेट डॉट ऑर्ग'च्या करारातून बाहेर पडण्याचा निर्णय जाहीर केला. फेसबुक आणि रिलायन्स कम्युनिकेशनच्या माध्यमातून ३३ संकेतस्थळे इंटरनेटवर मोफत उपलब्ध करून देण्याचा करार याआधी झाला होता. 'नेट न्यूट्रॅलिटी'च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या वादामुळेच आपण बाहेर पडत असल्याचे 'क्लिअरट्रीप'ने स्पष्ट केले.

'जीमेल'च्या ॲपवर याहू, आउटलूक

तंत्रज्ञानाच्या वाढत्या व्याप्तीबरोबर टेक कंपन्या यूजर्सना आकर्षित करण्यासाठी नवनवीन सुविधा पुरवित आहेत. प्रत्येक यूजर्सचे जीमेल, याहू, आउटलूक किंवा रीडिफ या साइटपैकी किमान दोन साइटवर तरी आपले इमेल अकाउंट असतात. यामुळे प्रत्येक अकाउंट तपासण्यासाठी आपल्याला त्या त्या साइटवर जावे लागते. मात्र गुगलने एक पाऊल पुढे टाकत याहू, आउटलूक वरील इमेल अकाउंटही एकाच छताखाली आणले आहेत. गुगलच्या अँड्राइडवरील जीमेल ॲपवरून आपण एकाच वेळी जीमेल, याहू किंवा आउटलूकवरील इ-मेल बघू शकू तसेच, त्या इ-मेलला उत्तरही देऊ शकू. यापूर्वी आपण गुगलवर फक्त जीमेलचे अकाउंटच ओपन करू शकत होतो. मात्र गुगलने आपल्या फीचर्समध्ये काही बदल केले आहेत. त्यामुळे

आपण गुगलच्या जीमेल अँड्राइड ॲपवरून याहू, आउटलूक व इतरही इमेल अकाउंट ॲक्सेस करू शकतो. तंत्रज्ञान विकसित होत आहे. टेक कंपन्याशी स्पर्धा करण्यासाठी व यूजर्सना आकर्षित करण्यासाठी गुगलने 'ऑल बॉक्सेस' हे जीमेल अँड्राइड ॲप तयार केले आहे. या ॲपमध्ये याहू, आउटलूक या इ-मेलचा समावेश केला आहे. यामुळे पेज किंवा अकाउंट बंद न करता यूजर्स विविध सर्व्हरवरील आपले इ-मेल पाहू शकतील. या ॲपवर जी-मेलप्रमाणेच इतर इ-मेलचा व्ह्यू चांगल्या प्रकारे दिसणार आहे. यासाठी गुगलने आपल्या ॲपच्या फीचरमध्ये काही सुधारणा केल्या आहेत; तसेच गुगल ड्रायव्हमध्ये सेव्ह करण्याची सुविधाही आहे.

संहिता सेन्सॉर 'ऑनलाइन'

एकांकिका, नाटक, रंगभूमीवरील कार्यक्रमाच्या संहितेच्या प्रमाण-पत्रासाठी मुंबईतील रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळात (सेन्सॉर बोर्ड) माराव्या लागणाऱ्या खेपा आता थांबणार आहेत. संहिता सेन्सॉर संमत करण्याची प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, सेन्सॉरने संमत केलेल्या संहितांना डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

सेन्सॉर बोर्डाचे नवनिर्वाचित अध्यक्ष अरुण नलावडे यांनी याबाबत माहिती दिली. सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे यांनीही ऑनलाइन प्रक्रियेसाठी अनुकूलता दर्शवली आहे.

सध्याच्या प्रक्रियेनुसार सेन्सॉर बोर्डाच्या मुंबईतील कार्यालयात संहिता द्यावी लागते. संहितेसह प्रमाणपत्र मिळवण्यासाठीचा अर्ज आणि शुल्क भरावे लागते. दिलेली संहिता बोर्डाचे किमान दोन सदस्य वाचून अभिप्रायासह अध्यक्षांच्या मान्यतेसाठी देतात. या प्रक्रियेला किमान दोन महिने लागतात. त्यानंतर बोर्डाच्या अध्यक्षांनी संहितेला हिरवा कंदील दाखवल्यावर त्याचे प्रमाणपत्र दिले जाते. प्रायोगिक आणि व्यावसायिक नाटकांसह ऑर्केस्ट्रा, इव्हेंट्समधील स्कीट्सच्या संहितांना सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र घ्यावे लागते. मराठीसह गुजराती, बंगाली आदी भाषांतील संहितांचाही त्यात समावेश असतो.

सर्वशिक्षा गळतीचे प्रमाण रोखले

शिक्षणातील गळतीचे प्रमाण चिंताजनक असले, तरीही शाळांमधील

गळती ९० टक्क्यांपर्यंत रोखण्यामध्ये भारताला यश आले आहे, म्हणून 'युनेस्को'च्या अहवालामध्ये भारताच्या प्रयत्नांचे कौतुक करण्यात आले आहे.

या अहवालामध्ये २००० ते २०१५ या काळातील शाळांमधील प्रवेश व गळती यांच्याविषयीची माहिती देण्यात आली आहे. 'प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये मुले आणि मुली यांचे प्रमाण समान असणारा पश्चिम आणि दक्षिण आशियामध्ये भारत हा एकमेव देश आहे. प्राथमिकपूर्व शाळांमध्ये नोंदणी करण्यात ४७ टक्के देशांना यश आले असून, भारतासह आठ टक्के देश हे लक्ष्य गाठण्याच्या जवळ पोहोचले आहेत,' असे या अहवालात म्हटले आहे.

प्राथमिकपूर्व आणि मूलभूत शिक्षणातील दर्जा सुधारण्यासाठी आणि सर्व मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी निधीमध्ये दरवर्षी २२ अब्ज डॉलरची तूट पडते. ही तूट भरून काढण्यासाठी सहकार्याची गरज असल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

स्मृती इराणी म्हणाल्या, 'शाळांमधील प्रवेश वाढावा, यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. आता शिक्षण क्षेत्राचे लक्ष ज्ञानवृद्धी, विश्लेषणाचे कौशल्य आणि उपलब्ध माहितीच्या पलिकडे कल्पना करण्याची क्षमता वाढविण्यावर केंद्रित करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शिक्षण हा देशाच्या उभारणीतील सर्वांत महत्त्वाचा घटक आहे.' असे म्हटले आहे.

फेसबुक युजर्स अधिक सक्रिय

अनेक सोशल नेटवर्किंग साइट्सची सध्या चलती आहे. गुगल व ट्विटरपेक्षा फेसबुकवर सक्रिय असणाऱ्या युजर्सची संख्या अधिक आहे, असे ग्लोबल वेबइंडेक्सच्या अहवालावरून स्पष्ट झाले आहे. सर्वेक्षणात ७३ टक्के युजर्सनी आपण महिन्यातून किमान एकदा फेसबुकला भेट देतो असे सांगितले. त्यातील ४२ टक्के युजर्स ॲक्टिव्ह असल्याचे म्हटले आहे. याच काळात ट्विटरला 'लॉग इन' करणाऱ्यांची टक्केवारी ३६ होती. त्यापैकी सक्रिय युजर्सची टक्केवारी ट्विटरवर २२, गुगल प्लसवर २१ आणि लिंकडइनवर १३ होती. ५३ टक्के युजर्सनी गेल्या महिनाभरात किमान एक लेख वाचल्याचे सांगितले. गुगल प्लस आणि ट्विटरवर हीच टक्केवारी

अनुक्रमे ४५ अशी आहे.

फेसबुकचा कायापालट

सोशल नेटवर्किंगमध्ये आजही फेसबुकचा दबदबा आहे. फेसबुकच्या मेसेजिंग ॲपला व्हॉटस अप, विचॅटसारख्या लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग सर्व्हिसकडून मोठी स्पर्धा आहे. मेसेंजरची लोकप्रियता टिकवून ठेवण्यासाठी फेसबुक विविध प्रयत्न करत आहे. 'द नेक्स्ट डिजिट'च्या अहवालानुसार फेसबुक मेसेंजर ॲपमध्ये २० बदल करण्यात येणार आहेत. आगामी एफ ८ परिषदेत फेसबुक मेसेजिंगमधील बदलाची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. दरवर्षी स्मार्टफोन युझर्सची संख्या वाढतच असल्याने, संकेतस्थळापेक्षाही फेसबुक मेसेंजर युझर्सपर्यंत सहजपणे पोचू शकते. डाऊनलोडिंगचाच विचार केला तर फेसबुक मेसेंजर सध्या तिसऱ्या क्रमांकावर आहे. एका नव्या फीचरमार्फत मेसेंजरमधून पैसे पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे.

ई-साहित्य संमेलन

''बालपणी ग्रामपंचायतीच्या शाळेत शिकल्याने फारसे वाचन नाही. कोणताही लेखक कधी पाहिला नसल्याने कोणी साहित्यिक माझे आदर्श नव्हते. लेखन हा माझा प्रांत आहे असे कधी वाटलेच नाही. मात्र, चळवळीमध्ये काम करू लागल्यानंतर समाज कळला. समाजामध्ये घडते त्याचे चित्र साहित्यात उमटतच नाही हे ध्यानात आले. त्यामुळेच समाजात घडते ते साहित्यामध्ये उमटण्यासाठी मी लेखन करतो'' अशी भूमिका ज्येष्ठ साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांनी युनिक फीचर्सतर्फे आयोजित पाचव्या मराठी ई-साहित्य संमेलनात अध्यक्ष म्हणून मांडली. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे (एमकेसीएल) व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले. जीवनातील सुख-दु:खातून माणूस शिकतच असतो. मग तो साहित्य कशाला वाचतो तर परकाया प्रवेशाच्या माध्यमातून इतरांच्याही जीवनातील सुख:दु:खे जाणून घेत आपले अनुभव समृद्ध करणे ही त्यामागची भूमिका असते. सकस साहित्यनिर्मितीसाठी संवेदनशील मन असावे लागते, असे सांगून डॉ. अनिल अवचट म्हणाले, सांस्कृतिक आत्मविश्वास देणारे मातृभाषेतील शिक्षण

महत्त्वाचे आहे. इंग्रजी भाषा जागतिक आणि आपली मराठी प्रादेशिक असा न्यूनगंड कशाला बाळगायचा? अन्य भाषांतील साहित्य मराठीमध्ये येत आहे आणि मराठी साहित्य अन्य भाषांत जात आहे ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळेच अनुवादाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

मराठी भाषा संवर्धित करण्यासाठी उचललेल्या प्रत्येक पावलाचे स्वागतच केले पाहिजे, असे सांगून विवेक सावंत म्हणाले, ''माहिती तंत्रज्ञानाच्या डिजिटल क्रांतीमुळे छापील पुस्तकाचे महत्त्व अजिबात कमी होणार नाही. डिजिटल तंत्रावरील आशय जाणून घेतल्यानंतर छापील पुस्तकाचे वाचन हे त्या वाचकाला लेखकाच्या अधिक जवळ नेणारे ठरेल. समाजातील प्रश्नांचा वाङ्मयीन आविष्कार घडवित अवचट यांनी लेखनातून अस्वस्थ करणारे विचार दिले आहेत.

आनंद अवधानी यांनी प्रास्ताविक केले. गौरी कानिटकर यांनी संमेलनाविषयीची माहिती दिली.

दीपिकाच्या 'माय चॉइस'ने नेटविश्वात खळबळ

बॉलिवूडची अभिनेत्री दीपिका पदुकोण हिने महिला सक्षमी-करणासाठी पुढाकार घेत 'माय चॉइस' या व्हिडिओच्या माध्यमातून स्त्री जाणिवांना मोकळी वाट करून दिली आहे.

दिग्दर्शक होमी अदजानिया आणि दीपिका यांनी 'व्होग इंडिया'च्या सहकार्याने या व्हिडिओची निर्मिती केली असून, सध्या तो नेटविश्वामध्ये चर्चेचा विषय बनला आहे. ऑनलाइन विश्वातील लाखो नेटिझन्सनी या व्हिडिओबाबत अनुकूल प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत. विविध क्षेत्रांतील ९९ महिलांवर हा व्हिडिओ चित्रित करण्यात आला आहे. बऱ्याच नेटिझन्सनी हा व्हिडिओ महिलावादी असल्याचा दावा केला आहे.

या व्हिडिओमध्ये दीपिकाने विवाहपूर्व आणि विवाहबाह्य लैंगिक संबंधाचा पूर्ण अधिकार स्त्रियांना देण्याचा आग्रह धरला आहे. दरम्यान, आलिया भट्ट, सोनाक्षी सिन्हा आदी अभिनेत्रींनी या व्हिडिओचे समर्थन केले आहे.

सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षपदी अरुण नलावडे

रंगभूमीवरील कार्यक्रमांच्या संहितांचे पूर्वनिरीक्षण करणाऱ्या रंगभूमी

प्रयोग परिनिरीक्षण मंडळाची (सेन्सॉर बोर्ड) पुनर्रचना करण्यात आली. ज्येष्ठ अभिनेते दिग्दर्शक अरुण नलावडे यांची बोर्डाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून, बोर्डाच्या ३४ सदस्यांमध्ये पुण्यातील चार रंगकर्मींचा समावेश आहे. राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने पुनर्रचना करण्यात आलेल्या बोर्डाच्या सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली. विद्यमान नाट्य संमेलनाध्यक्ष फेय्याज शेख, ज्येष्ठ नाटककार सुरेश खरे, निर्माता प्रसाद कांबळी, लेखक दिग्दर्शक अशोक समेळ यांच्यासह पुण्याच्या ज्येष्ठ अभिनेत्री मानसी मागीकर, अश्विनी गिरी, विनीता पिंपळखरे, दिक्पाल लांजेकर हे बोर्डाचे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. इतर सदस्यांमध्ये विवेक आपटे, अभय खडपकर, डॉ. दयानंद नाईक, डॉ. हेमंत महाजन, सतीश शेंडे, ॲड. आनंद देशपांडे, वर्षा अदलजा आदींचा समावेश आहे.

बारामतीमध्ये युवा नाट्य साहित्य संमेलन

''इंग्रजीच्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषेला महत्त्व व प्राधान्य देणे गरजेचे आहे. मराठी साहित्याची अधिक प्रगती व्हावी व हे साहित्य अधिकाधिक प्रगल्भ व्हावे. युवकांनी सोशल मीडियाच्या वापरासोबतच साहित्यातही रस दाखवायला हवा.'' असे आवाहन तिसऱ्या युवा नाट्य साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अभिराम भडकमकर यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या बारामती शाखेच्या वतीने आयोजित तिसऱ्या युवा नाट्य साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या सचिव सुनंदा पवार यांच्या हस्ते झाले.

नाट्य व चित्रपट क्षेत्राचे केवळ ज्ञान घेऊन बदलत्या काळात उपयोग नाही. त्याच्या जोडीला मार्केटिंगचेही ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. मात्र असे असले तरी मार्केटिंगला तुम्ही शरण जाऊ नका. साहित्य व नाट्य क्षेत्रात युवकांना करिअर करता यावे, या उद्देशाने हे साहित्य संमेलन आयोजित केले आहे, त्याचा निश्चित फायदा होईल व निव्वळ चर्चा होण्यापेक्षाही यातून काहीतरी साध्य होऊ शकेल. मराठी युवकांच्या मनात असलेला न्यूनगंड दूर करून, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करायला हवा, असे भडकमकर यांनी सांगितले.

या प्रसंगी कार्याध्यक्ष माधवी वैद्य व उद्‌घाटक सुनंदा पवार यांनीही

नवे कोरे

मी मलाला



मूळ लेखिका
मलाला युसूफजई

सहलेखिका
क्रिस्टिना लॅम्ब

अनुवाद
सुप्रिया वकील

किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

निसर्गसौंदर्याचं लेणं लाभलेल्या स्वात खोऱ्याचा तालिबानने ताबा घेतला तेव्हा
एका मुलीनं आवाज उठवला. ती मुलगी म्हणजे – मलाला युसूफजई.
तिने तिच्या शिक्षणाच्या हक्कासाठी लढा द्यायचं ठरवलं...
पण, मंगळवार, दिनांक ९ ऑक्टोबर २०१२ रोजी तिला याची किंमत मोजावी लागली. शाळेतून बसने घरी परतत असताना, वाटेत तिच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. आणि एकाएकी तिचं आयुष्य जीवन-मरणाच्या खोल दरीत लोटलं गेलं...
पण ती या हल्ल्यातून आश्चर्यकारकरीत्या वाचली,
आणि तिच्या ध्येयासाठी त्याच निर्धारानं कार्य करत राहिली...

ही आहे मलालाची कहाणी –
एक कोवळा आवाजसुद्धा परिवर्तनाची पहाट जागवू शकतो याची साक्ष देणारी...!

मनोगत व्यक्त केले. साहित्य परिषदेच्या बारामती शाखेचे अध्यक्ष संजय जाधव यांनी प्रास्ताविक केले.

काचबिंदूसाठी 'सिलेक्टिव्ह लेसर ट्रॅबेक्युलोप्लॅस्टी' तंत्र

रोजच्या रोज डोळ्यांत ड्रॉप टाकण्यातून काचबिंदूच्या काही रुग्णांची वर्ष-दीड वर्षासाठी आता सुटका होऊ शकते. त्यासाठी 'सिलेक्टिव्ह लेसर ट्रॅबेक्युलोप्लॅस्टी' या उपकरणाचा वापर केला जाईल.

काचबिंदूमुळे कायमस्वरूपी अंधत्व येते. काचबिंदू हा चोरपावलाने येणारा डोळ्यांचा आजार आहे. बहुतांश वेळा दृष्टी खूपच कमी झाल्यावर या रोगाचे निदान होते. त्यामुळे चाळिशीनंतर नेत्रतज्ज्ञांकडून डोळ्यांचा ताण मोजला जाणे अत्यावश्यक आहे.

राष्ट्रीय नेत्रचिकित्सा संस्थेतील (एपआयओ) काचबिंदू तज्ज्ञ डॉ. पंकज बेंडाळे म्हणाले, ''काचबिंदूमुळे कमी होणारी दृष्टी रोखण्यासाठी त्याचे निदान लवकर होणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणताही कंटाळा न करता नियमितपणे डोळ्यांत औषधाचा ड्रॉप घालावा लागतो. कामाच्या निमित्ताने सतत बाहेर फिरणाऱ्या, वयोवृद्ध रुग्णांना हे ड्रॉप टाकता येत नाहीत. तसेच काही गर्भवतींमध्ये हे ड्रॉप टाकणे धोक्याचे ठरू शकते. या सर्वांवर प्रभावी पर्याय म्हणून 'सिलेक्टिव्ह लेसर ट्रॅबेक्युलोप्लॅस्टी' हे तंत्र विकसित करण्यात आले आहे. परदेशांमध्ये या तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. आता पुण्यासह महाराष्ट्रात ही सुविधा उपलब्ध आहे. काचबिंदूच्या लेसर तंत्रज्ञानामुळे ड्रॉप टाकण्याचा त्रास वर्ष ते दीड वर्षासाठी बंद होईल.''

अयोध्येत रामकथा निरुपणकारांचा भाव वाढला

अयोध्येमधील राजकीय संघर्ष संपुष्टात आला असताना आता रामकथा निरुपणकार आणि 'अयोध्या रिसर्च इन्स्टिट्यूट'यांच्यात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

कथावाचक हे लोकांना चुकीचे मार्गदर्शन करत असून, कथावाचन हा केवळ पैसे कमावण्याचा उद्योग झाला असल्याचा आरोप संशोधकांनी केला. दुसरीकडे कथावाचकांनी वेगळीच भूमिका मांडली. सध्या अयोध्येतील रामकथांच्या वाचनामध्ये कमालीची घट झाली असून, निधी आणि वेळेच्या अभावामुळे लोक रामकथांना येत नसल्याची तक्रार कथावाचक पवन शास्त्री यांनी केली.

अयोध्येतील निवड समितीने आता कथावाचकांची स्वतंत्र यादीच तयार केली असून, संबंधित व्यक्तींच्या बौद्धिक कुवतीनुसार त्यांना कथावाचनाची संधी दिली जाणार आहे. याबाबत बोलताना शास्त्री म्हणाले, ''मागील आठ वर्षांपासून अयोध्येमध्ये रामकथेचे आयोजन केले जात आहे. प्रत्येक दिवशी या स्थळाला १० ते ५० हजार भक्त भेट देतात. त्यामुळे रोज या ठिकाणी रामकथांचे आयोजन केले जात असते. यात आता परराज्यातील कलाकार आणि वाचक सहभागी झाल्याने यातील स्पर्धाही आणखी वाढली आहे.''

रामकथा वाचकांच्या भूमिकेलाच संशोधकांनी आक्षेप घेतला आहे. या कथावाचकांकडून मूळ इतिहासाची मोडतोड केली जात असल्याचा त्यांचा आक्षेप आहे. सुरुवातीला कथावाचक हे कथेचे वाचन मोफत करत असत; पण जसजसा त्यांना वाढता प्रतिसाद मिळू लागला, तसतसे त्यांनी पैसे घ्यायला सुरुवात केली. कथावाचकांना आता पैशाची हाव सुटली आहे. मागील वर्षभरात या खर्चापोटी आम्हाला २३ लाख रुपये खर्च करावे लागले, असा दावा संशोधन संस्थेचे संचालक वाय.पी.सिंग यांनी केला.

'सी-डॅक' तर्फे मोडी लिपीचा फॉन्ट आणि की-बोर्ड तयार

सी-डॅक म्हणजे सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटिंग या संस्थेने संगणक प्रणालीतील मोडीचा फॉन्ट व की-बोर्ड तयार केला असून, दोन-तीन महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण होईल, अशी माहिती सी-डॅकच्या 'जीस्ट' विभागाचे (ग्राफिक्स अँड इंटेलिजन्स बेस्ड स्क्रिप्ट टेक्नॉलॉजी) सहयोगी संचालक महेश कुलकर्णी यांनी दिली.

राज्य सरकारचा माहिती तंत्रज्ञान विभाग व सी-डॅक यांच्यातर्फे गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मोडी लिपीच्या डिजिटलायजेशनचा प्रकल्प हाती घेण्यात आला. याद्वारे राज्यभरातून विविध संस्थांकडे असलेली मोडी लिपीतील कागदपत्रे 'स्कॅन' करून 'क्लाउड' तंत्रज्ञानाच्या साहाय्याने माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सर्व्हरवर एकाच ठिकाणी 'डिजिटली' साठवता येणार आहेत. यामुळे राज्यभरात विखुरलेले ऐतिहासिक दस्तावेज एका क्लिकवर 'ऑनलाइन' पाहता येतील.

याबाबत कुलकर्णी म्हणाले, ''शिवकालापासून ते अगदी ब्रिटिश-काळापर्यंत मोडी लिपीत प्रचंड लिखाण झाले आहे. परंतु, हा ऐतिहासिक ठेवा विखुरलेला आहे. जुन्या लोकांकडे आजही मोडी लिपीतील कागदपत्रे पाहावयास मिळतात. जीर्ण झाल्यामुळे यातली बरीच कागदपत्रे वाचणे शक्य

होत नाही. तंत्रज्ञानाच्या मदतीने अनेक वर्षापासूनचा हा ऐतिहासिक ठेवा एकत्रितपणे जतन होईल.''

पहिल्या टप्प्यात कागदपत्रांचे डिजिटलायजेशन केले जाणार असून, टप्प्याटप्प्याने प्रणालीमध्ये अधिक सुविधा दिल्या जातील. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी मोडी लर्निंग क्लासेस व हस्तलिखित मोडी लिपीचे 'ऑनलाइन कॅरॅक्टर रेकग्नीशन'ही असेल.

व्हॉट्सॲप कॉल 'चकटफू' नाही!

व्हॉट्सॲप कॉलिंगची सुविधा सुरू झाली आणि अनेकांना 'चकटफू' कॉलच्या कल्पनेने आनंद झाला. सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून अफवांचं पेव फुटतं, ही बाब व्हॉट्सॲपच्या मोफत कॉलिंगच्या बाबतीही तंतोतंत लागू पडली आहे. हे कॉलिंग फुकट असल्याचे मेसेज सर्वत्र संचार करू लागले आहेत. असे कॉल करताना करणारा आणि स्वीकारणारा या दोघांचं डेटा कनेक्शन सुरू असणं गरजेचं असतं आणि कॉलमध्ये डेटा खर्ची पडत असतो.

साधारणत: एका मिनिटाच्या थ्रीजी व्हॉट्सॲप कॉलिंगसाठी ०.१५ एमबी ते ०.२० एमबी थ्रीजी डेटा खर्ची पडतो. याचाच अर्थ पाच मिनिटाच्या एका कॉलसाठी एक एमबी थ्रीजी डेटा वापरला जातो. टूजी नेटवर्कमधून करण्यात येणाऱ्या कॉलिंगपेक्षा थ्रीजी नेटवर्कमधून करण्यात येणाऱ्या कॉलचा दर्जा थोडा तरी वरचा आहे. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे थ्रीजी नेटवर्कमधून करण्यात येणाऱ्या कॉलिंगपेक्षा टूजी कॉलिंग महाग पडत आहे. एका मिनिटाच्या टूजी कॉलिंगसाठी ०.३५ एमबी डेटा वापरला जातो.

मोबाइल इंटरनेट प्लॅनशिवाय डेटाची सुविध देणाऱ्या बहुतांश ऑपरेटर्सकडून थ्रीजीसाठी प्रति १.० केबी चार पैसे, तर टूजीसाठी प्रति दहा केबी १० पैसे आकारण्यात येतात. याचाच अर्थ थ्रीजीवरून व्हॉट्सॲप कॉलिंगसाठी प्रति मिनिट एक रुपया, तर टूजीवरून कॉलिंगसाठी अडीच रुपये खर्च येतो. तुम्ही वायफाय नेटवर्कचा उपयोग करणार असाल, तर आंतरराष्ट्रीय कॉलसाठी व्हॉट्सॲप कॉलिंगकडे सुवर्णसंधी म्हणून पाहायला हवं. फुकट कॉलिंगच्या नावाखाली मिळणाऱ्या महसुलाकडे पाहून व्हॉट्सॲप या सुविधेमध्ये अधिकाधिक सुधारणा करण्याचा निरंतर प्रयत्न करत आहे. ही सुविधा दूरसंचार कंपन्यांच्या डोळ्यावर आल्यास त्या 'ट्राय'कडे तक्रार करू शकतील.

एअरटेलनं दिला दणका

व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल अर्थात 'व्हीओआयपी'च्या माध्यमातून कॉलिंग करण्याचे प्रमाण वाढल्याने एअरटेलने 'व्हीओआयपी' पॅक्सच्या दरात वाढकरण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ग्राहक कॉलिंगसाठी तसेच, मेसेजेस पाठविण्यासाठी स्मार्टफोन अथवा डेस्कटॉपमधील इंटरनेट कनेक्शनची मदत घेताना दिसत आहेत. त्यामुळे त्यांना केवळ इंटरनेटच्याच बिलाचे पैसे अदा करावे लागतात. कॉलिंग अथवा मेसेजिंग जवळपास फुकटच असल्यासारखे आहे. त्यामुळे टेलिकॉम सेवा पुरवठादार आणि व्हाओआयपी सेवा पुरवठादारांच्या उत्पन्नावर प्रतिकूल परिणाम होतो असा कंपन्यांचा दावा आहे.

व्हॉट्सॲपच्या माध्यमातून कॉल करण्यासाठी वेगवान डेटा कनेक्शन असावं, अशी किमान अपेक्षा आहे. 'अ' नामक कॉलरनं 'ब' नावाच्या मित्राला थ्रीजी मोबाइल इंटरनेटच्या माध्यमातून कॉल केल्यानंतर (मित्र प्रति सेकंद आठ मेगाबाइट वेगाचं वायफाय कनेक्शन वापरतो) आवाज अस्पष्ट असल्याचे जाणवले. त्यानंतर 'अ' ने 'क' मित्राला थ्रीजी नेटवर्कच्या मदतीने कॉल केला, असता वरीलप्रमाणे अनुभव आला. त्यानंतर 'अ' ने थ्रीजी ऐवजी टूजी नेटवर्कची मदत घेतली तर पहिल्या प्रयत्नात कॉल पूर्ण होऊ शकला नाही. बऱ्याच वेळानंतर कॉल लागला; आणि कॉलिंगचा दर्जा खूपच सुमार होता.

पानिपतकार विश्वास पाटील यांची मुलाखत

'साहित्य संमेलन ही वारीच आहे. ज्ञानोबा-तुकोबांची ही पालखी पुढे न्यायलाच हवी. त्यामुळे साहित्य संमेलने व्हायलाच हवीत. साहित्य संमेलन हा काही रिकामटेकड्यांचा उद्योग नाही,' असा टोला ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांनी डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे नाव न घेता हाणला.

'डीएसके गप्पा' या कार्यक्रमात प्रा. मिलिंद जोशी यांनी पाटील यांच्याशी संवाद साधला. निसर्गाच्या सान्निध्यात गेलेल्या बालपणापासून ते पानिपत असा प्रवास या मुलाखतीत उलगडण्यात आला. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदामध्ये सध्या रस नसल्याचे पाटील म्हणाले. 'राजकारण्यांच्या कार्यक्रमांना तीन-चार लाख लोक जमतात; तेव्हा कोणाच्या पोटात मुरडत नाही. मायमराठीच्या उत्सवाला लाखो लोक जमतात, तेव्हा

कसे काय इतरांच्या पोटात दुखते,' असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

'गेल्या काही वर्षांपासून मराठी साहित्य साचेबद्ध झाले आहे. मराठी चित्रपट सातासमुद्रापार जात असताना मराठी साहित्य मात्र बांधावरच आहे. मराठी साहित्यिकांपुढे नव्या काळाचे आव्हान आहे. कादंबऱ्याचे अनेक विषय आजूबाजूला असताना मराठी लेखक त्यांना भिडत नाही, हे दुर्दैव आहे. नव्या काळाचे मोठे आव्हान लेखकांपुढे आहे. अलिकडच्या काळात मराठी वाचक वाढलेत. मात्र त्या प्रमाणात लेखकच दिसत नाहीत. साहित्यिकांची संख्या रोडावली आहे. नव्या लेखकांना टीव्ही मालिकांचे भाग लिहिण्यात जास्त रस आहे. त्यातून पैसा खूप मिळत असला, तरी कथा-कादंबऱ्या लिहिण्यातच लेखकाचा खरा कस लागतो. तेच खरे अक्षरसाहित्य आहे,' असेही पाटील यांनी सांगितले.

नेट आधारित सेवांसाठी नियम

इंटरनेटवर आधारित कॉलिंगच्या आणि मेसेजिंगच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढहोत आहे. या पार्श्वभूमीवर 'टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया'ने (ट्राय) नियमावली तयार करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आता लवकरच स्काइप, व्हायबर, व्हॉट्सॲप आणि गुगल टॉक या 'ओव्हर द टॉप' (ओटीटी) सेवांच्या वापरावर निर्बंध येण्याची शक्यता आहे.

'ओटीटी सेवांच्या अनिर्बंध वापरावर आणि इंटरनेटच्या खुल्या वापरावर सध्या जगभरातील देश उद्योग आणि ग्राहकांमध्ये वाद निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर किमान आपल्या देशातील ओटीटी सेवांच्या अमर्याद वापराला आळा बसावा, या उद्देशाने नियमावली तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे,' अशी माहिती 'ट्राय'चे सचिव सुधीर गुप्ता यांनी दिली.

मध्यंतरी भारती एअरटेलने 'व्हॉइस ओव्हर इंटरनेट प्रोटोकॉल' (व्हीओआयपी) सुविधा वापरण्याचे जाहीर केले. ग्राहकांकडून वेगळे शुल्क आकारले. त्यावरून कंपनीची ही कृती बेकायदा तसेच 'नेट न्यूट्रॅलिटी'च्या तत्त्वांचा भंग करणारी असल्याचा सूर उमटला होता.

'ट्राय'च्या मते टेलिकॉम सेवा पुरवठादारांकडून लँडलाइन आणि मोबाइल सेवा प्रदान करण्यात येते. त्यामुळे कॉलिंग आणि मेसेजिंग हे त्यांच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. मात्र, सध्या ग्राहकांचा इंटरनेटवर आधारित ओटीटीधारकांकडून जवळपास मोफत असलेली सेवा वापरण्यावर

भर आहे. त्यामुळे टेलिकॉम कंपन्यांच्या महसुलावर त्याचा थेट परिणाम होत आहे. टेलिकॉम कंपन्यांच्या ग्राहकांमध्ये विशेषत: तरुण वर्गात इंटरनेटवर आधारित सेवा वापरण्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

पाकिस्तानी कवयित्री सलीमा हाश्मी यांचा सत्कार

पाकिस्तानी चित्रकार-कवयित्री सलीमा हाश्मी यांनी अस्वस्थतेतूनच उत्तम कलाविष्कार जन्माला येतो, अशी भावना व्यक्त केली.

लाहोरमधील लोकप्रिय कवी फैज अहमद फैज यांची कन्या सलीमा हाश्मी यांचा घुमान संमेलनाच्या व्यासपीठावरून साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निमित्ताने मराठी भाषकांना भेटण्याची संधी मिळाली आणि हे अनोखे संमेलन अनुभवता आले याचा आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

लष्करी किंवा राजकीय व्यक्तींनी कितीही मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला तरी कलाविष्कार हा एखाद्या स्प्रिंगप्रमाणे उसळून येतो. अशा अटीतटीच्या प्रसंगातूनच उत्तम शायरी जन्माला आली आहे. पाकिस्तानमध्ये आता ज्या प्रकारे कलेचा जल्लोष होत आहे तो आमच्या जमान्यामध्येही नव्हता याकडे लक्ष वेधून सलीमा हाश्मी म्हणाल्या, इंटरनेटमुळे आता पाकिस्तानातील नव्या पिढीचे कलाकार भारत-पाकिस्तान सीमावादापेक्षाही आपली कला जगभरात घेऊन जाण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच अली काझीम या चित्रकाराच्या चित्रांना जगभर मागणी आहे. पूर्वग्रहदूषित मानसिकतेतून कलेच्या अंगणात मुक्तपणे प्रयोग करणारे कलाकार हेच पाकिस्तानचे भविष्य घडविणार आहेत.

महिलांवरील अत्याचार कमी करण्यासंदर्भात दृष्टिकोन बदलण्याची लढाई ही केवळ महिलांची नाही. तसे झाले तर, केवळ अर्धेच काम होईल. मात्र, यामध्ये महिलांचा पुढाकार असेल. मुझे औरतोंसे ज्यादा उम्मीद और भरोसा है असे फैज अहमद फैज म्हणत असत, असे सांगून सलीमा हाश्मी म्हणाल्या, ''खळबळजनक हेच खपाऊ असते असा पाकिस्तानातील माध्यमांचा समज आहे. वडील पाकिस्तान टाइम्सचे संपादक होते. त्यामुळे पत्रकारिता मी बालपणापासून पाहते आहे.''

छोट्या गावात मोठ्या संधी उपलब्ध

गावात नोकरी नाही म्हणून तरुण शहरात जाऊन नोकरी करतात. परंतु गावातूनच व्यवसायाला सुरुवात करून यशस्वी झालेल्या अनेक उद्योजकांनी गावातही यशस्वी होता येते हे दाखवून दिले असून, त्या मार्गाने गेल्यास यश मिळेल, असे प्रतिपादन 'रिच टू होम' या पुस्तकाच्या लेखिका रश्मी बन्सल यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे आयोजित मुलाखतीच्या कार्यक्रमात केले.

शिक्षण घेतल्यानंतर त्या क्षेत्रात नोकरीऐवजी लिखाणाकडे वळल्याबद्दल त्या म्हणाल्या की, बन्सल कुटुंब व्यवसायातच रमलेले आहे. मलाही त्यातच रस होता. त्यामुळे नोकरीत न अडकता मी वेगळ्या व्यवसायात जाऊ इच्छित होते. लेखन माझा आवडता विषय असल्याने मी तेच क्षेत्र निवडले. लिखाण करीत असताना भेटलेल्या प्रत्येकात मला वेगवेगळे गुण आढळले. त्यावरून मी हे शिकले की जगातील प्रत्येकात काहीतरी विशेष असते. फक्त ते अनलॉक करावे लागते. मग त्याला यशाचा मार्ग गवसतो. मोठमोठ्या संस्थांमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या मुलांना चांगल्या पॅकेजच्या नोकऱ्याच मिळतात असे नाही; त्यातील ३०टक्के युवक हे व्यवसायात उतरतात आणि यशस्वी होतात, त्यावरूनच हे पुस्तक लिहिले आहे.

यशस्वी होण्यासाठी दुसऱ्याची कॉपी करू नका, स्वत:च्या आतील गुण ओळखून त्यानुसारच व्यवसायात उतरा, त्यानंतरही संघर्षाचा काळ तग धरा मगच तुम्हाला यशाची चव चाखता येईल, व्यवसायात उतरायचे असेल, तर पालकांना चांगल्या पद्धतीने तुमचे विचार सांगा, मग ते तुम्हाला विरोध करणार नाहीत. 'रिच टु होम'बद्दल बोलताना त्या म्हणाल्या, अनेक युवक स्थानिक स्तरावर यश मिळत नसल्याने मोठ्या शहरात जातात. परंतु तेथे मोठ्या स्पर्धेला सामोरे जावे लागते, त्यापेक्षा गावात राहूनच उद्योग केल्यास आधुनिकीकरणाचा लाभ घेत लवकर यश मिळते आणि अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर आहेत. व्याख्या सांगताना आतून सुखी असाल तरच यशस्वी ठराल आणि असमाधानी असाल तर कितीही यश मिळाले तरी सुखाला पारखे व्हाल, असे सांगितले.

मेहता प्रकाशनच्या मनीषा देवकर यांनी स्वागत केले, तर अपर्णा वेलणकर यांनी त्यांची मुलाखत घेतली.

★

२२वी आवृत्ती

आपण सारे अर्जुन

लेखक
वपु काळे

किंमत - १२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

संसार खरंच इतका अवघड आहे का? माणसाला नेमकं काय हवंय्?
संपूर्ण आयुष्य संगीतमय करता येणार नाही का?
एखाद्या मैफलीसारखं रंगवता येणार नाही का?
आपल्या जन्मापूर्वी हे जग होतंच. आपण मेल्यानंतरही जगाचा कारभार तसाच चालू राहणार आहे. ह्या अवाढव्य रंगमंचावर आपली 'एन्ट्री' मध्येच केव्हातरी होते आणि 'एक्झिट'ही. हे नाटक किती वर्षांचं, ते माहीत नाही. चाळिशी, पन्नाशी, साठी, सत्तरी..... सगळं अज्ञात. धडधाकट भूमिका मिळणार, की जन्मांधळेपणा, अपंगत्व, बुद्धीचं वरदान लाभणार, की मतिमंद?
भूमिकाही माहीत नाही.
तरी माणसाचा गर्व, दंभ, लालसा... किती सांगावं?
कृष्णानं बासरीसहित आपल्याला पाठवलं; पण त्या सहा छिद्रांतून संगीत जन्माला येत नाही.षड्रिपूंचेच अवतार प्रकट होतात.
स्वत:ला काहीही कमी नाही. स्वास्थ्याला धक्का लागलेला नाही. तरी माणसं संसार सजवू शकत नाहीत.

आपण सारे अर्जुनच

बुकर पुरस्काराच्या स्पर्धेत अमिताव घोष

मॅन बुकर आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी यंदा १० लेखकांच्या नावांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली असून त्यामध्ये अमिताव घोष या एकमेव भारतीय लेखकाने स्थान मिळविले आहे.

कोलकातामध्ये जन्मलेल्या अमिताव घोष (५८) यांची 'सी ऑफ पॉपीज'साठी २००८च्या बुकर पुरस्कारासाठीच्या यादीत निवड झाली होती. मात्र त्यांना या पुरस्काराने हुलकावणी दिली होती. बुकर पुरस्कार विजेत्याची निवड केवळ निवड मंडळच करते. त्यामध्ये प्रकाशकांचा कोणताही सहभाग नसतो. लिबिया, मोझम्बिक, ग्वाण्डेलोप, हंगेरी, दक्षिण आफ्रिका आणि कोंगो या देशांमधील अन्य लेखकांचा सदर यादीत समावेश आहे.

अखिल शर्मा यांना ब्रिटनचा फोलिओ साहित्य पुरस्कार

भारतीय - अमेरिका कादंबरीकार अखिल शर्मा यांनी ब्रिटनमधील प्रतिष्ठेचे २०१५ चे फोलिओ साहित्य पारितोषिक पटकावले आहे. दिल्लीत जन्मलेल्या अखिल शर्मा यांच्या निम आत्मचरित्रात्मक अशा 'फॅमिली लाईफ' या कादंबरीला हा पुरस्कार मिळाला असून, मूळ भारतीय असलेला अमेरिकेत स्थलांतरित झालेला गरीब मुलगा श्रीमंत होतो, असे त्याचे कथानक आहे.

मुस्लिम विद्यार्थिनीने जिंकली भगवद्गीता स्पर्धा

मरियम आसिफ सिद्दीकी (वय १२) या सहावीत शिकणाऱ्या मुलीने भगवद्गीता स्पर्धा जिंकून एकतेचा संदेश दिला आहे. विशेष म्हणजे १९५ शाळांतील साडेचार हजारापेक्षा अधिक सहभागी स्पर्धकांमधून मरियमने ही स्पर्धा जिंकली.

'इस्कॉन'च्या वतीने भगवद्गीतेसंदर्भात स्पर्धा घेण्यात आली. यावेळी प्रश्नपत्रिकेद्वारे विद्यार्थ्यांचे भगवद्गीतेविषयीचे ज्ञान तसेच भगवद्गीतेचे आकलन तपासण्यात आले. १०० गुणांच्या या चाचणीत मीरा भाईंदर येथील कॉस्मोपॉलिटन हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या मरियमने पहिला क्रमांक मिळवीत साऱ्यांना आश्चर्याचा धक्का दिला. यापूर्वी मरियमने बायबल आणि कुराण वाचलेले असून, विविध व्याख्यानांसही ती उपस्थित राहते.

प्रकाशक काकडे यांना रा.ज. देशमुख पुरस्कार

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या रा.ज.देशमुख या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी यावर्षी अमोल प्रकाशन या संस्थेचे संचालक संजय काकडे यांची निवड करण्यात आली आहे.

काकडे यांनी गेल्या तीस वर्षांत कथासंग्रह, कादंबऱ्या, तसेच संस्कारक्षम अशा बालसाहित्याचे प्रकाशन केले आहे.

राष्ट्रीय पुरस्कार मराठी 'कोर्टा'त

संख्यात्मक विस्तारातूनही गुणात्मक निर्मिती करून राष्ट्रीय पुरस्कारांवर छाप पाडण्याची परंपरा यंदाही मराठी चित्रपटांनी राखली आहे. ६२ व्या राष्ट्रीय चित्रपट स्पर्धेत चैतन्य माम्हाणे दिग्दर्शित 'कोर्ट' या मराठी चित्रपटाला 'सुवर्णकमळा'चा सर्वोच्च बहुमान मिळाला. 'किल्ला' या चित्रपटाला मराठी चित्रपटाचा, तर 'एलिझाबेथ एकादशी'ला बालचित्रपटाचा मान मिळाला.

न्यायव्यवस्थेतील त्रुटींवर प्रकाश टाकणाऱ्या कोर्ट या चित्रपटाचे देशविदेशातील अनेक महोत्सवांत कौतुक होत आहे. हिंदीमध्ये 'क्वीन' या चित्रपटातील भूमिकेसाठी कंगना राणावत हिला सर्वोकृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. राणावतला २०१० साली प्रदर्शित झालेल्या 'फॅशन' चित्रपटातील भूमिकेसाठीही सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला होता.

'नानू अवनल्ला अवळू' या कन्नड चित्रपटात एका पुरुषाच्या शरीरात अडकलेल्या स्त्रीची भूमिका प्रभावीपणे निभावल्याबद्दल विजय या अभिनेत्याला पुरस्कार जाहीर झाला.

शाहीद कपूरची प्रमुख भूमिका असलेल्या आणि जम्मू-काश्मीरमधील

संघर्षाच्या पार्श्वभूमीवर चित्रित केलेल्या 'हैदर' या हिंदी चित्रपटाला पाच पुरस्कार मिळाले. ईशान्य भारतीय मुष्टियोद्धी मेरी कोम हिची प्रमुख भूमिका असलेल्या 'मेरी कोम' या चित्रपटाला सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ३ मे रोजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झाले.

'चतुष्कोन' या बंगाली चित्रपटासाठी श्रीजित मुखर्जी यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार मिळाला. या चित्रपटात चार दिग्दर्शकांनी चार लघुपट काढण्यासाठी घेतलेल्या प्रयत्नांची कहाणी सांगितली आहे.

''पुरस्कार जाहीर झाल्यावर सर्वप्रथम मनात आले की या बातमीची याहून चांगली वेळ असू शकत नाही. पुरस्काराची घोषणा चित्रपटाला मोठे प्रोत्साहन आणि चालना देणारी आहे. कितीही पैसे खर्चून हा मान आणि ही प्रसिद्धी मिळाली नसती. आता बरेच प्रेक्षक चित्रपट पाहतील अशी आशा आहे. नवखे कलाकार असलेला हा एका स्वतंत्र चित्रपट असल्याचा मला आनंद आहे. अर्थातच, हा मोठा सन्मान असून आम्हां सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का बसला आहे.'' असे चैतन्य ताम्हाणे म्हणाले.

अनंत बागाईतकर यांना भिडे पुरस्कार

पत्रकार वरुणराज भिडे मित्रमंडळाच्या वतीने दरवर्षी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यंदा पुरस्काराचे पंधरावे वर्ष आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यंदाचा मुख्य पुरस्कार सकाळचे दिल्ली प्रतिनिधी अनंत बागाईतकर यांना प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. आश्वासक पत्रकारितेचा पुरस्कार 'महाराष्ट्र टाइम्स'च्या कोल्हापूर आवृत्तीचे मुख्य बातमीदार गुरुबाळ माळी, सुनील राऊत (लोकमत, पुणे) आणि सरिता कौशिक (एबीपी माझा, नागपूर) यांना देण्यात आले. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

कार्यक्रमात दरवर्षीप्रमाणे पुणे विद्यापीठाच्या पत्रकारिता पदविका अभ्यासक्रमात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यासह 'चालू घडामोडी' या विषयात विशेष प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली गेली.

राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांसाठी नामांकने

बावन्नाव्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांसाठी 'एलिझाबेथ एकादशी', 'नागरिक', 'लोकमान्य-एक युगपुरुष', 'ख्वाडा', 'हॅपी जर्नी', 'एक हजाराची नोट', 'सुराज्य', 'सलाम', 'रमा माधव' व 'पोश्टर बॉइज' या दहा चित्रपटांमध्ये मोठी चुरस आहे.

प्रथम पदार्पण चित्रपट निर्मितीकरिता 'काकण', 'दुसरी गोष्ट' आणि 'ख्वाडा' या तीन चित्रपटांचे आणि प्रथम पदार्पण दिग्दर्शनासाठी 'पोस्टर बॉइज', 'नागरिक' आणि 'ख्वाडा' यांचे नामांकन करण्यात आले आहे.

अंतिम घोषित पारितोषिके

उत्कृष्ट कला दिग्दर्शन : तेजस मोडक, प्रशांत बिडकर आणि अजय शर्मा (हॅप्पी जर्नी),
उत्कृष्ट छायालेखन: देवेंद्र गोलतकर (नागरिक),
उत्कृष्ट संकलन : जयंत जठार (हॅप्पी जर्नी),
उत्कृष्ट ध्वनिमुद्रण : प्रमोद थॉमस (हॅप्पी जर्नी),
उत्कृष्ट वेशभूषा : भाऊसाहेब शिंदे (ख्वाडा),
उत्कृष्ट रंगभूषा : राजू अंबूलकर (ख्वाडा),
उत्कृष्ट जाहिरात: हिमांशू नंदा आणि राहुल नंदा (दुसरी गोष्ट),
उत्कृष्ट बालकलाकार : आशुतोष गायकवाड (काकण).

प्रा. कृष्णा गुरव यांना पुरस्कार

कोलकाता येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ओरिएंटल हेरिटेज या संस्थेतर्फे ३८ व्या वर्धापनदिनानिमित्त दिल्लीमध्ये आयोजित केलेल्या महोत्सवात प्रा. कृष्णा गुरव यांना स्वामी विवेकानंद पुरस्कार देण्यात आला. आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि प्राचीन संत साहित्य संशोधनामध्ये गेल्या चाळीस वर्षांपासून सक्रिय असलेल्या गुरव यांच्या कार्याचा सन्मान डॉ. रामकृष्ण शास्त्री आणि कुलपती डॉ. सत्यनारायण चक्रवर्ती यांच्या हस्ते करण्यात आला.

प्रा. कृष्णा गुरव यांनी वयाच्या २९ व्या वर्षीच प्राध्यापकपदाचे त्यागपत्र दिले आणि कोल्हापूर सोडून संत ज्ञानेश्वरांची समाधी भूमी आळंदी आणि जन्मभूमी आपेगाव आणि त्यानंतर हिमालयात पाच वर्षे ज्ञान-साधनाविश्वात

व्यतीत केली. १९७९ साली कोल्हापूरला येऊन त्यांनी 'पश्यंती विद्यावलय' ही अध्यात्मिक संस्था स्थापन केली. गेल्या ३८ वर्षांपासून ते आध्यात्मिक, आणि प्राचीन संत साहित्य संशोधनविषयक कार्य करीत आहेत.

वनराई दिवाळी अंकाला पुरस्कार

मुंबई मराठी पत्रकार संघ व रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने झालेल्या १४ व्या राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेत वनराई दिवाळी अंक सर्वोत्कृष्ट ठरला. सांस्कृतिक कार्यमंत्री विनोद तावडे व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते अंकाचे संपादक अमित वाडेकर यांनी पारितोषिक स्वीकारले. शाश्वत शेती या विषयावरील या अंकात माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. एम. एस. स्वामीनाथन, डॉ. माधव गाडगीळ या अभ्यासकांच्या लेखांचा समावेश होता.

प्रभावळकर यांना जीवनगौरव

राजा परांजपे प्रतिष्ठानच्या वतीने सहाव्या महोत्सवाचे १४ ते २० एप्रिल दरम्यान आयोजन करण्यात आले होते. महोत्सवांतर्गत राजा परांजपे जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना देण्यात आला, मृणाल कुलकर्णी, भरत जाधव, आदित्य सरपोतदार, गुरु ठाकूर यांना सन्मान पुरस्कार देण्यात आले. राजा परांजपे यांच्या स्मृतींचे जतन करून त्यांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला हस्तांतर करावा, या साठी वीस एप्रिलला १०५ वी जयंती साजरी करण्यात आली. अभिनेत्री रिमा यांच्या हस्ते १४ एप्रिलला महोत्सवाचे उद्‌घाटन झाले.

ज्येष्ठ अभिनेते श्रीकांत मोघे यांच्या हस्ते दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या वेळी सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे उपस्थित होते.

महोत्सवात राजा परांजपे यांचे लाखाची गोष्ट, पाठलाग, सुवासिनी, पडछाया, ऊनपाऊस, जगाच्या पाठीवर, पेडगावचे शहाणे आदी चित्रपट दाखविण्यात आले.

★

१२वी आवृत्ती

वळीव



लेखक
शंकर पाटील

किंमत - १२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

पावसाचं आणि शंकर पाटलांचं एक नातं आहे. ते एकदा म्हणाले होते, 'पाऊस म्हणजे माझा जिवलग दोस्त! उन्हाची खाई उसळली की माझी तगमग सुरू होते. अगदी गुदमरल्यासारखं वाटतं; पण पाऊस एकदा का कोसळू लागला, की माझ्या चित्तवृत्ती उल्हसित होतात.'
त्यांचं म्हणणं खरं आहे. 'आभाळ', 'वळीव' अशा कितीतरी कथांतून पावसाची विविध रूपं त्यांनी चित्रित केली आहेत. झिमझिम पाऊस, ताशा बडवत राहिलेला पाऊस, काठी टेकत येणारा पाऊस, धुवाधार पाऊस, थट्टेखोर पाऊस, गारांचा सडा टाकून घेरणारा पाऊस... पण पाऊस अंगावर झेलण्यात एक अपूर्व आनंद आहे! मला विनोबांची पावसातली एक सभा आठवते. पाऊस झिमझिम पडू लागला तशी ते म्हणाले होते, 'मला विलक्षण आनंद होतो आहे. जणू परमेश्वरच आपल्या सहस्रधारांनी या धरतीला कडाडून मिठी मारत आहे. पावसाचा स्पर्श म्हणजे परमेश्वराचा स्पर्श!'

–भालचंद्र फडके

घुमान संमेलन क्षणचित्रे

संमेलनपूर्व कविसंमेलन

जगण्यातून आलेला काव्यात्म अनुभव, शेती, राजकारण आणि समाजकारणावर मार्मिक भाष्य करीत कधी अंतर्मुख करायला लावणाऱ्या तर कधी व्यंगातून बोट ठेवत सादर झालेल्या बहारदार कवितांनी संमेलनपूर्व कविसंमेलन रंगले.

८८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संयोजन समितीतर्फे राज्यस्तरीय कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. नारायण धांडे, अशोक नायगावकर, लता ऐवळे, डॉ. विठ्ठल वाघ, बंडा जोशी आणि वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांचा कविसंमेलनात सहभाग होता. 'अभिजात' या साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेचे प्रकाशन सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते झाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते अंकुश काकडे, डॉ. माधवी वैद्य, सरहद संस्थेचे संजय नहार, स्वागताध्यक्ष भारत देसडला, स्मरणिकेचे संपादक सदा डुंबरे आणि युनिक फीचर्सचे आनंद अवधानी या वेळी उपस्थित होते. डॉ. मुजुमदार म्हणाले, गणेशोत्सव आणि साहित्य संमेलन हे मराठी मनाला भावणारे उत्सव आहेत. घुमानमुळे मराठी ही पंजाबी या भाषा भगिनीला भेटणार आहे. या संमेलनामुळे साने गुरुजींची आंतरभारतीची संकल्पना खऱ्या अर्थाने साकारली जात आहे. पंजाब सरकारच्या सहकार्यामुळे या संमेलनाची उंची वाढली आहे. अभिजात ही केवळ स्मरणिका नाही तर, तिला ग्रंथाचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे तिचे स्थान ग्रंथालयामध्ये असणे आवश्यक आहे.

'रानकविता नाही भाऊ, इथं जगण्यासाठी जीवाचं रान करावं लागतं' ही भावना नारायण धांडे यांनी कवितेतून मांडली. अशोक नायगावकर यांनी

पाणी आणि ओपन जेल या कविता सादर केल्या. लता ऐवळे यांच्या बाप या कवितेने हेलावून टाकले.

रसिकांचे भांगडा, पंजाबी पद्धतीने स्वागत

संतश्रेष्ठ नामदेवनगरी, घुमान येथे मराठी साहित्य संमेलनासाठी अमृतसरहून घुमानला जाताना ठिकठिकाणी पंजाबी पद्धतीने होणारे स्वागत पाहून आपण एखाद्या पंजाबच्या कार्यक्रमाला आलो आहोत का असा प्रश्न पडला नसेल तर नवलच. मात्र अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या साहित्य रसिकांचे स्वागत करणारी कमान पाहून आणि खास पंजाबी रीतिरिवाजाप्रमाणे झालेले स्वागत पाहून मराठी बांधवही भारावून गेले. नामदेवांच्या घुमाननगरीमध्ये भरलेल्या साहित्य संमेलनामध्ये साहित्यिक सांस्कृतिक मनोमिलन संमेलनाच्या निमित्ताने पाहायला मिळाले.

साहित्य संमेलनाच्या ठिकाणी पंजाबी आणि मराठीतून होत असलेले सूत्रसंचालन, पंजाबी साहित्यिकांनी नोंदवलेली उपस्थिती, भांगडाचे कानांवर पडणारे सूर, दोन्ही राज्यांच्या संस्कृतीच्या मनोमिलनाचे दर्शन या संमेलनात दिसत होते. शेकडो स्वयंसेवक काम करत होते. मराठी साहित्य संमेलन म्हणजे केवळ मराठी माणसांचं असं काहीसं समीकरण झालं आहे. मात्र घुमानच्या संमेलनाला अनेक पंजाबी लोकही उद्घाटन सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. साहित्य संमेलनाच्या मुख्य मंडपाबाहेर नाशिकहून आलेले खास ध्वजपथक आपल्या अनेक कला पंजाबी लोकांना दाखवत होते. तर पंजाबी लोक त्याच ठिकाणी आपल्या भांगड्याचं दर्शन घडवत होते. मराठी आणि पंजाबी साहित्यिक एकाच मंडपाखाली एकत्र आल्याने वैचारिक देवाण-घेवाणही पाहायला मिळत होती.

संत नामदेवांचे पंजाबशी, तर गुरू गोविंदसिंगांचे महाराष्ट्राशी नाते

संमेलनाचे महत्त्व केवळ महाराष्ट्र आणि पंजाबपुरते मर्यादित नाही. देशात शांती, सलोखा निर्माण होण्यासाठी आणि एकात्मता प्रस्थापित होण्यासाठी संमेलनाचा उपयोग होईल, असा विश्वास पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांनी व्यक्त केला. संत नामदेवांच्या भूमीत साहित्य संमेलनाच्या आयोजनाबद्दल आभार व्यक्त करत प्रकाशसिंग बादल यांनी भावपूर्ण भाषण केले. संत नामदेवांच्या नावे घुमानमध्ये महाविद्यालय सुरू करण्याबरोबरच घुमानचा विकास आराखडा तयार करण्याची घोषणा केली.

‘पुन्हा या ठिकाणी याल तेव्हा तुम्हाला नवीन घुमान पाहायला मिळेल,’ अशी ग्वाही त्यांनी दिली.

बादल म्हणाले, ‘‘आजचा दिवस माझ्यासाठी ऐतिहासिक आणि पवित्र आहे. संयोजकांनी मराठी साहित्य संमेलनासाठी घुमान ही संत नामदेवांची कर्मभूमी स्थळ म्हणून निवडली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आपला देश खूप मोठा आहे. वेगवेगळे धर्म, बोलीभाषा आहेत. हे सर्व धर्म एकात्मतेच्या एका माळेत गुंफले गेले पाहिजेत. हे संमेलन त्याचे निदर्शक आहे. संत नामदेव यांनी येथे २० वर्षे वास्तव्य केले. मराठी साहित्य संमेलन जसे पंजाबमध्ये झाले, तसे पंजाबी साहित्य संमेलन महाराष्ट्रात झाले पाहिजे. जसे संत नामदेव पंजाबमध्ये आले, तसे गुरू गोविंदसिंग यांचेही महाराष्ट्राशी नाते आहे. हे पवित्र संबंध या पुढील काळातही दोन्ही राज्यांत कायम राहतील. महाराष्ट्राशी सांस्कृतिक संबंध तर आहेच; परंतु जाती संबंधदेखील आहेत. शरद पवार आणि नितीन गडकरी यांनी पंजाबला भरभरून मदत केली आहे. गडकरी यांनी रस्त्यांच्या रूपाने, तर पवार यांनी ते कृषिमंत्री असताना धान्य संशोधन संस्था आमच्या राज्याला दिली. आता संमेलनाच्या माध्यमातून साहित्यिक संबंधही दृढझाले आहेत.

शीख धर्मीयांमध्ये संत नामदेवांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे घुमानमध्ये त्यांच्या नावाने सरकार एक महाविद्यालय सुरू करणार आहे. त्यासाठी दहा एकर जमीन आणि बारा कोटी रुपये देण्याची घोषणा बादल यांनी केली.

‘‘संत नामदेव बाणी, त्यांचे चरित्र यावर संशोधन होण्याची गरज बादल यांनी व्यक्त केली. त्यासाठी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी आम्हाला विद्वान व्यक्ती उपलब्ध करून द्याव्यात. त्यांची सर्व व्यवस्था आम्ही करू. या संशोधनासाठी केंद्र सुरू करण्याची सरकारची तयारी आहे.’’ असेही बादल यांनी स्पष्ट केले.

ग्रंथदिंडी

महाराष्ट्रीय पारंपरिक पेहरावातील मराठी साहित्यप्रेमी आणि संत नामदेवांच्या गुणगानात रमलेला पंजाबी पारंपरिक वेषातील शीख समुदाय... असे सांस्कृतिक संगमाचे चित्र ग्रंथदिंडीच्या निमित्ताने पाहायला मिळाले.

घुमानमधील नामदेवबाबा गुरुद्वारापासून दुपारी दोनच्या सुमारास ग्रंथदिंडीस प्रारंभ झाला. संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, स्वागताध्यक्ष भारत

देसडला, साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा माधवी वैद्य यांनी ग्रंथावर पुष्पवर्षाव केल्यावर दिंडीला सुरुवात झाली. रस्तोरस्ती काढलेल्या सुबक रांगोळ्या लक्ष वेधून घेत होत्या. शीख समुदायाचा सहभाग, त्यांचे ढोलपथक, भांगडा, टाळ-मृदंगाच्या निनादात दिंडी पुढे सरकत होती. गावातील शीख बांधव रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून संत नामदेवांना हात जोडून नमस्कार करीत होते. दिंडीतील मराठी आणि शीख बांधवांवर पुष्पवर्षाव करण्यासाठी व्यवस्थाही करण्यात आली होती. दुपारी तीनच्या सुमारास नामदेवनगरीत दिंडीने प्रवेश केल्यानंतर सहभागी मराठी साहित्य रसिकांनी रिंगण करून फुगड्या खेळल्या. टाळ-मृदंगांच्या ठेक्यात नामदेव नामाचा गजर करण्यात आला.

हा साहित्य सोहळा डोळ्यांत सामावण्यासाठी शीख बांधव घुमान आणि परिसरातून नामदेवनगरीत मोठ्या संख्येने आले होते. नामदेवबाबांच्या भेटीला महाराष्ट्र लोटल्याची भावना ते व्यक्त करीत होते. प्रथमच मराठी साहित्य संमेलन अनुभवणाऱ्या येथील नागरिकांनी आपल्या मोबाइलमध्येही या सोहळ्याचे चित्रण करून घेतले. मावळते संमेलनाध्यक्ष फ. मुं. शिंदे यांनी पुस्तक प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

संतांचा व्यवहारवाद देव्हाऱ्यात

विद्रोहातून, परिस्थितीवर मात करीत जनकल्याण या उदात्त भावनेतून संत साहित्याची निर्मिती झाली. संत साहित्य आत्मसात करणे, म्हणजे विश्वरूप होऊन जगणे होय. यातून मिळालेले आत्मज्ञान मिळविणे आणि पुढे जात राहणे हा संत साहित्याचा मूळ हेतू आहे. आपल्यापुरता संत साहित्याचा विचार न ठेवता, संत साहित्यातून मिळालेले आत्मज्ञान जनसामान्यापर्यंत नेण्याची गरज आहे,' असा सूर 'संत साहित्य देव्हाऱ्यातच, व्यवहारात का नाही?' या परिसंवादात उमटला.

परिसंवादातील वक्ते डॉ. संजयकुमार करंदीकर, बाळ कुलकर्णी, प्रा. ललित अधाने आणि सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील उपस्थित होते. पाटील म्हणाले, 'जे उत्तम आहे. जे उदात्त आहे हे स्वीकारण्याची तयारी आपण ठेवली पाहिजे. संत साहित्याने हीच शिकवण दिली आहे. या शिकवणीचे पालन केले तर, व्यवहारातही संत साहित्य अव्वल ठरेल. देव्हाऱ्यात काय ठेवायचे आणि व्यवहारात काय ठेवायचे हे पूर्वीपासून संतांनी सांगितले आहे. हे सर्वांपर्यंत गेले की अनेक प्रश्न सुटतील.'

‘संतसाहित्य निर्माण झाले तो काळ विचारात घेण्याची गरज आहे. काळानुरूप संदर्भ आणि विचारांचे नाते काय आहे हे समजून घ्यायला हवे. देव्हारा म्हणजे देह, हे समजून घेतले तर एखाद्यापुरतेच संतसाहित्य न ठेवता ते जनसामान्यांसाठी त्यांच्या देहापर्यंत नेण्याची गरज आहे. संतसाहित्य आजच्या तत्त्वज्ञान आणि जीवन जगण्याचा पद्धतीला पुरून उरेल असे आहे. समाजव्यवस्थेचे चित्र संतसाहित्यातून स्पष्ट होते,’ असे अधाने म्हणाले.

‘संतसाहित्य कशासाठी निर्माण झाले याचा विचार होताना दिसत नाही. परमेश्वर म्हणजे कोण याची व्याख्या संतसाहित्याशिवाय कोठेही नाही. कारण संतसाहित्याचे लोकशाहीकरण आजही प्रभावी ठरताना दिसते. म्हणूनच आज जी परमेश्वराची संकल्पना दिसते, तीत परमेश्वराची कल्पना आणि भावना यात प्रचंड फरक आहे. हाच गोंधळ असल्याने संतसाहित्य देव्हाऱ्यात की व्यवहारात हा प्रश्न निर्माण होतो. जोपर्यंत संतसाहित्य घराघरापर्यंत जात नाही आणि त्याचा अर्थ मानवी रूपातील देहात उतरत नाही, तोपर्यंत हा प्रश्न कायम राहाणार आहे. संतसाहित्यामुळे आत्मज्ञान प्राप्त झालेला माणूस चांगला समाज निर्माण करू शकतो. संतसाहित्य डोळे उघडायला मदत करते. हे साहित्य प्रत्येकापर्यंत जाईल यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.’ असे कुलकर्णी म्हणाले.

शेकडो वर्षांपूर्वी निर्माण झालेले संतसाहित्य आजही आपल्या जीवनाचा भाग आहे. मग ते देव्हाऱ्यात कसे? आजही संतसाहित्य आपल्या संकल्पनांना नवचैतन्य देत असेल, तर त्याचा प्रभाव आपल्या मनावर आणि जीवन शैलीवर कायम आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि उदात्त जीवनमूल्यांचा ऱ्हास होत असल्याने संतसाहित्य व्यवहारात, उपयोगी पडत नाही, अशी ओरड होताना दिसते. आपण जे काही चांगले करतो, त्यामागे संत साहित्याची शिकवण आहे हे विसरून चालणार नाही, असे डॉ. संजयकुमार करंदीकर म्हणाले.

‘भारतीय भाषांतील स्नेहबंध आणि अनुवाद’

अनुवादामुळे स्वभाषेचा विकास होण्याबरोबरच आपण नव्या संस्कृतीशीही जोडले जातो. विविध भाषांमध्ये मराठी साहित्य अनुवादित झाले पाहिजे. तसेच अनुवादकांनी नवतंत्रज्ञानाची ओळख करून घेतली पाहिजे, असा सूर ‘भारतीय भाषांतील स्नेहबंध आणि अनुवाद’ या विषयावरील परिसंवादात व्यक्त झाला. अध्यक्षस्थानी डॉ. उमा कुलकर्णी

होत्या. श्रीराम पवार, डॉ. अशोक पळवेकर, डॉ. जगदीश कदम, रेखा देशपांडे यांनी या परिसंवादात भाग घेतला.

पवार म्हणाले, ''इंग्रजी साहित्याचे सर्व भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले. परंतु वेगवेगळ्या राज्यांतील भारतीय भाषांचे अनुवाद देशी भाषांमध्ये कमी झाले. अन्य राज्यांच्या भाषांशी स्नेहबंध जोडायचा असेल, तर अनुवाद हे आवश्यक आहेत. इतर भाषांचे मराठीत अनुवाद होतात, तसे विविध भाषांमध्ये मराठी साहित्य अनुवादित झाले पाहिजे. त्यातूनच भाषांमध्येही अनुबंध निर्माण होतील. सध्या सर्वच गोष्टींचे तंत्रज्ञानात रूपांतर होत आहे. भाषांतरासाठी देखील तंत्रज्ञानाचा प्रयोग होत आहे. परंतु दर्जेदार आणि सर्जनात्मक अनुवादकाची गरज संपलेली नाही. ती अबाधित आहे. मात्र तंत्रज्ञान ज्या वेगाने बदलत आहे, ते पाहता अनुवादकांनी त्याची ओळख करून घेतली पाहिजे.''

डॉ. कदम म्हणाले, ''अनुवादामध्ये जीवनमूल्यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे अनुवाद म्हणजे अनुवादकाची निर्मिती असते. मला पंजाबी साहित्याचा अनुवाद मराठीत करायचा असेल, तर त्यांची संस्कृती समजली पाहिजे. म्हणजेच अनुवादामुळे स्वभाषेचा विकास होण्याबरोबरच आपण नव्या संस्कृतीशी जोडलेही जातो.''

डॉ. पळवेकर म्हणाले, ''एका शब्दाला पर्यायी शब्द जोडणे म्हणजे अनुवाद नाही. ते अनुवादकाचे काम नाही. कारण तो मानवी मूल्यांचा वाहक आहे. त्याला दुय्यम स्थान देणे अयोग्य आहे.''

रेखा देशपांडे म्हणाल्या, ''अनुवाद ही सर्जनात्मक प्रक्रिया आहे, याला आपण मान्यताच दिलेली नाही. अनुवाद म्हणजे सर्जन आणि संशोधन-देखील आहे. एखाद्या समाजाचे पुस्तक अनुवादित करायचे असेल, तर त्यांच्या संकल्पनांचा शोध घ्यावा लागतो. साहित्याची भाषा आणि अनुवादाची भाषा या दोन्हींची रूपे वेगळी असतात. त्यांचे अंतरंग समजून घेतले. तरच अचूक अनुवाद होऊ शकतो.''

मराठीच्या संवर्धनासाठी ठोस पावले उचलावीत

या संमेलनाच्या निमित्ताने केवळ साहित्यप्रसाराची आणि भागवतधर्माची पताकाच पुन्हा फडकवली जात नाही, तर महाराष्ट्र-पंजाब मैत्रीचे, दोन विभिन्न संस्कृतींच्या संगमाचे नवे पर्व सुरू होत आहे. अनेक संत महात्म्यांनी भागवतधर्माचा, मानवतेचा प्रसार केला. संत नामदेवांनी तर वारकरी

संप्रदायाची पताका उत्तर भारतात फडकविली. त्यांनी केलेल्या अमोल कार्याची प्रचिती आज येत आहे.

नवी पिढी संतांची शिकवणच नाही, तर मराठी भाषाच विसरत चालली आहे. मुंबईत १९६० मध्ये ५२ टक्के लोक मराठी भाषक होते; आज तीच संख्या २२ टक्क्यांवर आली आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक या भागांतही हे प्रमाण खालावले आहे. मराठी शाळा शहरातून हद्दपार होत आहेत. मराठी शाळेत शिकणे हा नव्या पिढीला कमीपणा वाटतो. विमानप्रवास, कलाक्षेत्रे, शॉपिंग मॉल, कॉर्पोरेट ऑफिस वगैरे ठिकाणी दोन मराठी माणसेही परस्परांशी मराठीत बोलत नाहीत. दाक्षिणात्य राज्यांनी हेतूपूर्वक भाषिक संस्कृती जतन केली आहे. त्यांनी इंग्रजीही उत्तमरीत्या आत्मसात केली आहे आणि स्वभाषेचाही पुरस्कार केला आहे. मराठी माणूस मात्र असे संतुलन राखण्यात कमी पडतो. मराठी अस्मिता जपण्यासाठी – तिचे संवर्धन करण्यासाठी सरकारकडून ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने याबाबत तातडीने कार्यवाही करणे अपेक्षित आहे शरद पवार असे म्हणाले.

मराठी ही केवळ ज्ञानभाषा न राहता ती विज्ञानभाषा होणे गरजेचे आहे. विज्ञानासंबंधी सुबोधपणे लिहिणारे डॉ. जंयत नारळीकर, डॉ. बाळ फोंडके, निरंजन घाटे ही मंडळी महत्त्वाचे कार्य करीत आहेत. यंदा साहित्य अकादमीचा पुरस्कार डॉ. नारळीकर यांच्या 'चार नगरांतले माझे विश्व' या ग्रंथाला मिळाला. एका वैज्ञानिकाच्या साहित्यप्रतिभेचा गौरव होणे, हे मराठी माणसासाठी भूषणावह आहे. तसेच मराठी भाषेच्या संवर्धनाचा हा शुभसंकेत आहे. 'कोसला'कार डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीला यंदाचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळाला. साहित्य हा मराठी भाषेसाठी समृद्ध खजिना आहे. पाश्चात्त्य भाषांतील लेखकांना त्यांची का अडगळ व्हावी, हे मला उमजत नाही. इंग्रजी भाषेचा दुराग्रह धरणे हे कितपत सयुक्तिक आहे? जर्मनी, रशिया, इटली, फ्रान्स, जपान, चीन, कोरिया अशा प्रगतिशील देशांत स्वदेशी भाषेचा पुरस्कार केला जातो. स्वभाषेचा वापर करून ते देश वैज्ञानिक प्रगतीत, उद्योग व संशोधनात मागे राहिले नाहीत; पण भारतीयांनी भीती का वाटते? असो, 'अमृतातेही पैजा' जिंकणारी मराठी इतक्या लवकर पराभूत होणे नाही. संमेलनाच्या निमित्ताने साहित्यक्षेत्रातील मंडळी येथे एकत्र आलोत, एका वेगळ्या बंधनात सारे

बांधली गेलीत; पण संमेलनाच्या सांगतेनंतर ते पुन्हा आपापल्या मार्गी लागतात; पण माझी विनंती आहे, की पंजाब-महाराष्ट्र नव्या मैत्रीचे हे पर्व सुरू झाले आहे. नामदेवांनी विस्तार केलेल्या या मानवधर्माची पताका सतत फडकावत ठेवणे, हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

पंजाबमध्ये घुमान या तीर्थक्षेत्री मराठी साहित्य संमेलन घ्यायचे निश्चित झाल्यावर वाद, प्रतिवाद आणि युक्तिवाद झाले. पण ते सर्व मागे पडून आता हे संमेलन घुमाननगरीत पार पडत आहे. हे पंजाब आणि महाराष्ट्र यांच्या मिलाफाचे उत्तम उदाहरण आहे. संत नामदेव हे केवळ मराठी संतपुरुष नव्हेत, तर ते राष्ट्रीय संतपुरुष आहेत. संत नामदेव घुमानमध्ये वीस वर्षांपेक्षा अधिक काळ राहिले होते. संत नामदेवांनी केलेले कार्य किती महत्त्वाचे आहे हे या ठिकाणी सांगितलं गेलंच पाहिजे. संत ज्ञानदेवांच्या समाधीकाळात त्या ठिकाणी हजर राहून त्याचं ओवीबद्ध वर्णन नामदेवानी केलं नसतं, तर ज्ञानदेव समाधिस्थ कसे झाले आणि त्यावेळचं वातावरण कसं होतं हे आपल्याला कदाचित कळलंही नसतं.

तुकाराम महाराजांची आणि समर्थ रामदासांची जी भाषा आहे, ती सोपी, सरळ मराठी भाषा आहे. आजच्या पिढीनं ती आत्मसात करण्याची आवश्यकता आहे, म्हणजे किमानपक्षी आपल्याभोवती जो इंग्रजाळलेला प्रबंध आजकाल सर्रास मांडला जात आहे. तो जरा का होईना कमी होईल आणि कविवर्य कुसुमाग्रजांनी मराठी भाषेचे जे सध्याचे स्वरूप वर्णिले आहे, त्यात कदाचित सुधारणा होईल. तुकाराम महाराजांच्याच शब्दांत सांगायचं तर असंही म्हणता येईल की, अक्षरे आणती अंगासी जाणीव । इच्छा ते गौरव पूज्य व्हावे ।।

मराठी साहित्य, मराठी चित्रपट आणि अनेकदा मराठी नाटकांमधूनही राजकीय नेत्यांची ठराविक आणि घासून गुळगुळीत झालेली साचेबद्ध प्रतिमा दाखवली जाते. भारतीय लोकशाहीची आणि राजकारणी बाह्य चौकट तीच असली, तरी गेल्या पन्नास-साठ वर्षांत अंतरंगात खूप बदल झाले आहेत आणि त्यापैकी काही बदल स्वागतार्ह आहेत. जातींच्या किंवा प्रादेशिक वा अन्य अस्मितांचे राजकारण हळूहळू मागे पडत चाललेय. कार्यक्षम राजकीय नेत्याला लोकांचे वाढते पाठबळ मिळताना दिसत आहे. सोशल मीडियामुळे राजकारण आणि समाजजीवनही पूर्वीपेक्षा अधिक पारदर्शी आणि सर्व

सहभागानुकूल बनत आहे.

राजकारणातल्या या सकारात्मक बदलांकडे साहित्यविश्वाने डोळे उघडे ठेवून बघण्याची गरज आहे. तसे झाले तरच या बदलांचे योग्य प्रतिबिंब मराठी साहित्यात, नाटकांमधून व चित्रपटांमधून उमटू शकेल. लोकनुरंजन हा शब्द सामान्यत: राजकीय संदर्भात वापरला जातो. पण जे विकू शकतं. तेच पिकवायचं ही पद्धत बाजारशक्तींच्या प्रभावामुळे साहित्य, नाट्य, चित्रपट क्षेत्रातही रुजली आहे. महाराष्ट्रात पत्रकारितेत वेगळे स्थान निर्माण करणारे कै. श्री.ग. माजगावकर यांनी 'रचनात्मक पत्रकारिता' अशी संकल्पना मांडून नवे प्रयोग केले होते. हा एक प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा प्रयत्न होता. आज असा प्रयत्न सृजनाच्या सर्वच क्षेत्रांत होण्याची गरज आहे. साहित्याने समाजमानस घडवावे, अशी अपेक्षा असते. रचनात्मक भूमिका ठेवून वाङ्मयनिर्मिती झाली, तर ती अपेक्षा आणखी प्रभावी होऊ शकेल.

माध्यमांनी करावा प्रतिशब्दांचा वापर

संत गुरुनानक देव सभागृहात 'दृक-श्राव्य माध्यमांतील संहिता लेखन' यावर आयोजित केलेले अभिरूप न्यायालय स्थगित करून अखेर अँटी चेंबरमध्ये त्यावर चर्चा घेण्यात आली. या चर्चेत न्यायमूर्ती म्हणून निकाल देताना माध्यमांनी कमीत कमी इंग्रजी शब्दांचा वापर करावा, अशी अपेक्षा फुटाणे यांनी व्यक्त केली. प्रसिद्ध साहित्यिक राजन खान, नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी, संहिता लेखक संजय माने, एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर आणि आकाशवाणीच्या रसिका देशमुख कार्यक्रमात सहभागी झाले होते. सुधीर गाडगीळ यांनी त्या सर्वांना मराठी भाषेवर विविध प्रश्न विचारून बोलते केले.

'प्रमाणभाषा असावी का नसावी, यावरून ही चर्चा सुरू झाली. त्याला सर्वांनीच विरोध केला. महाराष्ट्रासारख्या राज्यात अनेक बोली भाषा बोलल्या जातात, त्यामुळे कोणत्याही एका प्रमाणभाषेचा आग्रह धरणे गैर आहे, अशा शब्दांत सर्वांनीच प्रमाण भाषा असू नये. राज्यातील एखादी व्यक्ती ज्या संस्कारात वाढते, तीच त्याची प्रमाणभाषा बनते. त्यामुळे, प्रमाणभाषा हे ढोंगच आहे,' अशी राजन खान यांनी टीका केली. मराठी भाषेत वापरल्या जाणाऱ्या इंग्रजी शब्दांबद्दलही अनेकांनी आक्षेप नोंदविले. परंतु काही शब्दांचा वापर अनिवार्य असेल, मराठीबद्दल आग्रह धरणे उचित ठरेल, पण तसा दुराग्रह केला जाऊ नये, असेही राजीव खांडेकर यांनी स्पष्ट केले.

. ‘मराठी वाहिन्यांनी मुद्रितशोधक नेमावेत’

मराठी वृत्तवाहिन्यांवर बातम्यांदरम्यान अनेक चुका होत असल्याने वृत्तवाहिन्यांनी मुद्रितशोधक नेमावेत अशी सूचना राजन खान यांनी केली. वृत्तवाहिन्यांवर दाखविल्या जाणाऱ्या सदोष शब्दांमुळे नव्या पिढीवर चुकीचे संस्कार होत असल्याने त्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

★

३री आवृत्ती

एकोणिसावी जात

लेखक
महादेव मोरे

किंमत - १६०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



ग्रामीण कथा व कांदबरीकार श्री. महादेव मोरे यांची ही अत्यंत लोकप्रिय ठरलेली ग्रामीण कादंबरी.

अठरापगड जातींच्या पंक्तीत ‘मोटार लायनी’तल्या माणसांची आगळी एकोणिसावी जात बसवून, लेखकानं एक वेगळंच जग साऱ्या तपशिलांनिशी वाचकांसमोर उभं केलं आहे. मुळात हे धगधगीत जीवनानुभवांचं चित्रण आहे.

अनुभव घेण्यातील उस्फूर्तपणा, रोमॅन्टिक वृत्ती, अभिव्यक्तीतील ताजेपणा आणि अत्यंत ओघवती, चित्रदर्शी शैली यांमुळे या कादंबरीतील वास्तव काळजाला भिडतं ....

सचिन तेंडुलकर

प्लेइंग इट माय वे

माझं आत्मचरित्र

झालेत बहु, होतील बहु... परि या सम हाच! क्रिकेट जगातील सर्वोच्च शिखर ठरलेल्या, आपल्या लाडक्या 'सचिन'चा अर्थात 'लिटिल मास्टर' सचिन तेंडुलकरचा प्रांजळ जीवनप्रवास

सहलेखक - बोरिआ मजुमदार

अनुवाद - दीपक कुळकर्णी

लढा : आत्मसन्मानासाठी

ऑस्ट्रेलियाच्या मालिकेनंतर दोन महिन्यांनी जुलै, २००१मध्ये आम्ही हरारेला तिरंगी मालिका खेळायला गेलो. आमच्याविरुद्ध वेस्ट इंडीज व झिंबाब्वे हे दोन संघ होते. दोन महिन्यांच्या मोकळ्या काळात मी कसून व्यायाम केला होता. त्यामुळे मालिकेच्या आधी माझी उत्तम तयारी झाली होती. ऑगस्ट, १९९९ ते जुलै, २००१ हा दोन वर्षांचा काळ माझ्यासाठी कोणत्याही मोठ्या दुखापतीविना गेला. क्रिकेटचा हंगाम नसताना मी केलेल्या नियमित व्यायामामुळे माझ्या फिटनेसमध्ये चांगलीच सुधारणा झाली होती. मी माझ्या आहारावरही नियंत्रण ठेवलं होतं. हा सगळा शिस्त पाळल्याचा फायदा होता. १९९९मध्ये पाठीला झालेली दुखापत हे आता केवळ एक दुःस्वप्न वाटत होतं.

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच मी सुरेख बॅटिंग करत होतो. पहिल्या फेरीच्या चार सामन्यांत मी फक्त एकदा बाद झालो होतो. मी एक शतक आणि दोन अर्धशतकं काढली होती. मला अंतिम सामन्याचे वेध लागले होते. एवढ्यात अतिशय अनपेक्षितपणे मला एक दुखापत झाली. माझ्या कारकिर्दीत मला झालेली ती दुसरी मोठी दुखापत होती.

४ जुलै, २००१ रोजी साखळी फेरीतला आमचा शेवटचा सामना वेस्ट इंडीजविरुद्ध होता. राहुल व मी बॅटिंग करत होतो. विजय आमच्या आवाक्यात आला होता. मॅच जिंकण्यासाठी फक्त २० धावा हव्या होत्या. मी एक चेंडू मिड विकेटच्या दिशेने मारून धावायला सुरुवात केली. इतक्यात माझ्या पायाच्या अंगठ्यात काहीतरी कडकन वाजल्याचं मला जाणवलं. दुसरी धाव पूर्ण करताना मला खूपच त्रास झाला. पुढचा चेंडू टाकण्याआधी मी राहुलला म्हणालो की, ''माझ्या पायाचा अंगठा दुखावला गेला आहे.'' माझं पाऊलही अचानक गरम झालं होतं; पण जिंकायला फारच थोड्या धावांची गरज होती. सामना लवकरात लवकर संपवायचा असं मनाशी ठरवून मी तसाच खेळत राहिलो. सामना जिंकलो, तेव्हा माझ्या १२२ धावा झाल्या होत्या.

सामना संपल्यावर मी आमचा फिजिओथेरेपिस्ट अँड्र्यू लीपसला माझा दुखावलेला अंगठा दाखवला. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही एक्स-रे

काढायला गेलो. तोपर्यंत पावलातल्या वेदना खूपच वाढल्या होत्या. मी नीट चालूही शकत नव्हतो. हॉस्पिटलमध्ये जाताना मी अँड्र्यूला म्हणालो, ''एक्स-रेचा रिपोर्ट तू मला दाखवू नकोस. काही झालं तरी मला अंतिम सामन्यात खेळायचं आहे.'' एक्स-रे काढल्यावर अँड्र्यूचा चेहरा पडला होता. तो मला फक्त एवढंच म्हणाला, ''तुझ्यासारखा वेडा मी पाहिला नाही.''

सामन्याच्या आधी अँड्र्यूने माझा अंगठा दुमडून त्याभोवती करकचून पट्टी बांधली. त्यामुळे अंगठ्याची हालचाल होऊ शकणार नव्हती. वेस्ट इंडीजविरुद्ध जेव्हा मी क्षेत्ररक्षणाला उतरलो तेव्हा माझ्या पावलात असह्य वेदना होत होत्या; पण त्या स्पर्धेत मी भरपूर धावा काढत होतो. माझ्या गोलंदाजी व क्षेत्ररक्षणापेक्षा माझ्या संघाला माझ्या बॅटिंगची जास्त गरज आहे, असा विचार करून मी सामना खेळायचं ठरवलं होतं. तो अंतिम सामना असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व होतं. शिवाय तो सामना मी शेवटपर्यंत खेळू शकेन, असा मला विश्वास वाटत होता. पण एवढी सगळी मेहनत घेऊन मी शून्यावर बाद झालो आणि आम्ही तो सामनाही हरलो. माझा अंगठा आणि पाऊल यांमधील सांध्याजवळच्या हाडाला (सेसामॉइड बोन) दुखापत झाल्याचं एक्स-रेमधून निष्पन्न झालं होतं.

भारतात आल्यावर मला पूर्ण विश्रांतीचा सल्ला देण्यात आला, पण त्यानंतर दोन महिने उलटले तरी दुखापत बरी होण्याचं चिन्ह दिसेना. चालताना होणाऱ्या वेदना जराही कमी झाल्या नव्हत्या. हताश होऊन मी एका तज्ज्ञ डॉक्टरकडे गेलो. त्यांनी मला शस्त्रक्रिया करण्यास सुचवलं. आम्ही ऑपरेशनची तारीखही निश्चित केली; पण अंजलीला ते पटलं नव्हतं. तिने आणखी एका डॉक्टरांचं मत विचारात घ्यायचं ठरवलं. अगदीच नाइलाज असला तर शेवटचा उपाय म्हणून शस्त्रक्रिया करावी, असं अंजलीचं म्हणणं होतं.

आम्ही बॉम्बे हॉस्पिटलमध्ये गेलो. तिथले ज्येष्ठ डॉक्टर ढोलकिया यांची भेट घेतली. त्यांनी मला 'सेसामॉइड बोन्स'वर लिहिलेलं एक जाडजूड पुस्तक दाखवलं. पुस्तकाचा लेखक हा त्या विषयातला जागतिक तज्ज्ञ होता. शस्त्रक्रियेमुळे अशी दुखापत बरी होऊ शकेल याची त्यांनाही पूर्ण खातरी नव्हती. ''तू तुझ्या अंगठ्याला कुणाला हातदेखील लावायला देऊ नकोस,'' असं डॉक्टर ढोलकियांनी मला स्पष्टपणे सांगितलं. कारण शस्त्रक्रियेमुळे

विपरित परिणाम होण्याची शक्यता होती. अंगठा कायमचा निकामी होण्याचा त्यात धोका होता. त्यामुळे मी पुन्हा कधीच क्रिकेट खेळू शकलो नसतो. क्रिकेट न खेळण्याची कल्पनाही मी सहन करू शकत नव्हतो. डॉक्टर ढोलकिया त्या विषयातील पारंगत डॉक्टरचा शोध घेऊ लागले.

काही दिवसांत मी जोहान्सबर्गच्या रोझबँक क्लिनिकमध्ये दाखल झालो होतो. तिथल्या डॉक्टर मार्क फर्ग्युसन यांनी 'सेसामॉइड बोन्स'च्या दुखापतीसाठी अनेक खेळाडूंवर उपचार केले होते. त्यांनी मला 'इनसोल्स' (बुटाच्या आत वापरायचा अतिरिक्त तळवा) वापरायचा सल्ला दिला. त्याचा खूपच फायदा झाला. सुरुवातीला मी १५ मिनिटं चालू शकायचो. एका आठवड्यात मी तासभर चालू लागलो. मुंबईला आल्यावरही मी तोच सराव सुरू ठेवला. आधी जॉगिंग करायचो. मग हळूहळू धावायला सुरुवात केली. क्रिकेटचे बूट घालून धावताना, बुटाखाली खिळे (स्पाइक्स) असल्यामुळे थोडा त्रास होऊ लागला. त्यानंतर मी अंगठ्याखाली स्पाइक्स नसलेले बूट घालून काही महिने सराव केला. हळूहळू दुखापत पूर्ण बरी झाली.

तीन महिने क्रिकेटपासून दूर राहिल्यानंतर योगायोगाने मी दक्षिण आफ्रिकेचाच पहिला क्रिकेटदौरा केला. ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००१मध्ये केलेल्या दौऱ्यात प्रथम आम्ही एकदिवसीय तिरंगी मालिका खेळलो. तिसरा संघ केनियाचा होता. त्यानंतर दक्षिण आफ्रिकेबरोबर तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळली गेली. दौऱ्यातला पहिला सराव सामना १ ऑक्टोबरला निकी ओप्पेनहायमर संघाविरुद्ध होता. पहिलीच मॅच खेळताना मला पायाच्या अंगठ्यात पुन्हा वेदना होऊ लागल्या. नाइलाजाने मला उपचारासाठी मैदान सोडून बाहेर पडावं लागलं.

सुदैवाने आम्ही रँडजेस्फाँटाइन शहरात होतो. तिथून जोहान्सबर्ग फारसं दूर नव्हतं. तीन महिन्यानंतर मी पुन्हा एकदा रोझबँक क्लिनिकमध्ये येऊन पोचलो. तिथल्या डॉक्टरांना भेटल्यानंतर मात्र माझ्या मनाला खूप मोठा दिलासा मिळाला. झालेला प्रकार मुळीच गंभीर नव्हता. डॉक्टरांच्या मते सेसामॉइड बोन्सच्या दुखण्यामध्ये अशा प्रकारच्या वेदना काही काळानंतर किंचित प्रमाणात पुन्हा जाणवण्याची शक्यता असते; पण त्यात काळजी करण्याची काहीच गरज नव्हती. माझ्या मनावरचं मोठं दडपण दूर झालं. मी पुन्हा क्रिकेट खेळायला सज्ज झालो.

तिरंगी मालिकेतला पहिला सामना ५ ऑक्टोबरला जोहान्सबर्गमध्ये

होता. मी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्या मॅचमध्ये शतक काढलं. तो अटीतटीचा सामना खेळताना मी माझी दुखापत साफ विसरून गेलो. फारशा वेदना न होता मी इतका वेळ बॅटिंग करू शकलो, या विचारानेच मनावरचा सगळा ताण नाहीसा झाला. जणूकाही मी नव्याने क्रिकेटला सुरुवात केली होती.

भारताचा दक्षिण आफ्रिका दौरा

दक्षिण आफ्रिका संघाविरुद्ध त्यांच्याच देशात जाऊन खेळणं हेच मुळात आव्हानात्मक असतं. त्यात अंगठ्याची दुखापत नुकतीच बरी झालेली असताना त्यांच्याविरुद्ध खेळावं लागल्यामुळे माझ्यासमोरील आव्हान अधिकच बिकट झालं होतं; पण ब्लॉमफाँटेनमधील नेट प्रॅक्टिसनंतर मला माझ्या बँटिंगबद्दल आत्मविश्वास वाटू लागला. त्या सरावसत्रामध्ये प्रत्येक चेंडू बॅटच्या मधोमध येत होता. आपल्या हातून चूक होऊच शकणार नाही, असा विश्वास मला वाटू लागला.

पहिली कसोटी ३ नोव्हेंबरला सुरू झाली. पहिल्या इनिंगमध्ये मी त्याच सफाईने बॅटिंग केली. आमच्या एकूण ३७९ धावा झाल्या. त्यात माझा वाटा १५५ धावांचा होता. त्या डावात मी स्लिप्समधील क्षेत्ररक्षकांच्या डोक्यावरून पहिल्यांदाच अप्पर कट मारला. माझ्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात त्या शॉटचा मी नियमितपणे वापर करू लागलो. दक्षिण आफ्रिकेचा द्रुतगती गोलंदाज मखाया एन्टिनीला शह देण्यासाठी प्रथम त्या शॉटची कल्पना माझ्या मनात आली. एन्टिनीच्या गोलंदाजीचं वैशिष्ट्य म्हणजे तो आखूड टप्प्यावरूनसुद्धा चेंडू फलंदाजाच्या अंगावर आणू शके. मी विचार केला की, एन्टिनीच्या त्या चेंडूवर जर मी अप्पर कट मारला तर त्याच्या गोलंदाजीची लय बिघडेल. कारण एखादा फलंदाज अशाप्रकारे आपल्यावर प्रतिहल्ला चढवेल याची त्याला कल्पना नसणार. ब्लॉमफाँटेनच्या खेळपट्टीवर चेंडू चांगलाच उसळत होता. थर्ड मॅनला जर क्षेत्ररक्षक ठेवलेला नसेल तर अप्पर कट हा खेळायला अत्यंत सुरक्षित शॉट होता. एन्टिनीच्या चेंडूवर मी शेवटपर्यंत नजर ठेवली. शेवटच्या क्षणी चेंडूच्या वेगवान गतीचा फायदा घेत मी हलकेच तो सिल्प्समधील क्षेत्ररक्षकांच्या डोक्यावरून मारला.

वीरेंद्र सेहवागने त्या सामन्यात कसोटी पदार्पण केलं. पहिल्याच कसोटीत त्याने आक्रमक फलंदाजी केली. दुसऱ्या डावात आम्ही थोडी जरी चांगली बॅटिंग केली असती, तर आम्ही सहज पराभव टाळू शकलो असतो, पण

आगामी

वि.स. खांडेकर यांची डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी संपादित केलेली पुस्तके





दक्षिण आफ्रिकेने नऊ गडी राखून ती कसोटी जिंकली. शॉन पोलॉकने दुसऱ्या डावात ५६ धावा देऊन ६ गडी बाद केले. पहिल्या डावात मी सेहवागबरोबर केलेली भागीदारी हीच आमच्या दृष्टीने एकमेव समाधानाची गोष्ट होती. मला आठवतं, वीरू जेव्हा त्या कसोटी सामन्यात प्रथमच बॅटिंग करायला निघत होता तेव्हा 'तुला कसं वाटतंय' असं मी त्याला विचारलं होतं. 'आपल्या मनावर थोडासा ताण आला आहे,' हे त्याने माझ्यापाशी कबूल केलं. त्यावर लगेच मी त्याला धीर देत म्हटलं की, 'असा ताण येणं स्वाभाविक असतं. आजपर्यंत कसोटी खेळलेला प्रत्येक खेळाडू त्याच मन:स्थितीतून गेलेला आहे. तू तुझ्या नेहमीच्या शैलीत खेळ. खेळपट्टीवर थोडा वेळ टिकून राहिलास की, मनावरचा ताण आपोआप निघून जाईल.' सेहवागने नेमकं तेच केलं व पदार्पणात बहारदार शतक झळकवलं.

घरच्या सुखाची कमतरता

दुसरी कसोटी खेळण्यासाठी आम्ही पोर्ट एलिझाबेथला गेलो. सारा व अर्जुन माझ्यासोबत होते. 'रात्रीच्या जेवणासाठी आम्हाला एखाद्या चांगल्या रेस्टॉरंटचं नाव सुचव,' असं मी आमच्या हॉटेलच्या एका कर्मचाऱ्याला म्हटलं. दिवसभर क्रिकेट खेळल्यानंतर मुलांच्या सहवासात छान वेळ घालवायची तीच एक संधी असायची. त्याने शिफारस केलेलं रेस्टॉरंट खरोखरच चांगलं होतं. तिथे मुलांना खेळण्यासाठी भरपूर मोकळी जागा होती. आम्हाला ते रेस्टॉरंट इतकं आवडलं की, लागोपाठ तीन दिवस आम्ही तिथेच जात राहिलो. मी मुंबईत २००४मध्ये 'तेंडुलकर्स' नावाचं रेस्टॉरंट सुरू केलं. रेस्टॉरंटमध्ये मुलांना खास खेळण्यासाठी जागा ठेवण्याची कल्पना मला खूपच आवडली होती. माझ्या रेस्टॉरंटमध्येही मी तीच कल्पना वापरली.

दौऱ्यावर जेवण कसं मिळणार, हा आम्हा खेळाडूंसमोर महत्त्वाचा प्रश्न असायचा. झिंबाब्वेतील बुलावायोमध्ये किंवा दक्षिण आफ्रिकेतील काही शहरांत काय खावं हेच समजत नसे.

आमचा मुक्काम बुलावायोमध्ये असतानाचा एक प्रसंग मला आठवतो. घरच्या जेवणाच्या आठवणीने आम्ही सर्व जण व्याकूळ झालो होतो. हॉटेलमधला रोजचा एकच ब्रेकफास्ट आणि बेचव अन्न खाऊन आम्ही कंटाळलो होतो. गावातल्या रेस्टॉरंटचा दर्जाही सुमार होता. त्या दिवशी

आमची मॅच बघायला एक भारतीय कुटुंब आलं होतं. समीर दिघे बेधडक त्यांच्यापाशी गेला. ''बऱ्याच दिवसांत आम्ही भारतीय अन्नाची चव चाखलेली नाही. तुम्ही आमची सोय करू शकाल का?'' असं समीरने त्यांना धिटाईने विचारलं.

समीरने ज्याला विचारलं त्या व्यक्तीचं नाव झनकभाई होतं. झनकभाई गुजराती होता व झिंबाब्वेमध्ये स्थायिक झाला होता. त्याने सर्व टीमला रात्री घरी भोजनाचं आमंत्रण दिलं. त्या रात्री झनकभाईच्या घरी सर्वांनी गुजराती पद्धतीचा डाळ, भात व घी यांवर यथेच्छ ताव मारला. प्रत्येकाने अधाशीपणाने भातावर तीन-तीन चमचे तूप ओतून घेतलं. त्यानंतर झनकभाई व त्यांच्या कुटुंबाने आमचा अनेकदा पाहुणचार केला. झिंबाब्वेच्या राज व चेस्टर नाईक आणि दक्षिण आफ्रिकेतील जयेश देसाईंकडेही आम्ही बरेच वेळा घरगुती भोजनाचा लाभ घेतला. ज्या-ज्या वेळी आम्ही त्यांच्या गावी मॅचेस खेळायला जायचो, त्या-त्या वेळी ते मोठ्या प्रेमाने व आपुलकीने आम्हाला घरी बोलावत असत. बऱ्याचदा रवी शास्त्री आमच्याबरोबर जेवायला असे. रवीचे ते फार जुने दोस्त होते. नंतर माझीही त्यांच्याशी मैत्री झाली. त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी केलेलं प्रेमळ आदरातिथ्य मी कधीच विसरू शकणार नाही.

अवास्तव आरोप

१६ नोव्हेंबर, २००१ रोजी सुरू झालेल्या पोर्ट एलिझाबेथ कसोटीत आम्ही चांगली बॅटिंग केली. अखेरच्या दिवशी राहुल द्रविड आणि यष्टिरक्षक दीप दासगुप्ता ह्यांनी केलेल्या भक्कम फलंदाजीमुळे आम्ही आरामात मॅच अनिर्णित ठेवू शकलो, पण तो सामना वेगळ्याच कारणांमुळे गाजला. मॅच रेफ्री माइक डेनिस यांनी माझ्यावर व आणखी पाच भारतीय खेळाडूंवर बेछूट आरोप केले होते.

मॅचच्या तिसऱ्या दिवशी तो प्रसंग घडला होता. त्या दिवशी मी चार षटकं टाकून हर्षल गिब्जची विकेट घेतली होती. मी चेंडूची शिवण वर ठेवून गोलंदाजी करत होतो. माझे चेंडू दोन्ही बाजूंनी स्विंग होत होते. गोलंदाजी करत असताना चेंडूच्या शिवणीवर चिकटलेलं गवत मी अंगठ्याने साफ करत होतो.

त्या दिवशी खेळ संपल्यावर मॅच रेफ्रीने सहा भारतीय खेळाडूंना

चौकशीसाठी बोलावल्याचं आम्हाला सांगण्यात आलं. माझ्यावर चेंडूची स्थिती बदलण्याचा (बॉल टॅम्परिंग) आरोप करण्यात आला. मला प्रचंड धक्का बसला. मी आजपर्यंत अतिशय प्रामाणिकपणे व सचोटीने क्रिकेट खेळलो होतो. कोणत्याही प्रकारचं गैरकृत्य करण्याचा विचारही माझ्या मनात कधी आला नव्हता.

मी मॅच रेफ्रीला भेटून सांगितलं की, मी फक्त चेंडूवरची शिवण स्वच्छ करण्याचा प्रयत्न करत होतो. कायदा कलम ४२-३नुसार चेंडूची शिवण साफ करण्याआधी मी पंचांची परवानगी घेणं आवश्यक होतं. मी परवानगी घेतली नाही, ही माझी चूक होती. ती चूक कबूल करायला मी केव्हाही तयार होतो; पण खेळात खूप गुंतल्यामुळे ती गोष्टच माझ्या लक्षात आली नव्हती. मी माइक डेनिसना असंही म्हटलं की, तुम्ही मैदानावरच्या पंचांशी याबाबत बोलू शकता. दर दोन-तीन षटकानंतर ते चेंडू तपासत होते. चेंडूत झालेला बदल त्यांच्या लगेच लक्षात आला असता. डेनिस मला म्हणाले की, पंचांचा सल्ला घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही. चेंडूची शिवण साफ करणं याचा अर्थ चेंडूचा आकार बदलणं आणि चेंडूची शिवण स्वच्छ केल्याचं तू कबूल केलेलं आहेस.

मला डेनिस यांचं बोलणं फारच विचित्र वाटलं. मैदानापासून ८० यार्डांवरून डेनिस सामना पाहत होते. इतक्या दुरून मैदानावर काय चाललंय याचा नेमका अंदाज ते कसा करू शकतात हे मला समजेना. एकाही पंचाने माझ्याविरुद्ध तक्रार नोंदवली नव्हती. माझ्यावर फसवेगिरीचा आरोप करणं हा माझा अपमान होता. मी हे प्रकरण सहज सोडून द्यायला तयार नव्हतो. मी ते तडीस न्यायचं ठरवलं. 'तुम्ही केलेल्या आरोपाबद्दल मी बीसीसीआयकडे लेखी तक्रार करणार आहे,' असं मी डेनिसना स्पष्टपणे सांगितलं.

माझ्यावर केलेल्या आरोपाव्यतिरिक्त माइक डेनिस यांनी खेळांडूंवर नियंत्रण न ठेवल्याबद्दल सौरव गांगुलीला एका सामन्यासाठी निलंबित केलं होतं. अपील करण्याचा अतिरेक केल्याबद्दल वीरेंद्र सेहवागवर एका सामन्याची बंदी घातली होती. त्याच आरोपावरून दीपक दासगुप्ता, हरभजन सिंग व शिवसुंदर दास यांच्यावरही एका कसोटी सामन्याची बंदी आणि सामन्याच्या मानधनातून ७५ टक्के रक्कम कापण्याचा दंड ठोठावला होता. आम्हाला ही शिक्षा फारच कठोर व निर्दय वाटली होती. दक्षिण आफ्रिकेच्या खेळाडूंनी आमच्यापेक्षाही जास्त आक्रमकपणे अपील केली होती. पण

त्यांच्या एकाही खेळाडूला शिक्षा करण्यात आली नव्हती. क्रिकेट हा खेळ नेहमीच अतिशय जिद्दीने खेळला जातो. त्यामुळे भावनेचा भडका उडण्याचे प्रसंग अनेकदा येत असतात; पण तरीही आम्हाला करण्यात आलेली शिक्षा अत्यंत अवाजवी व अन्यायकारक आहे असं आमचं म्हणणं होतं.

आमच्यावरील आरोप हे पक्षपाती, अनुचित व कोणत्याही पुराव्याशिवाय केलेले आहेत, असं आम्ही बीसीसीआयला कळवलं. आनंदाची गोष्ट म्हणजे बीसीसीआयच्या वतीने जगमोहन दालमिया खेळाडूंच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. भारतीय संघाचा मॅच रेफ्रीवर विश्वास राहिला नसल्याचं त्यांनी आयसीसीला कळवलं. आम्हाला प्रसारमाध्यमांकडूनही एकमुखी पाठिंबा मिळाला. दौऱ्यावरील व मायदेशातीलही पत्रकारांनी आमची बाजू उचलून धरली. प्रसंगी दौरा अर्धवट सोडून जायचीही आमची तयारी होती; पण काही झालं तरी आम्ही आमच्यावर फसवेगिरीचा शिक्का मारून घेणार नव्हतो. हा आमच्या अभिमानाचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न होता. एक मॅच रेफ्री आमच्यावर बेछूटपणे आरोप करून आमची निंदानालस्ती करतो, ही गोष्ट आम्ही कदापि सहन करू शकत नव्हतो.

गोष्टी इतक्या थरापर्यंत गेल्या की, दौरा नीट पार पडेल की नाही, याबद्दल सर्वांच्याच मनात शंका निर्माण झाली. परस्परविरोधी मतं व्यक्त होत होती. एकूण संशयाचं व गोंधळाचं वातावरण निर्माण झालं होतं. आयसीसी काहीच निर्णय द्यायला तयार नव्हती. अखेर तिसऱ्या कसोटीला २४ तास बाकी असताना दक्षिण आफ्रिका व भारतीय क्रिकेट बोर्डाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र चर्चा केली. तिसऱ्या कसोटीसाठी माइक डेनिस यांना मॅच रेफ्री पदावरून दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. दक्षिण आफ्रिकेचे माजी यष्टिरक्षक डेनिस लिंडसे यांची त्या जागी नेमणूक करण्यात आली; पण आयसीसीने तो सामना अनधिकृत ठरवला.

जे काही घडलं ते योग्य नव्हतं; पण माझ्या मते इतका गदारोळ होण्याची काहीच आवश्यकता नव्हती. माइक डेनिस ह्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे हा समरप्रसंग ओढवला होता. त्यामुळे अवघं क्रिकेट विश्व दुभंगून गेलं. सहज टाळता येऊ शकणारा प्रसंग अखेर सर्वांच्या मनात कटुता निर्माण करून गेला.

★

१३वी आवृत्ती

रंगपंचमी

लेखक
वपु काळे

किंमत - २००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

रंगपंचमी साजरी होते ती त्यातील माणसांच्या उत्साही सहभागामुळे, विविध रंगांच्या उधळणीमुळे.

आयुष्यात वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळी माणसे आपल्याला सामील होतात.

आपल्या आयुष्याला बहरायला, फुलायला, रंगीबेरंगी करायला ही माणसेच हातभार लावतात; प्रत्येकाचे रंग निराळे, मग हे रंग कधी शहाणपणाचे असतात, कधी वेडेपणाचे, कधी उत्साहाचे; तर कधी नैराश्याचे.

वपुंची त्यांच्या आयुष्यातल्या छोट्या-छोट्या प्रसंगांनी सजलेली ही 'रंगपंचमी'

कुठेतरी 'आपल्याही आयुष्यात असं घडलं होतं बरं का' असं म्हणायला लावते. हसवते. खिन्नता आणते, विचारही करायला लावते.

आगामी

समकालीन साहित्यिक

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्रातील वर्तमान वाचकपिढी ही त्रिभाषा सूत्राच्या शिक्षण पद्धतीचे अपत्य होय. प्रत्येक मराठी वाचक मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषा केवळ जाणतोच असे नाही, तर त्याचं साहित्यिक वाचन या तीन भाषांच्या हातात हात घालत आपसूक चतुरस्त्र होतं.

आपण समकालीन साहित्य वाचतो खरे; पण समकालीन साहित्यिकांचे जीवन, साहित्यसंपदा, साहित्यिक वैशिष्ट्ये यांची विविध माहिती आपणास असतेच असे नाही. ती उणीव भरून काढणारे हे पुस्तक म्हणजे वाचकांच्या साहित्यिक जाणिवा समृद्ध व प्रगल्भ करणारे संचित.

डॉ. सुनीलकुमार लवटे स्वत: या तीनही भाषांचे व्यासंगी लेखक, समीक्षक, भाषांतरकार, संशोधक, संपादक असल्याने त्यांच्या लेखन, वाचन, विचार समृद्धीचा हा ऐवज वाचत आपणही केव्हा समृद्ध होऊन जातो ते कळतच नाही मुळी!

नानक निरंकारी कवी

जे काही बदलते ती माया आह
जो शाश्वत राहतो तो परमात्मा



ओशो...! एक प्रतिभावान विचारवंत...!
काळाच्या कित्येक योजनं पुढे जाणारे विचार मांडणारा हा अवलिया...!
थेट मानवी भावभावनांना आव्हान देणारे विचार मांडून
करोडो माणसांना 'प्रॅक्टिकल' मार्ग सांगणारा थोर विचारवंत...!
ओशोंनी सतत समाजाला धक्के देणारे विचार मांडले.

नानकांसाठी परमात्मा, देव म्हणजे कुणी व्यक्ती नाही, मूर्ती नाही. निसर्गाचा स्रोत, चराचर, यात अहर्निश दिसणारा 'तो' म्हणजेच ईश्वर!

कथा आहे की, ब्रह्माने पृथ्वीला निर्माण केलं. म्हणजे पृथ्वी त्यांची मुलगी झाली. जशी पृथ्वी निर्माण झाली ब्रह्म आसक्त झाले. तिच्या पाठी धावू लागले. स्वत:ला वाचवण्यासाठी मुलीने अनेक रूपं घेतली. जे जे रूप तिने घेतलं, बापानेही त्या त्या रूपात स्वत:ला घातलं आणि पाठलाग केला. मुलगी गाय झाली तर बापाने बैलाचं रूप घेतलं.

खूप छान गोष्ट आहे. नानकांचा रोख तिथेच आहे. कारण बुद्धपुरुष ब्रह्मापेक्षा उच्च झाला. बुद्धपुरुष समस्त देवांच्याही पार गेला. ब्रह्मा, विष्णू, महेश मागे राहिले. कारण ते तर तिनांचे चेहरे आहेत. ज्याने एकाला जाणलं, तो तीन जाणणाऱ्यांपेक्षा वरती गेला. खुद्द ब्रह्म त्यांना शरण जातात, विचारतात; मला सांगा, मी स्वत:ला कसं जाणू आणि कसं त्याला ओळखू?

ही गोष्ट मूल्यवान आहे. कारण ब्रह्म, विष्णू, महेश अजूनही तीन आहेत. या तिघांतून एकाला जाणता येणार नाही. हिंदूंनी अद्‌भुत कथा लिहिली आहे. सर्व जगात अशा कथा नाहीत आणि या कथांना समजून घेणंही कठीण आहे.

पाश्चात्त्यांमध्ये जेव्हा पहिल्यांदी पूर्वेच्या या कथा पोचल्या तर ते म्हणाले, ''हे कसले असे देव? हे तर देवांसारखे दिसत नाहीत.'' पण भारतातल्या या कथा मूल्यवान आहेत. कारण भारत असं सांगतो की, देवसुद्धा सांसारिक होते; आहेत. त्याचं मुख-चेहरा हा बाहेरच्या दिशेने आहे. आणि ब्रह्मसुद्धा आपल्या मुलीवर आकृष्ट होऊ शकतो. मुलगी याचा अर्थ असा आहे की, जी त्याच्यापासून निर्मित झाली, तिच्यावर आकृष्ट झाले.

आम्हीसुद्धा हेच करत आहोत. जो आमच्यापासून निर्मित झाला, आमचंच सर्जन, जे आमचं स्वप्न आहे, त्याकडे आम्ही आकृष्ट होतो. त्याच्याच मागे आम्ही पळत राहतो. वासना जी आमच्यापासून निर्माण झाली तिचाच पाठलाग आम्ही करत आहोत. या कथेचा हाच अर्थ आहे. जी वासना, आमच्याच मनाचा खेळ आहे, आम्हीच तिला जन्माला घातलं, जी आमची मुलगी आहे, तिच्यापाठी आम्ही आमचं सारं आयुष्य घालवतो आहोत. अनेकानेक रूपांतून तिचा पाठलाग करतो की, काहीही करून वासना पूर्ण होवो. देवही तितकेच बांधील आहेत, जितके मनुष्य. ब्रह्मालाही यावं लागतं

बुद्धपुरुषांच्या चरणाशी, गुपित जाणून घेण्यासाठी – त्या 'एक'चं!

नानक म्हणतात, ''हे आश्चर्याहून आश्चर्य आहे की, प्रभू त्या तिघांनाही बघतो पण त्यांच्या नजरेत प्रभू येत नाही. आश्चर्य आहे की, त्या तिघांना एक का दिसत नाही? आणि यात आश्चर्य नाहीसुद्धा, की हे तिघं कसे काय बघू शकणार? कारण हे तिघं जर मागे फिरतात तर 'एक' होतात.''

हे समजून घ्या, म्हणजे सोपं होईल. मी नेहमी म्हणतो की, तुम्ही परमात्म्याला कधी भेटू शकणार नाही. कारण ज्या दिवशी भेटाल, त्या दिवशी तुम्ही, 'तुम्ही' राहणार नाही. भेटण्याअगोदर तुम्हाला स्वत:ला हरवावं लागेल. जोपर्यंत तुम्ही आहात, मीलन होणार नाही. मग तुमचं मीलन कधीच होणार नाही. तुम्ही तोपर्यंत आहात, जोपर्यंत परमात्मा नाहीये. जेव्हा तुम्ही राहणार नाही तेव्हा परमात्मा आहे. मीलन कसं होणार?

हेच ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्याबाबतीत घडतंय. जर ते मागे फिरले तर एक होतील. एक होता क्षणी ते – ते राहणार नाहीत. आणि जोपर्यंत ते आहेत, ते मागे फिरणार नाहीत. म्हणून आश्चर्य आहेही आणि नाहीही. आणि लक्षात ठेवा, ही कुणा ब्रह्म-विष्णू-महेश यांची गोष्ट नाहीये. तुमचीच गोष्ट चालू आहे. ते तर केवळ प्रतीक आहेत.

जर नमस्कार करायचाच असेल तर त्याला नमस्कार करा.

तर नानक म्हणतात, ''तुम्ही खरंच ब्रह्मा, विष्णू, महेश यांना नमस्कार करताय?'' ते तर परमात्म्याला बघूही शकत नाहीत. तोच यांना बघत आहे. म्हणून नमस्कार करायचाच असेल तर त्या एकाला करा.

''तो आदि, शुद्ध, अनादि, अनाहत, युगानुयुगं एक वेषधारी आहे.''

''आदेसु तिसै आदेसु''

आदि अनिलु अनादि अनाहतु जुग जुग एको वेसु।।

जो नेहमीच एक आहे, त्याला नमस्कार करा. त्याचाच शोध घ्या जो आदिही आहे, अनादिही आहे. जो सगळ्यांचांच प्रारंभ आहे आणि ज्याचा प्रारंभ नाही. जो सर्वप्रथम आहे आणि त्याच्या आधी कुणीही नाही. जो सर्वांच्या अंतापर्यंत असेल आणि त्याच्या अंतापर्यंत कुणीही नाही. त्या एकालाच नमस्कार करा.

पण त्या एकाला नमस्कार करण्याइतपत बळ आमच्यात नाही. तेवढी हिंमतच नाही. कारण आम्ही नमस्कारही स्वार्थाने करतो. त्या एकाला जर नमस्कार करायचा आहे, तर स्वार्थ सोडायला हवा.

जर काही साध्य करण्यासाठी नमस्कार करत असाल तर देवांकडे जा.

कारण ते तुमच्यासारखेच आहेत. तुम्हाला वासना आहेत, त्यांनाही आहेत. तुम्ही त्यांच्यापाशी मागा, ते तुमचं मागणं पूर्ण करतील. कारण तुम्हा दोघांमध्ये एक तारतम्य आहे. ते तुमच्यापेक्षा शक्तिशाली आहेत; पण तुमच्याहून भिन्न नाहीत. जशा तुमच्या आशा-आकांक्षा आहेत. तशा त्यांच्याही आहेत. तर तुम्ही त्यांची स्तुती करा, पूजा-प्रार्थना करा, पण तुम्ही मागणार संसारच. म्हणूनच संसार हवा असेल तर विष्णूची पूजा करा.

त्या एकालाही मागू शकता, जर संसार सोडायची तयारी असेल तर. लक्षात ठेवा, त्या एकाला मिळवलंत, तरच काही कमवलंत. या संसारात लोक किती कष्ट घेतात, पण काही मिळत तर नाही. तरीही तुमचे डोळे उघडत नाहीत. तरीही तुमच्या बुद्धिमत्तेत जराही जागृती येत नाही. इतके लोक शोधतात, मिळवतातही, तरीही मिळवत नाहीत. इथे हरल्याहूनही हरलेले आहेत, इथे जिंकले तेही हरले आहेत.

दोन मित्र एका हॉटेलात बसले होते. एक जरासा वयस्कर, एक तरुण. एक सुंदर स्त्री दारातून आत आली. तर तरुण म्हणाला, अगदी सुस्कारा सोडत, ''ही स्त्री जोपर्यंत मला मिळत नाही; मी सुखी होणार नाही. मी वेडा झालो हिच्यासाठी. हिच्यामुळे माझी झोप उडाली आहे. माझी मनाची शांती सर्व काही हरवलं आहे. काही सुचत नाही. मी काय करू?''

वयस्कर म्हणाला, ''जेव्हा त्या स्त्रीला तू फूस लावू शकशील तेव्हा मला कळव.''

तरुण म्हणाला, ''म्हणजे काय? तुम्हाला का सांगू?'' तो म्हणाला, ''ती माझी पत्नी आहे. आणि जेव्हापासून ती माझ्या आयुष्यात आली माझी सर्व शांतता हरवून गेली. मला माझा आनंद परत मिळेल जर तू तिला पटवलंस तर!''

इथे ज्यांना मिळतं ते रडतात, ज्यांना मिळत नाही तेही रडतात. इथे असण्याचा ढंग म्हणजे रडणं आहे. इथे तुम्ही सर्वांनाच रडताना बघाल गरीब, श्रीमंत, सफल-असफल, विजेता-पराजित. सगळेच. इथे एकाच बाबतीत मोठी समानता आहे, सगळेच दु:खी आहेत.

त्या एकाला मिळवूनच काही मिळवता येऊ शकतं. त्या एकाचं कुठलंही मंदिर नाहीये. त्याचं मंदिर असू शकतही नाही.

म्हणून नानकांनी आपल्या मंदिराला जे नाव दिलंय ते अगदी सुंदर आहे. **गुरुद्वारा! ते परमात्म्याचं मंदिर नाही, तो फक्त गुरूचा दरवाजा आहे. त्यातून त्या एकापर्यंत पोचाल, पण तो फक्त दरवाजा आहे. तिथे आत**

काहीही नाहीये. नाव फार छान आहे. ते फक्त दार आहे, तिथे थांबण्याची गरज नाही. जो गुरुद्वारापाशी थांबला तो अडाणी आहे. दरवाजात बसलाय, त्यात काही अर्थ नाही. तिथून पार जायचं आहे, त्याच्या पलीकडे जायचं आहे. गुरु-द्वार. त्याच्या पलीकडे तो एक आहे. त्या एकाचं मंदिर असू शकत नाही.

नानक म्हणतात, ''जर नमस्कार करायचा भाव आहे, खरंच नमस्कार करायचा आहे, हृदयात तशी भावना जागृत झाली आहे. आदेसु तिसै आदेसु – तर त्या एकालाच नमस्कार करा.''

लोक लोक उसका आसन है।

म्हणून त्याचं मंदिर असू शकत नाही.

लोक लोक उसका भंडार है!

त्याने एकदाच कायमस्वरूपी मिळण्यासारखं त्यात ठेवलं आहे. ही सर्जनहार रचना करून तो बघत राहतो. नानक म्हणतात, ''खऱ्याचं काम खरं.'' नमस्कार करायचा तर त्यालाच करा. तो आदि, शुद्ध, अनादि, अनाहत – अनंत आणि युगानुयुगं एक वेषधारी आहे.

नानक सचे की साची कार।

त्या परमात्म्याचं जे काही आहे ते सत्य आहे. तुमचं जे काही आहे ते असत्य आहे. कारण तुमचं असणं हेच असत्य आहे. असत्यातून सत्याचा जन्म होऊ शकत नाही. तुम्ही जे काही बनवाल ते पत्त्याच्या घरांसारखं असेल. हवेची लहानशी झुळूकही त्यांना पाडून टाकेल. जे बनवाल ते कागदाच्या बोटीसारखं असेल. जशी पाण्यात सोडाल, बुडून जाईल. त्यातून प्रवास होऊ शकत नाही. अहंकारातून निर्माण झालेली प्रत्येक गोष्ट असत्य कारण अहंकार असत्य आहे. या परमात्माचं जे काही आहे ते सत्य आहे.

हे ज्यादिवशी तुम्हाला समजेल त्या दिवसापासून तुम्ही असत्य निर्माण करण्याचे श्रम घेणार नाही. त्या दिवशी तुम्ही सत्य जाणून घेण्याचे श्रम करू लागाल. संसारी माणसाचा अर्थ आहे जो असत्य निर्माण करण्यामागे लागलाय. तुमच्या संसारातली असत्यता तुम्ही विचारात घेत नाही इतके तुम्ही त्यात लीन आहात. तुम्ही कधी लांब जाऊन बघितलेलं नाही की, असत्य किती भयंकर आहे.

एक माणूस नोटा साठवत जातोय. तो कधीही विचार करत नाही की, नोट फक्त एक मान्यता आहे. उद्या सरकार बदलेल, कायदा बदलेल, ठरवलं

जाईल की, नोट रद्द झाली, कामाच्या नाहीत, तर तो केवळ एक कागद राहील. एक मान्यता गोळा करतोय फक्त तो माणूस. आणि ही मान्यता अशी आहे ज्याचा भरोसा नाही.

अमेरिकेत एक हॉटेल आहे. १९३० सालातलं. तेव्हा अमेरिका मोठ्या आर्थिक अडचणीत होती, मार्केट पडलं होतं. ज्या माणसाचं हे हॉटेल आहे, त्याचे करोडो बाँड्स व्यर्थ झाले. तर त्याने हॉटेलच्या सर्व भिंतीवर चिकटवले, सगळ्या बाँड्स-भिंती भरून टाकल्या. बाँड्सच्या कागदांनी! त्यांचा काहीच उपयोग राहिला नव्हता.

एक मनुष्य नोटांवर आयुष्य लावतोय. त्याचं काम इतकंच की, किती नोटा साठत आहेत, त्या मोजत राहणं. तिजोरी भरभरून नोटा. त्याला माहीत नाहीये की, तो प्रत्येक नोटेमागे स्वत:चं आयुष्य विकतोय. कारण प्रत्येक क्षण किमती आहे. ज्या ऊर्जेमुळे परमात्म्याशी मीलन होतं ती ऊर्जा तो नोटांमागे लावत आहे. नोटा म्हणजे फक्त मान्यता आहेत. या जगात हजारो तऱ्हेच्या मान्यता आहेत आणि हजारो तऱ्हेची नाणी.

मेक्सिकोमध्ये अगदी या शतकाच्या सुरुवातीला दगड-धोंडे यांचा नाणी म्हणून वापर लोक करत होते. दगड-धोंड्यांनीही कामं व्हायची. कारण तशी मान्यता होती. तुम्ही कागदांचा उपयोग करत आहात. दगड-धोंड्यांपेक्षा कागद जास्त मूल्यवान आहे. सोन्याला मान्यता दिली आहे म्हणून सोनं मूल्यवान आहे. जर जगाची हवाच बदलली, कधीही बदलू शकते तर सोन्याला महत्त्व न देता लोखंडाला महत्त्व देऊ लागले तर तुम्ही लोखंडाचे दागिने वापराल.

आफ्रिकेत जाती आहेत, ज्यांच्यात हाडांना महत्त्व देतात, सोन्याला नाही. तर गळ्यात हाडं घालून फिरतात. सोनं त्यांच्या दृष्टीने निरुपयोगी आहे.

मान्यता कशाला देता, याचा हा खेळ आहे. आणि त्यासाठी तुम्ही तुमचं संपूर्ण आयुष्य व्यतीत करता की, लोकांनी आपल्याला प्रतिष्ठा द्यावी. लोकांच्या प्रतिष्ठेला काय अर्थ आहे? कोण आहेत ही माणसं ज्यांच्या प्रतिष्ठेसाठी तुम्ही वेडे झाले आहेत? ही तीच माणसं आहेत जी तुम्ही त्यांना प्रतिष्ठा द्यावी म्हणून वेडी झाली आहेत. त्यांची किंमत काय?

निर्बुद्धांकडून जर प्रतिष्ठा मिळत असेल तर त्यातून तुम्हाला काय मिळणार? अशा निर्बुद्ध लोकांच्या समूहाचा काय हिशोब?

चर्चिल अमेरिकेला गेले, एका सभेत बोलण्यासाठी. खूप गर्दी होती,

हॉल अगदी खचाखच भरला होता. सभा संपल्यानंतर एका बाईने त्यांना विचारलं, ''तुम्हाला खूप आनंद होत असेल ना? तुम्ही जेव्हा बोलता तेव्हा हॉल खचाखच भरलेला असतो.''

चर्चिल म्हणाले, ''जेव्हा मी हॉल खचाखच भरलेला बघतो, तेव्हा मला वाटतं की, जर मला फासावर चढवलं जात असतं तर कमीत कमी पन्नास टक्के जास्त लोक मला बघायला आले असते. या लोकांचा काय भरवसा? हे आत्ता टाळ्या वाजवत आहेत, उद्या मला फाशी देत असतील, तरीही टाळ्या वाजवतील. असा खचाखच भरलेला हॉल बघून मला नेहमी असं वाटतं की, हे तेच लोक आहेत, जर मला फाशी होत असेल तर येतील, मजा बघतील. मुलांनाही घेऊन येतील आपल्या, 'चला बघा. पुन्हा अशी संधी मिळेल; न मिळेल.' यांचा भरवसा नाही.''

हेच चेहरे जर तुम्ही पडत असाल, तर टाळ्या वाजवतील. हेच चेहरे तुम्ही उठत असाल, तरीही टाळ्या वाजवतील. या चेहऱ्यांना बघून, त्यांची मोजणी करून, त्यांचं मत मानून तुम्ही कुठपर्यंत पोचाल? ते तुमच्या बरोबर आहेत, त्यामुळे काय साथ-सोबत मिळते? हे तुम्हाला डोक्यावर घेतील. तरी त्यांचं मूल्य काय? त्यांची उंची किती? त्यांच्या खांद्यावर बसून तुम्ही किती उंच व्हाल? पण माणसं संपूर्ण आयुष्य घालवतात प्रतिष्ठेमागे! प्रतिष्ठा कशी मिळेल? पद कसं मिळेल? लोकांचा आदर कसा मिळेल?

नानक म्हणतात, ''अहंकारामुळे जे पद मिळेल ते खोटंच असणार. हा सर्व गर्वाचा शोध आहे.''

नेता तुमच्या दाराशी येतो. मान लवून नमस्कार करतो, 'मत द्या' सांगतो. तुम्ही त्याला मत देता. तो पदावर पोचतो. एक म्युच्युअल अंडरस्टँडिंग. एक परस्पर कृती. अहंकाराची तृप्तता!

एका गावात घंटाघर होतं. एक माणूस तिथे घंटा वाजवायचा. गावात एक छोटं टेलिफोन एक्स्चेंज ऑफिस होतं. रोज सकाळी नऊ वाजता ऑफिसात एक फोन यायचा, 'किती वाजले?' असं विचारायला! तर टेलिफोन एक्स्चेंज वेळ सांगायचं. तो नवाचे टोले वाजवायचा आणि जेव्हा घंटाघरात हे नवाचे टोल वाजायचे तेव्हा टेलिफोन एक्स्चेंजवाला आपलं घड्याळ लावायचा. हे वर्षानुवर्षं चालत होतं. एक दिवस अचानक टेलिफोन एक्स्चेंजवाल्याने विचारलं, ''तू कोण आहेस? रोज बरोबर नऊ वाजता फोन करतोस!'' तो म्हणाला, ''मी घंटाघराचा शिपाई आहे. घंटा वाजवण्यासाठी वेळ विचारून घेतो.'' तो म्हणाला, ''कमाल झाली. वेळेची काय हालत

होणार, समजत नाही. कारण आम्ही तुझ्यावर अवलंबून होतो आणि तू आमच्यावर!''

एक पारस्परिक स्थिती आहे. मी तुमच्याकडे बघतो, तुम्ही माझ्याकडे बघता. मी तुमचा सन्मान करतो, तुम्ही माझा सन्मान करता. मी तुमच्या अहंकाराला जोपासतो, तुम्ही माझा अहंकार जोपासा. असं हे सर्व खोटेपणाचं जाळं आहे.

नानक म्हणतात, ''त्या मालकाचं काम खरं, खऱ्याचं काम खरं.''

तुम्ही आधी सत्याचा शोध घ्या. त्या आधी काहीही करू नका. कारण बाकी सर्व करणं असत्य असेल. करण्यासारखी एकच गोष्ट आहे, सत्य ओळखा. मग तुम्ही काहीही करू नका. कारण सत्यच तुमच्या आत काही करेल.

नमस्कार करायचा असेल, तर त्यालाच करा जो आदि, शुद्ध, अनादि-अनंत, आणि युगानुयुगं एक वेषधारी आहे.

तो एक वेषधारी आहे हे लक्षात ठेवा. जे काही बदलतं – ती माया आहे, संसार आहे, असत्य, स्वप्न आहे. जी गोष्ट सदा शाश्वत राहते, तो परमात्मा आहे. हे सूत्र तुम्ही ग्रहण करा, म्हणजे आज नाही तर उद्या; त्याला शोधू शकाल जो कधीही बदलत नाही.

तुम्ही कधी निरीक्षण केलं असेल-नसेल, पण तुमच्यात एक तत्त्व आहे जे कधीही बदलत नाही. राग येतो, पण तो चोवीस तास राहत नाही. म्हणून क्रोध माया आहे. प्रेम वाटतं, कधीकधी प्रसन्नता असते, कधी उदासी हे कुठलेही भाव सतत चोवीस तास टिकत नाहीत, कारण ते माया आहेत.

मग असं काय आहे तुमच्या आत, जे चोवीस तास टिकतं? कोण ओळखतं की, मी उदास आहे? कोण सांगतं की, मी प्रसन्न आहे? आजारी आहे, स्वस्थ आहे? कोण म्हणतं की, रात्री झोप लागली नाही? किंवा खूप स्वप्न पडली? झोप छान लागली?

चोवीस तास तुमच्या आत जाणणारा आहे. जागा आहे. तोच चोवीस तास आहे. बाकीचे सगळे येतात-जातात. तुम्ही त्याला धरा. कारण त्याच्यातच परमात्म्याची झलक आहे.

म्हणून नानक म्हणतात, ''नमस्कार करायचाच असेल तर त्याला करा, तोच आदि आहे, अनादि आहे, शुद्ध आहे, अनंत आहे, युगानुयुगं एक वेषधारी आहे.

आदेसु तिसै आदेसु।''

★

पुस्तक परिचय

मृत्यूचं अमरत्व

मृत्यूवर विजय याचा अर्थ इतकाच की मृत्यू नसतो.
मृत्यूचं नसणं हे जाणून घेणं म्हणजेच मृत्यूवर विजय



मृत्यू अमर आहे. मरण येतं ते शरीराला.
आत्मा अमर आहे, असं सगळेच म्हणतात. पण मी म्हणतो की,
मृत्यू अमर आहे. मृत्यू मरत नाही आणि मरणाराही मरत नाही.
आणि जगणाऱ्याला कुणी मारू शकत नाही.
'जगणं' जर नसेल तर मृत्यूही नाही आणि मृत्यू मुळातच नाही.

हिंसक माणूस स्वतःला मृत्यूपासून
वाचवणारा माणूस आहे.
आणि जो मृत्यूपासून स्वतःला वाचवतो,
तो अहिंसक असू शकतच नाही.
अहिंसक तोच जो म्हणतो, मृत्यू स्वीकार.
कारण मृत्यू जीवनाचं एक तथ्य आहे, तो आहे.
अस्वीकृतता असू शकतच नाही.
कुठे पळणार? कुठे जाणार?

पण असा जरी प्रश्न विचारला की, मृत्यूचा विचार आपण मध्येच आणायचाच कशाला? तरीही मृत्यूचा विचार आलाच. जरी इतकाही विचार केला की, आपण जगू, मरणासंबंधी विचार करायलाच नको, तरीही विचार सुरू झाले. मृत्यू इतकं मोठं तथ्य आहे की, दुर्लक्ष करता येणं शक्य नाही. तरीही आयुष्यभर आम्ही असाच प्रयत्न करत राहतो की, मृत्यूसंदर्भात विचार करायचा नाही; मृत्यू विचार न करण्यासारखी गोष्ट आहे म्हणून नव्हे, तर मृत्यू म्हटलं की, भीती वाटते म्हणून. हा विचारच प्राण कंपित करतो की, मी मरणार. जेव्हा मरू, तेव्हा कंपित होणारच. पण हे विचारही न मरताच मनाला ग्रासून टाकतात की मी मरणार, आणि सर्व प्राण मुळापासून थरथरतात.

माणूस अखंड प्रयत्न करत राहतो की, मृत्यूला विसरू, विचार नको करायला. आम्ही जीवनाची सर्व मांडणी अशी केली आहे की, मृत्यू दिसणार नाही. त्याला झिडकारण्याचा, खोटं ठरवण्याचा प्रयत्न केला पूर्णतः, उपाय केले तसे, ते यशस्वी झाले असं वरवर दिसतं; पण सफल होत नाहीत. कारण मृत्यू आहेच. पळणार कुठे? कुठपर्यंत? कसे? आणि पळता पळता पोचता शेवटी तिथेच. आणि तो रोज जवळ येत आहे. पळा अथवा पळू नका. पण कोणत्याही तथ्यापासून पळता येत नाही.

मृत्यू अशी गोष्ट नाही की, भविष्यात घडेल, तर आत्ता का विचार करा? हा गैरसमज आहे. **मृत्यू भविष्यात घडणारा नव्हे, तर प्रत्येक क्षणी घडणारा आहे. म्हणजे या क्षणीही आम्ही मरतच आहोत.** इथे तासभर बसलात, तर त्या तासात मरून जाल. सत्तर वर्षं लागतील पूर्ण मृत्यू

येण्यासाठी, पण त्यात हा एक तासही मिसळलेला आहे. असं नाही की, अचानक कुणी सत्तराव्या वर्षी मरतं; मृत्यू म्हणजे अकस्मात घडणारी घटना नव्हे. ही एक वाढ आहे, एक विकास, जो जन्म घेतल्या क्षणापासून सुरू होतो. खरंतर जन्म हा मृत्यूचा पहिला किनारा आहे, टोक आहे आणि मृत्यू अंतिम किनारा आहे. हा प्रवास त्या दिवशीच सुरू होतो, ज्याला आम्ही जन्मदिवस म्हणतो, तो मरणाच्या दिवसाचा पहिला दिवस असतो. प्रवासाला जरा वेळ लागेल, पण तो सुरू होईल.

जसा कुणी माणूस कलकत्त्याला जाण्यासाठी द्वारकेहून निघाला, तर जे पहिलं पाऊल उचललं जाईल, ते कलकत्त्याच्या दिशेनेच उचललं जात आहे, शेवटचं पाऊल उचललं जाईल, तेही कलकत्त्याच्या दिशेनेच. मग शेवटचं पाऊल कलकत्त्याला पोचवेल, तितकंच पहिलं पाऊलही कलकत्त्याला पोचवतंय. कलकत्याला जाण्यासाठी पहिलं पाऊल उचललं, तेव्हाच मी कलकत्त्याला पोचू लागलो. कलकत्ता एका पावलाने जवळ आलं आणि एक-एक पाऊल जवळ येत गेलं. भले मग त्यासाठी सहा महिने लागले असतील. पण ते सहा महिने आधीच लागायला सुरुवात झाली, म्हणून सहा महिन्यांनंतर कलकत्ता आलं.

म्हणून दुसरी गोष्ट अशी सांगू इच्छितो की, मृत्यू भविष्यात आहे, असा विचार तुम्ही करू नका. मृत्यू क्षणाक्षणाला आहे. आणि भविष्य काय आहे? सगळं वर्तमानाचा जोड आहे. आम्ही जोडत जात आहोत, जोडत जात आहोत, जोडत जात आहोत. कुणी पाणी गरम करत आहे. पहिल्या डिग्रीपर्यंत पाणी गरम झालं आहे, पण त्याची वाफ झालेली नाही, दोन डिग्री गरम झालं आहे, पण वाफ झालेली नाही. वाफ तर शंभर डिग्रीवर बनेल. पण पहिल्या डिग्रीला वाफ बनू शकेल, अशा पातळीवर ते पोचलं. पहिली, तिसरी, पाचवी, नव्व्याण्णव डिग्री, पण पाण्याची वाफ झाली नाही. शंभर डिग्रीलाच वाफ बनेल. पण कधी विचार केलात की, शंभर डिग्री पहिली डिग्री आहे आणि पहिली डिग्रीसुद्धा पहिलीच एक डिग्री आहे! त्यात काही फरक नाही. म्हणून ज्याला माहीत आहे, तो पहिल्या डिग्रीलाच सांगतो की, सावधान, पाण्याची वाफ होत आहे; जरी वाफ बनताना अजून दिसत नसलं तरीही. आम्ही म्हणू की, केवळ पाणी गरम होतंय, वाफ कुठे आहे? पण प्रत्येक डिग्री शंभर डिग्रीच्या जवळ पोचत आहे.

म्हणून भविष्यात मृत्यू आहे, असं म्हणून वाचण्याचा प्रयत्न करणं व्यर्थ आहे. मृत्यू क्षणोक्षणी आहे. आम्ही रोज मरत आहोत. खरंतर ज्याला आम्ही

जगणं म्हणतो, त्यात आणि मरणात काहीही फरक नाही. ज्याला आम्ही जगणं म्हणतो, ते हळूहळू मरण्याचं नाव आहे. मी नाही सांगत, की भविष्याचा विचार करा. पण जे घडतच आहे, ते बघा.

त्या मित्राने विचारलं आहे की, मृत्यूच्या संदर्भात का विचार करायचा? मी नाही सांगत की, विचार करा. विचार करून काही कळणार नाही. लक्षात ठेवा, विचार करून कुठल्याच तथ्याला जाणून घेता येत नाही. जर फूल उमलतंय आणि तुम्ही विचार करत राहिलात फुलासंबंधी, तर तुम्हाला फुलाबद्दल काहीही समजणार नाही. कारण जितका विचार कराल, तितकं फूल दूर जात राहील. तुम्ही विचारात गुंग व्हाल आणि ते मागे राहील. त्याबद्दल विचार करण्यात काय अर्थ? फूल एक तथ्य आहे. फुलाला जाणून घ्यायचं आहे, तर विचार करू नका, त्याला बघा.

बघण्यात आणि विचार करण्यात फरक आहे. हा फरक महत्त्वपूर्ण आहे. पाश्चात्त्य लोक विचारांवर फार भर देतात. म्हणून त्यांनी आपल्या शास्त्राला 'फिलॉसॉफी' असं नाव दिलं. फिलॉसॉफीचा अर्थ आहे, 'विचार!' आम्ही आमच्या विचारांना 'दर्शन' असं नाव दिलं आहे. दर्शन म्हणजे बघणं. दर्शनचा अर्थ विचार करणं असा नाही आहे. जरा समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. आम्ही दर्शन म्हणतो, ते फिलॉसॉफी म्हणतात. मूलत: फरक आहे. जे फिलॉसॉफी शब्दाला दर्शन हा पर्यायी शब्द म्हणतात, त्यांना काहीही माहीत नाही. हा पर्यायी शब्द नाही. म्हणून इंडियन फिलॉसॉफी आणि पाश्चात्त्य दर्शन अशा काही गोष्टी नाहीयेत. पाश्चात्त्यांमध्ये जे आहे; ती मीमांसा, तर्क, विश्लेषण आहे. पूर्वेने एक वेगळीच काळजी घेतली आहे. पूर्वेने असा अनुभव घेतला आहे की, काही तथ्यांना विचार करून जाणून घेताच येत नाही. त्यांना बघावं लागतं. विचार आणि बघणं यात फरक आहे.

एक माणूस प्रेमासंबंधी विचार करतो. असं होऊ शकतं की, त्यावर तो शास्त्रोक्त लिखाण करेल. पण प्रेमी प्रेमावर जगतो, बघतो. असं होऊ शकतं की, त्यावर तो लिहू शकणार नाही. आणि जर कुणी त्याला विचारत असेल की, प्रेमाबद्दल काही बोल, तर त्याचे डोळे बंद होतील कदाचित, अश्रू वाहू लागतील. म्हणेल की, नका विचारू, कसं सांगणार प्रेमाबद्दल काही! आणि ज्याने प्रेमाबद्दल विचार केला आहे, तो तासन्तास त्याबद्दल बोलत राहील; पण प्रेम म्हणजे काय हे, त्याला कणभरही माहीत नसेल. विचार आणि बघणं या दोन भिन्न प्रक्रिया आहेत.

तर मी असं म्हणत नाहीये की, मृत्यूसंबंधी विचार करा. विचार करत

राहिलात, तर मृत्यू तुम्हाला कधी समजणारच नाही. बघावा लागेल. मी असं सांगतोय की, मृत्यू तर इथेच उभा आहे, तुमच्या आत उभा आहे, त्याला बघावं लागेल. हे जे मी 'मी' म्हणतो आहे, तो मरतोच आहे संपूर्ण काळ. या मरणाच्या घटनेला बघावं लागेल, ती घटना जगावी लागेल, या मरणाच्या घटनेला स्वीकारावं लागेल, की मरत आहे, मी मरत आहे, मी मरत आहे. टाळायचा आम्ही खूप प्रयत्न करतो, हजार उपाय... केस पांढरे झाले, काळे करा, पण त्याने मरण टाळता येणार नाही, ते येणारच. कलप लावलेल्या केसांखालीसुद्धा पांढरे केस आहेत. मरण यायला सुरुवात झाली आहे. येणारच. कसं टाळणार? काहीही फरक पडणार नाही. त्याची चाल त्याच्या गतीने चालू आहे. हं, फरक इतकाच पडू शकतो की, आम्ही वंचित राहू त्याला जाणून घेण्यासंदर्भात!

आणि मी असंही म्हणतो की, जो मृत्यू जाणू शकला नाही, त्याला जीवन कसं समजणार? मी असं सांगतो आहे की, मृत्यू परीघ आहे आणि जीवन केंद्रावर आहे. जर परीघच समजला नाही, तर केंद्र कसं समजणार? आणि परिघापासून जर पळ काढलात, तर केंद्रापाशी कधी पोचू शकणार नाही. कारण ज्या घराच्या बाहेरच्या भिंतीलाच मी घाबरलो आणि पळ काढला, तर त्या घराच्या आत मी प्रवेश कसा करणार? मृत्यू म्हणजे बाहेरची भिंत आणि जीवन म्हणजे मृत्यूच्या केंद्रात स्थापन केलेलं मंदिर. जो मृत्यूला जाणेल, समजून घेईल; तो हळूहळू मृत्यूच्या वस्त्रांना बाजूला सारून जीवनालाही समजून घेऊ लागेल. मृत्यू जीवनाकडे जाणारं दार आहे, जीवनाला जाणून घेण्याचं दार.

तर जेव्हा मी म्हणतो की, मृत्यू जाणून घ्या, तथ्य ओळखा; तर विचार करण्यासाठी सांगत नाही. एक मजेशीर गोष्ट समजून घ्यायला हवी.

विचार याचा अर्थ जे आम्ही जाणतो, त्याचा उच्चार. विचार कधीही मौलिक नसतात. साधारणपणे आम्ही म्हणतो की, अमुक व्यक्तीचे विचार मूल्यवान, अगदी ओरिजिनल आहेत. कोणताही विचार मौलिक नसतो. असू शकतच नाही. दर्शन मूल्यवान होऊ-असू शकतात. विचार शिळे असतात.

जर मी तुम्हाला सांगितलं की, गुलाब या फुलाबद्दल विचार करा, तर तुम्ही काय विचार कराल? जे तुम्ही जाणलं आहेत, ओळखलं आहे, तेच उच्चाराल. काय करणार? विचारात तुम्ही अजून काय करू शकता? गुलाबाबद्दल एक तरी अज्ञात बाब तुमच्या विचारात येऊ शकते? कशी येणार? कारण विचार म्हणजे आठवून सांगणं – तेच, जे तुम्हाला माहीत

आहे. सुंदर आहे, प्रेयसीच्या चेहऱ्याप्रमाणे, टवटवीत... बस! विचारांतून तुम्ही त्या फुलात प्रवेश कसा काय करणार? विचारातून तुम्ही केवळ गुलाबाच्या ऐकीव स्मृतीत प्रवेश कराल. विचार मौलिक नसतात, द्रष्टा मौलिक असतो.

जर कुणी गुलाब बघतंय, तर पहिली अट, विचार बाजूला सारा, आठवणी बाजूला सारा, अगदी रिक्त व्हा आणि त्या फुलाबरोबर जगा. ऐकलेलं, वाचलेलं, जाणून घेतलेलं, अनुभवलेलं – सगळं. सगळं बाजूला सारा, केवळ व्यक्ती आणि फूल इतकंच... तरच जो अनोळखी आहे, त्या फुलात त्याचं वास्तव्य आहे, तो माझ्या प्राणात प्रवेश करू लागेल. मध्ये कोणताही अडथळा न येता तो प्रवेश करेल. तेव्हा गुलाब आणि मी, आम्ही एक असू. आतून आकलन होईल. द्रष्टा आत प्रवेश करतो, कारण मध्ये कोणताही अडथळा नसतो.

कबीरांनी एक दिवस आपल्या मुलाला – कमालला सांगितलं की, जंगलातून गवत आण गायी-म्हशींसाठी. तर कमाल गवत कापायला गेला. सकाळपासून गेलेला, दुपार झाली तरी परतला नाही. कबीरना काळजी वाटू लागली. दुपार ढळू लागली, संध्याकाळ झाली, सूर्यास्त होऊ लागला, तर कबीर आणि त्यांचे काही भक्त कमालला शोधण्यासाठी निघाले. जाऊन बघतात, तर जंगलात गवताच्या मध्ये कमाल उभा होता. डोळे बंद होते आणि डुलत होता. वाऱ्याच्या वाहण्याप्रमाणे जसं गवत डुलत होतं, तसा कमालही डुलत होता. त्याला हलवलं, विचारलं की, काय करतो आहेस. त्याने डोळे उघडले, म्हणाला, ''अरे, मोठी चूक झाली.'' कबीर यांनी विचारलं, ''किती उशीर झाला. किती वेळ घालवलास, हे काय करतो आहेस इथे?''

''मी जेव्हा इथे आलो, तेव्हा मोठी चूक झाली. मी गवत कापण्यासाठी गवताकडे बघत होतो आणि बघता बघता मी गवत कधी झालो, मला समजलंच नाही. मग संध्याकाळ झाली. मला समजलंच नाही की, मी कमाल आहे आणि गवत कापायला आलो आहे. मीच गवत झालो. ते गवत होण्यात इतका आनंद होता, जो कमाल असताना कधीही मिळाला नव्हता. तुम्ही आलात बरं झालं, नाही तर माहीत नाही, काय झालं असतं, परतून आलोच नसतो. वारा गवताला हलवत नव्हता, मला हलवत होता आणि कापणारा आणि कापला जाणारा दोघंही संपून गेले होते.''

ही मोठी चूक नव्हती, तर एक अद्‌भुत गोष्ट होती. जे कुणी 'बघायला'

लागतात, तर गोष्ट एकदम बदलून जाते. आम्ही काहीही बघत नाही. कधी तुम्ही तुमच्या बायकोला बघितलं आहेत? मुलाला? ज्यांच्याबरोबर तुम्ही वर्षांनुवर्ष जगत आहात, त्यांना कधी बघितलं आहेत? नेहमी विचार केला आहेत, की काल बायकोने काय केलं, सकाळी ऑफिसला जाताना ती कशी भांडली? जेवताना काय म्हणाली... नेहमी विचार केला आहे, बघितलं नाहीयेत. आणि म्हणूनच नवरा-बायकोत काहीही संबंध नाहीयेत. मुलात आणि वडिलात काहीही संबंध नाहीत. आई-मुलात संबंध नाहीत. संबंध तिथे असतो, जिथे विचार लुप्त होऊन दर्शन सुरू होतं. संबंध तेव्हा निर्माण होतात, कारण तेव्हा ते तोडणारा कुणी राहत नाही.

लक्षात ठेवा, संबंध याचा अर्थ 'दोघांना जोडणारा कोणी आहे' असा नाही. जोपर्यंत जोडणारा कुणी आहे, तोपर्यंत तोडणारा असणार. कारण जोडणाराच तोडतो. जेव्हा जोडणारा राहत नाही, केवळ दोघेच उरतात, त्या दिवशी दोन राहत नाही, एकच उरतो. संबंध याचा अर्थ असा नाही की, ज्याच्याशी आम्ही जोडले गेलो आहोत. संबंध म्हणजे मध्ये कुणी नाही. तिथे धारा लुप्त होतात आणि एक दुसऱ्यात विलीन होतो. याचं नाव प्रेम. दर्शन प्रेमात नेतं. प्रेमाचं सूत्र दर्शन आहे. आणि ज्याने प्रेम केलं नाही, त्याने कधीही काहीही जाणलं नाही. कधी काही जाणलं, तर ते प्रेमानेच, प्रेमामुळेच.

आता जेव्हा मी म्हणतो की, मृत्यू जाणून घ्यायला हवा, तर त्याच्यावरही प्रेम करावं लागेल. मृत्यूचंही दर्शन घ्यावं लागेल. आणि जो भयभीत आहे, पळपुटा आहे; तो प्रेम कसं करणार? तो दर्शन कसं घेणार? तो मृत्यूला कसं बघणार? मृत्यू समोर असेल, तर तो पाठ फिरवून उभा राहतो. डोळे बंद करतो, मृत्यूला समोर येऊ देत नाही. ना प्रेम करू शकत. आणि जो आता मृत्यूवर प्रेम करू शकत नाही, तो जीवनावर प्रेम कसं करणार? कारण मृत्यू ही तर वरवरची घटना आहे, जीवन गहिरी घटना आहे. जो विहिरीच्या पहिल्या पायरीवरून परतला, तो विहिरीच्या पाण्यापर्यंत कसा काय पोचणार?

म्हणून मृत्यूला तर जगावं लागेल, जाणावं लागेल, बघावं लागेल, प्रेम करावं लागेल, त्याच्या नजरेला नजर द्यावी लागेल. आणि जसं कुणी मृत्यूला बघतं, प्रवेश करतं; तो अचंबित होतो. किती मोठं रहस्य लपलं आहे मृत्यूत की, ज्याला आम्ही मृत्यू समजून पळ काढत होतो, त्याच्यात परमजीवनाचा स्रोत लपलेला आहे. म्हणून मी म्हणतो की, स्वेच्छेने मरावं. म्हणजे जीवनापर्यंत पोचू शकू.

जीझसचं एक अद्‌भुत वचन आहे. जीझस म्हणतात की, जो स्वत:ला वाचवेल, तो संपेल. आणि जो स्वत:ला मिटवून टाकेल, संपवेल; त्याला संपवणारं कुणीही नाही. जो स्वत:ला हरवेल, त्याला मिळेल. जो स्वत:ला वाचवेल, तो हरवेल.

एक बी स्वत:ला वाचवत असेल, तर ती सडून जाईल आणि जर स्वत:ला मिटवून टाकत असेल, जमिनीत हरवून जात असेल, तर वृक्ष बनेल. तिचं मरण वृक्षाचं जीवन बनतं. पण जर तिने स्वत:ला वाचवलं, तर ती सडून जाईल, बीही राहणार नाही. मग वृक्ष तर दूरची गोष्ट! आम्ही घाबरतो आणि आक्रसतो. मृत्यूला घाबरून आम्ही आकुंचित होतो.

मी अजून एक गोष्ट सांगणार आहे, जिचा तुम्ही कधी विचारही केला नसेल. केवळ मृत्यूला घाबरणारा माणूस अहंकारी असतो. कारण अहंकार म्हणजे आक्रसलेलं व्यक्तिमत्त्व – पक्की गाठ. जो मृत्यूला घाबरलेला, तो आक्रसलेला, कारण जो घाबरतो, तो आकुंचित होतो, तो गाठ बनतो आतल्या आत, कॉंप्लेक्स निर्माण होतो. मी हा जो भाव आहे, तो घाबरणाऱ्या माणसाचा भाव आहे. आणि जो माणूस मरणात उतरतो, जो त्याला घाबरत नाही, पळत नाही, त्याला जगू लागतो, त्याचा 'मी' नष्ट होतो, अहंकार विलीन होतो. आणि अहंकार विलीन झाल्यावर जीवनच उरतं, फक्त जीवन. असंही म्हणू शकतो की, केवळ अहंकार मरतो, आत्मा मरत नाही. आम्ही केवळ अहंकार बनूनच राहतो, म्हणून मोठं कठीण जातं. अहंकारच मरू शकतो, त्याचाच मृत्यू आहे, कारण तो खोटा आहे. त्याला मरावंच लागेल. आणि आम्ही त्यालाच धरून ठेवतो.

समुद्रात लाटा येतात. अनेक लाटा, त्यातली एक लाट, जर तिला वाचायचं असेल, लाट म्हणूनच जगायचं असेल, तर ती नाही जगू शकणार. हां, जगू शकेल, जर तिचा बर्फ झाला तर. ठोस, आकसून गेली तरच, ती वाचेल. पण त्या वाचण्यातही लाट हरवली, बर्फ राहिला.

लक्षात ठेवा, लाट फुटत नाही, समुद्राशी एकरूप आहे. पण बर्फ तुटतो समुद्रापासून. वेगळा होतो. कठीण होतो. तर लाट समुद्राशी एकरूप होते, बर्फ वेगळा, अलिप्त झाला. आणि तो तरी किती काळ टिकेल? जमलेला बर्फ विरघळणारच आणि विरघळलेला बर्फ संपणारच.

पण जर लाटेने लाटेसारखंच स्वत:ला हरवंलं आणि जाणलं की, समुद्रच आहे, तर लाट हरवण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. मग ती हरवली तरीही आहे; नाही हरवली तरीही आहे. कारण तेव्हा तिला माहीत असतं की,

मी लाट नाहीये, मी समुद्रच आहे. जेव्हा लाट हरवते, तेव्हाही ती असते, विश्राम स्वरूपात आणि लाट जेव्हा येते, ती तेव्हा असते श्रमरूपात. श्रम ते विश्राम हा प्रवास सुखद आहे. जास्त सुखाचा आहे.

एक श्रम असतात आणि दुसरे विश्राम असतात. ज्याला आम्ही संसार म्हणतो, ते श्रम. आणि ज्याला आम्ही मोक्ष म्हणतो, तो विश्राम. अगदी लाटेप्रमाणे, वाऱ्याशी झुंजणारी, आदळणारी, त्रासलेली. आणि मग लाट निद्रिस्त झाली. आत्ताही आहे समुद्रात, पण आराम करत आहे. पण जर एखादी लाट स्वत:ला लाट समजू लागली, तर मात्र अहंकाराने भारली गेली, समुद्रापासून स्वत:ला तोडू इच्छिणारी, स्वत:चं अस्तित्व भिन्न जपू पाहणारी, 'मी' जपणारी. म्हणून 'मी' म्हणतो सर्वांपासून तोडून टाक स्वत:ला. आणि मजेशीर गोष्ट आहे की, तोडून दु:खच होतं. मग पुन्हा 'मी' म्हणतो. जोड स्वत:ला सर्वांशी. अशी मजेशीर वृत्ती आहे 'मी'ची. कारण तोडल्यानंतर दु:ख-मरण सुरू होतं. जसं लाट तोडते आणि नंतर बर्फ होऊन विरघळते. नष्ट होते, मरण येतं. जोपर्यंत ती समुद्राशी जोडलेली होती, तोपर्यंत मृत्यू नव्हता, कारण समुद्र मरत नाही.

लक्षात ठेवा, लाटेशिवायही समुद्र असतो, लाट समुद्राशिवाय असू शकत नाही. समुद्राशिवाय तुम्ही लाट आणू शकत नाही. पण लाटेशिवाय समुद्र? हो.

म्हणून मरणारा प्रेम करू इच्छितो. आम्ही सर्व मरणारे प्रेमासाठी इतके आतुरलेले असतो, कारण प्रेम जोडण्यासाठी असतं. म्हणून प्रेमाशिवाय जगण्यात मोठं दु:ख आहे. प्रेम हवं. कुणी द्या, कुणी घ्या. ज्यांना ते मिळत नाही, त्यांना फार कठीण पडतं. पण प्रेम म्हणजे काय, याचा विचार कधी केलात? प्रेमाचा अर्थ की, आम्ही जे त्या विशालतेशी असलेलं आमचं नातं तोडून टाकलं आहे, आता पुन्हा त्याला तुकड्या-तुकड्यांमधून जोडायचा प्रयत्न करत आहोत. म्हणून एक प्रेम ते आहे, जे आम्ही तुकड्या-तुकड्याने जोडण्याचा प्रयत्न करत आहोत आणि एक प्रेम ते आहे, जिथे आम्ही तोडण्याचा प्रयत्न बंद केला आहे, ज्याचं नाव प्रार्थना आहे.

म्हणून प्रार्थना जी आहे, ती पूर्ण प्रेमाचं नाव आहे. याचा अर्थ आम्ही तोडणं बंद केलं आहे. लाट म्हणाली की, मी समुद्र आहे. आता ती प्रत्येक लाटेशी स्वत:ला जोडण्याचा प्रयत्न करत नाहीये. लक्षात ठेवा, लाट स्वत:च मरत आहे, शेजारची लाटही मरत आहे. जर लाटेने लाटेशी संबंध जोडण्याचा प्रयत्न केला, तर कठीण अवस्था होईल.

म्हणून ज्याला आम्ही प्रेम म्हणतो, ते अत्यंत क्लेशकारक आहे. कारण लाट लाटेशी संबंध जोडते. दोन्ही लाटा मरणार. आणि दोघींना एकच आशा आहे की, कदाचित जोडलं गेल्याने आपण वाचू. म्हणून प्रेमाला आम्ही सुरक्षा बनवतो. म्हणून एकटं राहण्यात माणसं घाबरतात. बायको हवी, नवरा हवा, मुलं हवीत, आई-वडील-भाऊ-बहीण-मित्र-मैत्रिणी, समाज हवा, संघटन हवं, राष्ट्र हवं. अहंकाराचे प्रयत्न आहेत हे सगळे. ज्याने तोडलं, तो पुन्हा जोडण्याच्या प्रयत्नात आहे.

पण सगळे जोडण्याचे प्रयत्न मृत्यू आणत आहेत. कारण ज्याच्याशी आम्ही जोडले जात आहोत, तोसुद्धा मृत्यूने वेढला गेला आहे, तितक्याच अहंकाराने वेढला गेला आहे. आणि मजेशीर गोष्ट आहे की, तो आमच्याशी जोडला जाऊन अमर होऊ इच्छितो. आणि दोघांचाही धर्म मरण असा आहे. तर मग अमर कसं काय होणार? दुप्पट मृत्यू होऊ शकतो, अ-मृत अजिबातच नाही.

म्हणून दोन प्रेमी किती आशेवर असतात की, प्रेम अमर व्हावं, रात्रंदिवस गाणी गातात; अनंत काळापासून कविता लिहीत आहेत की, प्रेम अमर व्हावं. पण हे कसं शक्य आहे? दोन मरणधर्मांचा मृत्यू दुप्पट होऊ शकतो, आणखीन काही नाही.

लाटा संघटन करत आहेत. म्हणतात, आम्हाला चिरंजीव व्हायचं आहे. राष्ट्रं बनली आहेत, हिंदू-मुसलमान संप्रदाय निर्माण झाले. लाटाचं संघटन नष्ट होणार आहे, कारण केवळ समुद्र हाच एकमेव संघटित आहे. आणि समुद्राचं संघटन एक वेगळीच गोष्ट आहे. त्याचा अर्थ असा नाही की, लाट आपणहून सागराला जोडून घेते, याचा अर्थ असा की, लाटेला माहीत आहे की, मी वेगळी नाहीये. म्हणून मी म्हणतो की, धार्मिक व्यक्तीचं संघटन असू शकत नाही. ना कुटुंब, ना मित्र, ना बाप, ना भाऊ.

जीझसने काही कठोर व्यक्तव्य केली आहेत. खरंतर इतके कठोर शब्द तेच बोलू शकतात, ज्यांना प्रेम उपलब्ध झालं आहे. ज्याचं प्रेम नाजूक, दुबळं आहे, ते कठोर शब्द बोलू शकत नाहीत. एके दिवशी बाजारात अनेक माणसांच्या गराड्यात जीझस उभे होते आणि त्यांची आई मरियम त्यांना भेटायला आली. तर लोकांनी त्यांची वाट मोकळी करून दिली. कुणी ओरडत होतं, ''बाजूला व्हा, बाजूला व्हा. जीझसची आई येत आहे.'' तर जीझस आतून ओरडत राहिले की, जर जीझसच्या आईला वाट देत असाल, तर देऊ नका, कारण त्याची कुणीही आई नाही. मरियमला आश्चर्य वाटलं,

ती तशीच उभी राहिली. आणि जीझस त्या लोकांना म्हणाले की, जोपर्यंत तुम्ही आई-वडिलांना संपवत नाही, तोपर्यंत माझ्यापर्यंत पोचू शकत नाही.

अगदी कठोर आहे हे. आम्ही विचारही करू शकत नाही की, जीझससारखा प्रेमळ माणूस असं म्हणेल की, माझी आई नाहीये, कोण आई? मरियमला धक्का बसला. तशीच उभी राहिली. आणि जीझस म्हणत राहिले, ''तुम्ही या स्त्रीला माझी आई समजता? आई नाही कुणी. आणि लक्षात ठेवा, जर तुम्हाला आई आहे, तर तुम्ही माझ्याकडे येऊ शकणार नाही.''

काय प्रकार आहे? खरंतर लाट-लाटांचं संघटन असेल, तर कधी समुद्रापर्यंत जाऊ शकणार नाही. समुद्रापासून वाचण्यासाठीच लाटा संघटित होतात. एकटी लाट घाबरलेली असते की, हरवून तर जाणार नाही? तर पाच-दहा लाटा एकत्र आल्या, तर धैर्य वाढतं.

म्हणून माणूस गर्दीत जाणं पसंत करतो, एकटा घाबरतो. म्हणून संघटन, साखळी तयार करतो. बाप म्हणतो की, मी संपलो, तरी हरकत नाही, पुढे मुलगा आहे. माझं नाव राहील. म्हणून मुलगा नसेल, तर मोठं दुःख होतं. कारण अमरत्वाची खूण राहिली नाही. तो तर संपेल, पण त्याने दुसरी लाट तयार केली नाही, जी पुढे चालू राहील, जी कमीत कमी इतकं तरी सांगेल की, त्या लाटेतून जन्म झाला. ती लाट संपली, हरकत नाही, पण एक लाट मागे ठेवून गेली.

म्हणून, तुमच्या कधी लक्षात आलं असेल-नसेल, ज्या लोकांच्या जीवनात काही सर्जनात्मक गतीविधी असतात – जसं चित्रकार, संगीतज्ञ, कवी, लेखक – त्यांना मुलगाच हवा असण्याची इतकी काळजी नसते. याचं मूळ कारण असं आहे की, त्यांना मुलाचा सब्स्टिट्यूट मिळालेला असतो. त्यांचं चित्रं, गाणं, कविता, लेखन जिवंत राहतं. म्हणून वैज्ञानिक, चित्रकार, मूर्तिकार – मुलाची तेवढी आतुरतेने वाट बघत नाहीत. त्यांना एक मुलगा मिळाला आहे. त्यांनी एक लाट तयार केली, जी जिवंत राहील. आणि जास्त काळ टिकणारा मुलगा मिळवला. कारण जेव्हा तुमची मुलं नाश पावतील, तरी त्यांची कला जिवंत राहील.

म्हणून कलाकार जास्त काळजीत नसतात की, त्यांना मुलगा, संतती... त्यांची चिंता नसते. म्हणजे ते निश्चिंत असतात असं नाही. पण त्यांना मोठी लाट गवसलेली असते. म्हणून कुटुंबासाठी ते उत्सुक असतातच असं नाही. त्यांनी एक वेगळं कुटुंब तयार केलं. ते अमरत्वाच्या प्रयत्नात असतात,

आगामी

संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची



लेखक
डॉ. अनिल गांधी

या पुस्तकामुळे सामान्य वाचकांच्या आरोग्यविषयक सामान्य ज्ञानामध्ये मोलाची भर पडणार आहे. पुस्तकातील 'भविष्यातील आरोग्य व तंत्रज्ञान वेध २०५०' हे प्रकरण तर अफलातून आहे.
- डॉ. रघुनाथ माशेलकर

मानवी शरीर हे निसर्गाने निर्माण केलेले अजब यंत्र आहे. या यंत्रातील सर्व घटक चपखलपणे रचलेले आहेत, त्यांचे कार्य एकमेकांना पूरक आहे. पण काही वेळा त्यांच्या कार्यात अंतर्गत किंवा बाह्य कारणांनी विसंवाद – म्हणजेच आजार किंवा रोग – निर्माण होतो. पण त्यावरही माणसाचा मेंदू सतत उपाय शोधत असतो. पूर्वी जन्मजात अंधत्व किंवा मूकबधिर असणं हे प्रारब्ध म्हणून निमूटपणे स्वीकारले जायचे. आता त्यावरही शास्त्रज्ञांनी समाधानकारक तोडगा काढलेला आहे. तसेच हृदय, फुप्फुस, मूत्रपिंड, स्वादुपिंड किंवा यकृत या अवयवांना जेव्हा कमालीचे अपयश येते, तेव्हा एखाद्या गाडीचे सुटे भाग बदलावेत तसे अवयव-बदल करून मनुष्यास नवसंजीवनी बहाल केली जाते आहे. आता तर बुद्धिमान मानवाने मातेच्या उदरातील अर्भकामधील दोष पाहण्याची किंवा ते दोष शस्त्रक्रियेने दूर करण्याची स्वप्नवत कल्पनाही सत्यात उतरवली आहे. वैद्यकीय क्षेत्रात अशक्य वाटाव्यात अशा अनेक गोष्टी, आज मॉलेक्युअर बायॉलॉजी, जेनेटिक इंजिनिअरिंग, रोबॉटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या क्षेत्रातील प्रगतीच्या जोरावर मानवाने साध्य केल्या आहेत, आणि भविष्यातही यात उत्तरोत्तर प्रगती होतच जाणार आहे. अशा आश्चर्यचकित करणाऱ्या अनेक अनेक शास्त्रीय शक्यतांचा धांडोळा सहजसोप्या भाषेत या पुस्तकात घेतला आहे. उच्च तंत्रज्ञानाची ही नवसंजीवनी तुम्हाला अचंबित तर करेलच, पण विचारप्रवृत्त करायलाही भाग पाडेल!

म्हणून ते म्हणतात की, पैसा-अडका संपून जाईल, पण कला संपणार नाही. त्यांची तशीच आकांक्षा असते.

कलाही संपते. पण जरा जास्त काळ टिकते. किती कला, शास्त्र हरवलंय. हरवत आहेत. सगळंच हरवेल. खरंतर लाटेच्या जगात कितीही दूरपर्यंत लाट जावो, शेवटी ती हरवणारच. लाट म्हटलं की, ती हरवणार – काळाचा काही उपयोग नाही, मोठेपणाचा उपयोग नाही.

म्हणून मी लाट आहे, असं जर जाणलं, तर मरणापासून वाचायची इच्छा राहील. भीती राहील. मी म्हणतो की, मृत्यू बघा, पळू नका, घाबरू नका, वाचण्याचा प्रयत्न करू नका. आणि बघितल्याने तुम्हाला समजतं की, एका बाजूने असलेलं मरण, थोडं आत उतरलं की समजतं, की हे जीवन आहे. मग लाट समुद्र होते. मग संपून जाण्याची भीती राहत नाही. मग ती बर्फ होऊ इच्छित नाही. मग ती आकाशात नाचते, सूर्यप्रकाशात आनंदित होते. आणि जेव्हा विश्राम करते, तेव्हा विश्रामातही आनंदी असते. म्हणून ती जीवनात आणि मरणातही आनंदी आहे. कारण ती जाणते की, जे आहे, ते ना जन्म घेतं, ना मृत्यू पावतं. जे आहे ते आहेच, केवळ रूप बदलत राहतं, रूपं बदलत राहतात.

आम्ही सगळेच जण चेतन सागरात उठलेल्या लाटा आहोत. आमच्यापैकी अनेक जण बर्फ झाले आहेत. अहंकार कठीण दगडासारखा बर्फ आहे. किती आश्चर्यजनक गोष्ट आहे की, पाण्यासारखी तरल गोष्ट दगडासारखी बनते; जर तसं होण्याची आकांक्षा निर्माण झाली. चेतनेसारखी सरळ, तरल गोष्ट गोठते, अहंकार बनते, जर गोठण्याची आकांक्षा निर्माण झाली तर. आणि आम्ही सगळे गोठण्याच्या इच्छेने भरले गेलो आहोत. म्हणून आम्ही अनेक तऱ्हेचे उपाय करतो, गोठण्यासाठी.

पाण्याचा बर्फ होण्याचे काही नियम आहेत. माणसांचा अहंकार निर्माण व्हायचेही काही नियम आहेत. पाण्याला बर्फ होण्यासाठी थंड व्हायला लागतं, उष्णता हरवून टाकावी लागते. जितकं थंड, तितकं कठीण. माणसाला अहंकारी बनायचं असेल, तर त्यालाही थंड व्हावं लागतं. म्हणून आम्ही म्हणतो की, हॉट वेलकम! याचा अर्थ समजतो? स्वागत नेहमी गरम असतं. कोल्ड वेलकमला काही अर्थ नाही.

प्रेमाचा अर्थच उष्णता आहे. थंड प्रेमाला अर्थ नाही. प्रेम थंड असू शकतच नाही. खरंतर जीवन उष्णता आहे, आणि मरण थंडपणा! हा फरक समजून घेतला पाहिजे. मरण शून्य तापमानापेक्षा खाली इतकं थंड आहे.

आणि जीवन उष्ण! म्हणून सूर्याला जीवनाचं प्रतीक मानलं गेलं आहे. पहाटे तो उगवतो, तर जीवन सुरू होतं. फुलं फुलतात, पक्षी गाणी गातात...

ज्याला अहंकार हवा, त्याने थंड व्हायला हवं आणि त्यासाठी सर्व गोष्टींचा त्याग करावा लागतो, ज्या उष्णता देतात. जसं की प्रेम, घृणा थंडावा देत असेल, तर प्रेम सोडून द्यावं लागतं, घृणा आत्मसात करावी लागते. दया, सहानुभूती उष्ण, तर कठोरता, निर्दयता थंडावा...

जसा पाण्याला नियम आहे, तसाच माणसांनाही. नियम तोच – थंड होत जाणे. आम्ही म्हणतो ना, कधी कुणाला की, थंड डोक्याचा माणूस आहे! दगडासारखा.

लक्षात ठेवा, जितकी उष्णता जास्त, तितकी तरलता, जीवनाला एक गती, वाहणं. तर मग दुसऱ्यातही प्रवेश करता येतो, दुसरेही प्रवेश करू शकतात. पण थंड दगड – प्रवेश करता येत नाही, सर्वत्र बंद. ना कुठे तो प्रवेश करू शकतो, नाही त्याच्यात कुणी प्रवेश करू शकत. अहंकार साठला आहे आणि प्रेम पाणी होऊन वाहून गेलं. मजेशीर गोष्ट आहे की, मरणाला जो घाबरेल, पळेल; तो थंड होत जातो.

मी माझ्या मित्राच्या घरी काही दिवस राहत होतो. अतिशय श्रीमंत आहेत ते. पण एक गोष्ट समजल्यावर मी चकित झालो. ते कधीही कुणाशीही सरळ बोलत नसत. तसे ते चांगले आहेत. पण आतून हळवे, तर बाहेरून कठोर. नोकर थरथरत त्यांच्यासमोर. मुलगा, बायकोसुद्धा. त्यांच्या घरी जायचं, तर बाहेरची माणसं दहादा विचार करत.

जेव्हा मी त्यांच्या सहवासात होतो, त्यांना जवळून बघितलं, विचारलं, की हा काय प्रकार आहे? तुम्ही तर अगदी हळवे आहात. ते म्हणाले, ''मला भीती वाटते. कुणाशीही संबंध वाढवणं, संकट वाटतं. कारण संबंध वाढला, की आज ना उद्या ती व्यक्ती पैसे मागायला सुरुवात करणार. बायकोसमोर प्रेमाने राहिलो, तर तिचा खर्च वाढतो. मुलासमोर ताठ नाही राहिलो, तर त्याचा पॉकेटमनी वाढत राहतो. नोकरही मग मालकासारखे वागू लागतात. म्हणून एक भिंत चारही बाजूंनी उभारावी लागते, थंडपणाची, ज्यामुळे बायकोही घाबरेल आणि पोरगाही.''

कित्येक बाप असंच करतात. फारच कमी घरातून असं चित्र दिसतं की, बाप आणि मुलगा प्रेमाने गप्पा मारत बसले आहेत. मुलाला पैसे हवे असले, तर तो बापाकडे जातो आणि मुलाला काही उपदेश करायचा असेल, तर बाप मुलाकडे जातो. अन्यथा भेटणं होत नाही. बापाने एक भिंत उभी केली आहे

आणि मुलगाही घाबरलेला, त्याला टाळणारा. जितका माणूस घाबरट, तितका तो कडक. हा कडकपणा म्हणजे त्याची असणारी अशाश्वता.

म्हणून प्रेम करतानाही भीती असते. अगदी संपूर्ण तपासणी केल्यानंतरच प्रेम केलं जातं. म्हणजे ज्या माणसाची भीती वाटत नाही, ज्याच्यापासून काही धोका नाही, मग प्रेम. म्हणून अशी संस्कृती निर्माण झाली की, आधी लग्न करा, सर्व तरतूद करा, नंतर प्रेम करा. कारण प्रेम धोकादायक आहे. हळवं करणारं आहे, कुणातही प्रवेश करू शकतं. रस्त्यावरून जाणाऱ्या माणसावर प्रेम करणं धोकादायक आहे; कारण असं होऊ शकतं की, रात्रीला घरातलं सामान घेऊन पळून जाईल. म्हणून खातरी करून घ्या की, माणूस कोण आहे? काय आहे? त्याचे आई-वडील कोण आहेत? चरित्र कसं आहे? गुण काय आहेत? संपूर्ण सामाजिक सुरक्षितता करून घ्या, मगच घरात घ्या.

आम्ही घाबरणारी माणसं, आधी सुरक्षितता करून घेतो. आणि सुरक्षितता जितकी जास्त; तितकी कडक, थंड भिंत उभारली जाते सर्वत्र आणि ती व्यक्तिमत्त्वाला आकुंचित करते. आमचा परमात्म्याशी संबंध याच कारणाने जोडला गेलेला नाही. आम्ही तरल राहिलो नाही. आम्ही बर्फ झालो आहोत, दगड! आम्ही तरल झालो, तर विच्छेद विलीन होऊन जाईल.

आम्ही तरल तेव्हा होऊ, जेव्हा मृत्यू बघण्यास आणि तो जगण्यास मान्यता देऊ आणि स्वीकारू की मृत्यू आहे. मान्य करू की मृत्यू आहे, मग भीती कसली? मृत्यू जर आहेच, लाटेला माहीतच आहे की, संपायचं आहे. तिला समजलंय की, संपण्यातच असणं आहे, तिला समजतंय की, 'मी होते', तर मग बर्फ व्हायची आवश्यकताच काय? जितका काळ लाट आहे, जितका काळ समुद्र आहे – संपलं. सर्व स्वीकृत! या स्वीकारण्यानेच लाट समुद्र होते. मग सर्व चिंता नष्ट होतात, कारण लाटेला ठाऊक आहे की, संपण्यापूर्वीही मी होते आणि संपल्यानंतरही मी आहे. 'मी'च्या स्वरूपात नाही, असीम समुद्राच्या स्वरूपात!

मरताना लाओत्से म्हणाले... कुणी त्यांना म्हणालं की, तुमच्या जीवनाचं रहस्य सांगा. तर म्हणाले की, पहिलं रहस्य हे आहे की, जीवनात मला कुणी हरवू शकलं नाही. शिष्यांना उत्सुकता वाटली. ''हे तर तुम्ही कधी आम्हाला सांगितलं नाहीत. आम्हालाही जिंकावंसं वाटतं. आम्हालाही युक्ती सांगा.'' लाओत्से म्हणाले, ''तुम्ही चूक केलीत. मी काही वेगळं म्हणालो. मी म्हणालो की, मला कुणी हरवू शकलं नाही, आणि तुम्ही म्हणता की,

तुम्हालाही जिंकायचं आहे. या दोन्ही गोष्टी अगदी विरुद्ध आहेत. भाषेच्या माध्यमात सारख्या वाटतात की, जो हरला नाही, तो जिंकला. तुम्ही चुकीचं समजलात. तुम्ही निघा. तुम्हाला समजणार नाही.'' शिष्य म्हणाले, ''समजवा आम्हाला. युक्ती तरी सांगा की, तुम्ही हरला नाहीत?'' लाओत्से म्हणाले, ''मला कुणी हरवू शकलं नाही, कारण मी कायम हरलेलाच होतो. हरवण्यासारखं काही नव्हतंच, कारण मला कधी जिंकायचंच नव्हतं. खरंतर माझं युद्ध कधी सुरू झालंच नाही. कोणी युद्ध करायला आलं, तरी मी हरलेला होतो. त्या माणसालाही मला हरवण्यात काही गंमत वाटली नाही; कारण ज्याला जिंकायचं आहे, त्याला हरवण्यात मजा असते. ज्याला जिंकण्याची इच्छाच नाही, त्याला हरवण्यात काय हशील?''

खरं पाहता कुणा दुसऱ्याचा अहंकार तोडण्यात मजा येते, कारण त्याचा अहंकार तोडताना आपला अहंकार मजबूत होतो. पण अहंकारच नसेल... तर...? आमच्या अहंकाराला मग काही स्फूर्ती मिळत नाही. परंतु दुसऱ्याचा असलेला अहंकार तोडण्याने आमचा अहंकार बलवान होतो. जर मी कुणाला पाडायला जात असेल आणि मी पाडण्यापूर्वीच जर तो आडवा झाला, मी त्याच्या छातीवर बसण्याआधीच त्याने मला बोलावलं, बसवलं; तर काय अवस्था होईल? आणि मग तो हसतो, म्हणतो की बस, आराम कर, पळून का जातोस? तर मूर्ख कोण ठरेल?

तर लाओत्से म्हणाले, ''मला कुणी जेव्हा हरवायला आले, मी लगेचच बसलो, म्हणालो, या बसा. तुम्ही तसदी घेऊ नका, त्रासून जाऊ नका. आराम करा.

''पण तुम्ही वेगळी गोष्ट विचारत आहात. तुम्ही जिंकण्याची युक्ती विचारत आहात. तुम्ही जिंकण्याचा विचार केलात, की तुम्ही हरलात. जिंकू असा विचार करणारेच हरतात. विचार सुरू झाला तस की हरणं सुरू झालं.

''माझा कुणी कधी अपमान करू शकलं नाही, कारण मी मान-सन्मानाची कधी अपेक्षाच ठेवली नाही. पण तुमचा अपमान होत असणारच, कारण तुम्हाला तशी अपेक्षा असते.

''मला कधी कुठल्या स्थळातून, जागेवरून हाकललं गेलं नाही. कारण मी नेहमीच दाराबाहेर जिथे चपला ठेवतात, तिथे बसलो. मी नेहमीच शेवटी उभा असायचो की, त्याहून मागे जाता येणारच नाही, म्हणून कुणी मला हटवू शकलं नाही. त्यामुळे कायम आनंदात होतो, कारण शेवटी उभं राहिल्याने कोणत्याही गोंधळात पडलो गेलो नाही. कारण नाही कुणी हाकललं, ना

धक्का मारला, ना कुणी जागा रिकामी करायला लावली, कारण ती शेवटची जागा होती. या जागेवर कुणाला यावंसं वाटतही नाही. मी माझ्या जागेचा मालक होतो. ती जागा अंतिम होती.''

जीझसही म्हणतात की, धन्य आहेत ती माणसं, जी शेवटी उभं राहण्यात समर्थ असतात. याचा अर्थ काय? जीझस जसं म्हणतात की, कोणी एका गालावर थप्पड मारतंय, तर दुसरा गालही पुढे करा. याचा अर्थ काय? याचा अर्थ असा की, त्याला इतकाही त्रास देऊ नका की, तुमचा दुसरा गाल पुढे आणण्यास कष्ट घ्यावे लागतील, तुम्हीच करा. तो तुम्हाला हरवायला येतो आहे, तर तुम्ही लगेचच हार माना. एक बाजी हरवतो, तर दुसरी बाजी हरा. कोणी कोट खेचून घेतंय, तर शर्टसुद्धा द्या. कोणी मैलाच्या अंतरासाठी सामान नेण्यास सांगतंय, तर तुम्ही दोन मैलांनंतर विचारा की, पुढे तर न्यायचं नाही ना? याचा अर्थ काय? याचा अर्थ असा की, जीवनाची तथ्यं आहेत असुरक्षिततेची, पराजय, आणि शेवट मृत्यू; कारण ही तथ्यं मृत्यूच्या दिशेने नेणारी आहेत. शेवटी मृत्यू पूर्ण पराजय आहे. म्हणजे मोठ्यातल्या मोठ्या पराजयातही मी वाचतो, हरलेला. पण उरतो. पण मृत्यूत तर 'मी'सुद्धा वाचत नाही. मृत्यू सर्वांत मोठा पराजय आहे. म्हणून तर आम्ही शत्रूला मारून टाकू इच्छितो. त्यानंतर शत्रूच्या जिंकण्याची काहीही शक्यता नाही. शत्रूला मारून टाकण्याची इच्छा, शेवटची, संपूर्ण पराजय करून टाकण्याची इच्छा की बस, यानंतर त्याच्या जिंकण्याचा प्रश्नच नाही, कारण तो आता नाहीच.

मृत्यू अंतिम पराजय आहे आणि आम्ही त्याच्यापासून पलायन करू इच्छितो. जो आपल्या मृत्यूपासून पळतो, तो दुसऱ्याच्या मरणाचा प्रयत्न करत राहतो. जितकं दुसऱ्यांना मारेल, तितकं स्वत:चं अस्तित्व अनुभवेल. म्हणून जगात जितकी हिंसा होते, त्याचं कारण अगदी वेगळं आहे. हिंसेचं कारण असं आहे की, माणूस स्वत:चा मृत्यू विसरण्यासाठी दुसऱ्यांना मारू इच्छितो. असं केल्याने त्याला वाटतं की, मला आता कुणी मारू शकणार नाही. मीच तर स्वत: मारू शकतो...

★

आगामी









कसं बोललात!

मूळ लेखक
आर.के. लक्ष्मण

रूपांतर
अविनाश भोमे







ज़यंत बेंद्रे यांचे निधन

रंगकर्मी आणि लेखक जयंत बेंद्रे (वय ६३) यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुली व जावई असा परिवार आहे.

बेंद्रे यांचे शिक्षण नगर जिल्ह्यात झाले. महाविद्यालयात असताना अभिनेते सदाशिव अमरापूरकर यांच्यासमवेत त्यांनी काम केले होते. त्यानंतर किर्लोस्कर ऑइल इंजिन्स कंपनीमध्ये त्यांनी नोकरी केली. त्या वेळी अभिनेते मोहन जोशी यांच्यासमवेत त्यांनी विविध औद्योगिक नाट्यस्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला. त्यांचे 'मोरूची मावशी' हे नाटक गाजले. विविध नाट्यसंस्थांशी ते संलग्न होते. व्यावसायिक रंगभूमीवर त्यांनी 'नाथ हा माझा' व 'मोरूची मावशी' नाटकात भूमिका केल्या. साहित्यातही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.

'माणसं आणि माणसं' या कथासंग्रहासह मुकी बिचारी कुणीही हाका, भुताटकी, रुपयाभोवती दुनिया, उद्या पुन्हा हाच खेळ या एकांकिका गाजल्या. मोहन जोशी यांच्या नाट्य -चित्रपट जीवनप्रवासावरील 'नटखट' या पुस्तकाचेही त्यांनी लेखन केले. मैत्री ट्रस्ट संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक कार्यही केले.

विलास सारंग

मानवी अस्तित्वाचा अंश मूलभूत पातळीवर धुंडाळण्याची विलास सारंग यांची सर्जनशील प्रेरणा त्यांना तत्कालीन प्रस्थापित मराठी साहित्यातील आशयाकृतीबंधांच्या पलीकडे घेऊन गेली आणि ते त्या नव्या बेटावरचे एकटे, संतुष्ट आणि प्रसंगी वादग्रस्त रहिवासी बनले. ते बेस्टसेलर लेखक नव्हते आणि त्यांची कविता कोणी आपल्या हृदयवेदना सुखावण्यासाठी वापरावी अशी नव्हती. मर्ढेकर, कोलटकरांच्या काव्याच्या आकृतीबंधाच्या आणि आशयाविष्काराच्या वाटेवरून त्यांचा प्रवास सुरू झाला. गाडगीळ, गोखले, माडगूळकरांच्या नवकथेच्या परीघाबाहेरचे जग मराठीत आणण्यासाठी आवश्यक असलेल्या नव्या वाटा त्यांनी शोधल्या. त्यासाठी त्यांनी अतिवास्तववादातील प्रतिमांच्या आधारे आपला आशय घडवला आणि ते आधुनिक मराठी वाङ्मयाचे तसेच भारतीय इंग्रजी साहित्यातील महत्त्वाचा स्वर बनले. विलास सारंग यांनी नेहमी आपली ओळख द्विभाषिक लेखक म्हणून सांगितली आणि आपले सुप्त मन हे मराठी आहे हेही इंग्रजी वाचक, समीक्षकांपासून कधी लपवले नाही. म्हणूनच आपण आपली लेखनातील प्रयोगांची जोखीम पेलू शकतो, असे ते म्हणत. त्याच बरोबर, आपले साहित्य जगापुढे आणण्यात इंग्रजीचा हात असल्याचे वास्तव त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणेच स्पष्टपणे सांगितले. त्यांचा पिंड मराठी भाषेवर पोसला गेला होता आणि त्याला विस्ताराचे पंख इंग्रजीने आणि त्यांच्या वाट्याला आलेल्या इराक, बैरूत, कुवेतसारख्या वाकड्या

वाटांवरील मुक्कामांनी बहाल केले होते. त्यांच्या कथासाहित्यात म्हणूनच तोपर्यंतच्या केंद्रीभूत मध्यमवर्ग दिसत नाही आणि भावनेचे पदरही आढळत नाहीत. त्याजागी विस्मयकारक आणि बहुतांश धक्कादायक, परंतु पकडून ठेवणाऱ्या प्रतिमांचा खेळ दिसतो. त्यांनी भाषेतील शब्दांत आपले अस्तित्व ओतले आणि कथा, कादंबरी, कविता आणि समीक्षेतून सर्जनशीलतेच्या नवीन संभावना सांगितल्या. त्याचबरोबर स्थिरावत आणि संकुचित होत चाललेल्या मराठी साहित्याला जागवण्यासाठी आवश्यक तो आधुनिक धक्काही दिला. प्रसंगी, मराठीत स्वत:सकट तीनच कवी आधुनिक असल्याचे सांगून वादही निर्माण केले. समीक्षेच्या नवीन दृष्टिकोन प्रस्थापित करण्याऐवजी ती सर्जनशील आणि सौंदर्यपूर्ण व्हावी या हेतूने त्यात मापदंड आणण्यासाठी त्यांनी अक्षरांचा श्रम केला.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत सुमंत यांचे निधन

ज्येष्ठ विचारवंत, राजकीय विश्लेषक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. यशवंत सुमंत (वय ५८) यांचे ११ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर कोणताही धार्मिक विधी न करता वैकुंठ स्मशानभूमीतील विद्युत दाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉ. सुमंत गेल्या काही महिन्यांपासून आजारी होते. त्यांच्या पश्चात पत्नी माधुरी आणि धर्मकीर्ती व हर्षवर्धन ही मुले

असा परिवार आहे. डॉ. सुमंत यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी वैकुंठात आणल्यानंतर शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील मान्यवरांनी गर्दी केली होती. त्यात विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. वासुदेव गाडे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, डॉ. रावसाहेब कसबे, रामनाथ चव्हाण यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. यशवंत सुमंत यांनी जुलै १९७७ मध्ये मॉडर्न महाविद्यालयातील अधिव्याख्याता पदावरून शिक्षण क्षेत्रातील कार्याला सुरवात केली. १९८९ पासून ते पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागात कार्यरत होते. त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'गंगाधरशास्त्री जांभेकर पुरस्कार' (१९८९), महाराष्ट्र फाउंडेशनचा 'समाज गौरव पुरस्कार' (२००५) अशा विविध पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते. 'पोलिटिकल थॉट्स इन महाराष्ट्रा' हा प्रकल्प '१९९० ते १९९५ दरम्यान पूर्ण केला. तसेच, साधना, समाज प्रबोधन पत्रिका अशा नियतकालिकांमधून ते सातत्याने लेखन करत होते. 'महाराष्ट्रातील जाती संस्थाविषयक विचार', 'स्वामी विवेकानंद : साधक की हिंदुत्वाचे प्रचारक?' आणि 'ओळख स्त्रीवादाची' या पुस्तकांचे लेखन आणि संपादन केले होते.

वसंत लिमये यांचे निधन

भाषांतरतज्ज्ञ वसंत गोविंद लिमये (वय ९१) यांचे ७ एप्रिल रोजी निधन झाले. रशियनसह अन्य सोळा युरोपीय भाषांतर त्यांचे प्रभुत्व होते. लिमये यांनी आयआयटी, मुंबई येथे भाषांतर अधिकारी म्हणून काम केले. 'नटसम्राट' नाटकाचा लिमये यांनी 'द लास्ट सीन' या नावाने इंग्रजी भाषेत अनुवाद केला. त्यांनी १९७१ मध्ये मॉस्को नभोवाणी केंद्रावर मराठी वृत्तनिवेदक म्हणूनही काम केले. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात व संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातही सहभाग होता. त्यांची 'हेमंतातील लेनिनग्राड' व 'उघडा दरवाजा' ही पुस्तकेही प्रसिद्ध आहेत.

★

१०वी आवृत्ती

पुढाकार घ्या

प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र

लेखक
संजीव परळीकर

किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

पुढाकार घेतल्याशिवाय कोणालाही काहीही मिळत नाही. आयुष्यात काहीतरी मोठं मिळवायचं असेल तर पुढाकार घ्यावाच लागतो. परंतु पुढाकार घ्यायचा म्हणजे नक्की काय करायचं हेच कित्येकांना माहीत नसतं.

काही मंडळींना वाटतं की, पुढाकार म्हणजे दुसऱ्यांना रेटून पुढे जाणे. परंतु आपण जर दुसऱ्यांना रेटून पुढे गेलो तर आपल्यालाही रेटणारा कोणीतरी, कुठेतरी, कधीतरी जन्माला येतोच; त्यामुळे असला पुढाकार यश देत नाही आणि समजा दिलंच तर ते जास्त दिवस टिकत नाही आणि समजा टिकलंच तर असल्या पुढाकारानं आयुष्य तणावग्रस्त होतं.

कायमस्वरूपी यश मिळवायचं असेल, मन:शांती टिकवायची असेल, तणाव कमी करायचे असतील, कंटाळवाणं आयुष्य झटकून मजेत जगायचं असेल तर 'पुढाकार घ्या' हे पुस्तक वाचा.

त्यासाठीही पुढाकार घ्यावा लागेल.

हे पुस्तक तुम्हाला मित्रासारखं मार्गदर्शन करील.

माझी खात्री आहे की, तुम्ही हे पुस्तक एखाद्या गोष्टीच्या पुस्तकासारखं वाचून मित्राला देऊन टाकणार नाही; तर स्वत:ची प्रत जपून संग्रही ठेवाल व दुसरी प्रत कुणा गरजूला भेट द्याल.

दांडोबा राक्षस

एकदा का मी दुपट्यात शिरले की आई मला हलकेच थोपटते. हळू आवाजात गाणं गुणगुणते. मग, कसं कुणास ठाऊक, माझे डोळे जड होतात. मग, म..म..मला ग..ग.. गाढ झोप लागते!

पण जरासा जरी खुडबुड-कुडबुड, झँगपँग-चँगपँग आवाज आला, तरी माझी झोप चाळवते. मग मी पडल्या पडल्या, डोळे मिटल्या मिटल्या आवाजांशी खेळते.

काय? खरं वाटत नाही ना? मला वाटलंच होतं!

तुम्ही मनात म्हणत असाल, ''हॅ! काहीतरीच!! ह्या बब्बडला काय कळतं?''

अहो, 'लहान लहान मुलांनाच, मोठ्या मोठ्या गोष्टी माहीत असतात' हे 'नुसत्याच मोठ्या' माणसांना माहीतच नसतं! कळलं का?

हे बघा, आवाजाशी खेळायचं म्हणजे डोळे मिटून पाहायचं! हं! आता तुम्हाला वाटेल, 'ह्या बब्बडला वेड लागलं!' पण आधी माझं ऐका. मग काय ते ठरवा.

काल संध्याकाळी मी माझ्या खोलीत मस्त आराम करत होते. दूध प्यायल्यामुळे सुस्ती आली होती. जरा डोळा लागला होता.

इतक्यात कुणीतरी इतक्या जोरात धपा धपा पाळणा हलवला, की मी दचकून जागीच झाले! मला पंख्यासारखं गरगरलं! पोटातलं दूध डुचमळलं! सगळं शरीर थरथरलं!

काय झालं तेच मला कळलं नाही. जाग आली तरी माझे डोळे मिटलेलेच होते.

तोच, धावत जाणाऱ्या पावलांचा दाण-दाण-दाण असा आवाज ऐकू आला.

मग पाठोपाठ एका बाईचा आवाज, ''अरे ए दांडोबा, आत जाऊन तिला त्रास दिलास वाटतं? जरा एका जागेवर गप्प बैस. नाहीतर देईन धपाटा.''

'आमच्या घरात एक दांडोबा आला आहे. त्याच्यासोबत त्याची आई, काकू किंवा मावशी पण आहे.' पाळण्यात पडल्यापडल्या, डोळे मिटल्यामिटल्या हे मी ओळखलं!

नंतर बाहेरच्या खोलीतल्या टीव्हीचा आवाज एकदम मोठा झाला. मग धप् धप् असा टीव्हीपेक्षा मोठा आवाज ऐकू आला.

नंतर आपोआपच टीव्हीचा आवाज बंद झाला आणि घरात थोडा वेळ शांतता पसरली!

आता तुम्हालाही कळलं असेलच की, काय-काय झालं असणार?

पण खूप वेळ कुठलाच आवाज येई ना, तेव्हा मात्र मी जरा घाबरले.

हळूच डोळे उघडावे का? असा विचार करू लागले... कारण आवाज सुरू असला, की समजतं काय-काय चाललंय? पण आवाज थांबला की काही कळेनासंच होतं ना!

त्यात पुन्हा हा 'दांडोबा' आल्यामुळे, मला जरा जास्तच काळजी वाटायला लागली होती!

मी थोडी चुळबुळ केली. दुपट्यातल्या दुपट्यात सावरले. सावकाश डोळे उघडले...

आणि पहाते तर काऽऽऽऽय...?

आजपर्यंत मी माझ्या 'आडव्या आयुष्यात' पाहिला नव्हता, असा भयानक, खतरनाक चेहरा माझ्याकडे एकटक रोखून पाहात होता.

'निळा चेहरा, लाल डोळे, पिवळे सोनेरी केस, लाल जीभ!!'

अग आईऽऽऽऽऽऽऽगंऽऽऽऽ!!

मला किंचाळता येईना. हलता येईना.

मला वळता येईना. मला रडता येईना. आवाज फुटेना. माझी थुंकी उडेना.

माझे डोळे बंद होईनात. काय करावं, कळेना. काय झालंय कळेना. माझी वळवळ नाही. चळवळ नाही. मी गारेगार. मी थंडगार.

इतक्यात कुठूनशी एक बाई आली. पाळण्याजवळ थांबली.

मग 'धप् धप् धपाधप' असा आवाज आला. तो भयानक चेहरा पळाला. पळण्याचा दडा-दडा आवाज आला.

ती बाई माझ्याकडे पाहात म्हणाली, ''कित्ती गोड आहे ग छोटी! हा दांडोबा तिला घाबरवत होता.''

माझ्या डोक्यावरून हात फिरवत ती बाहेरच्या खोलीत पाहात म्हणाली, ''आधी फाडून टाक तो राक्षसाचा मुखवटा, नाही तर आणखीन चार धपाटे खाशील. अरे ही पेढ्यासारखी गोड आणि तिला तू घाबरवतोस? काही वाटतं की नाही तुला? अगंऽऽ पण तुझी बब्बड मात्र धीट हं! जाम घाबरली नाही!

''आरडा ओरडा नाही! हूं नाही की चूं नाही! खर्री खुर्री शहाणी मुलगी बब्बड!''

धावतच आई आली. मी कध्धीपासून आईची वाट पाहात होते.

आईला पाहताच माझ्या जीवात जीव आला! मला आवाज फुटला!

मी चुळबुळ सुरू केली. लाथा मारून दुपटं सैल केलं. आनंदानं फुर्र फुर्र करत थुंकी उडवली. डोळे मिचकावले. वळवळ चळवळ केली.

आईला सारं समजलं.

आई मला समजावत म्हणाली, ''बब्बड एक मिनिट थांब हं. आधी ह्या दोघांना सरबत देते, मग तुला घेते.''

आईनं घेण्याआधी त्या बाईनंच मला घेतलं.

मला खांद्यावर घेतलं. थोपटलं. डोळे मोठ्ठे करून माझ्याकडे प्रेमानं पाहिलं. मला बरं वाटलं. ही मावशी मला आवडली!

आई ट्रेमधून सरबत घेऊन आली. थंडगार रंगीत सरबताचे दोन मोठे ग्लास!

मावशीनं एका हातात सरबताचा ग्लास घेतला आणि... ही संधी साधून मी आईकडे झेप टाकली.

एका हातात ट्रे सावरत, आईनं मला कुशीत घेतलं.

आईच्या कुशीत बसून तो 'दांडोबा' कुठे दिसतो का ते मी पाहू लागले.

दांडोबा खाली मान घालून गुटुक गुटुक करत सरबत पीत होता.

आईच्या कुशीत असल्यानं मी दांडोबाकडे पाहून जोरात गुर्रऽऽ केलं. पण त्यानं माझ्याकडे पाहिलं पण नाही.



इतक्यात मावशी ओरडली, ''शीऽऽ दांडोबा, तुझ्या पँटवर झुरळ... झुऽऽऽरळऽऽऽ!!''

दांडोबा सॉलीड दचकला!! आणि... रंगीत सरबताचा ग्लास त्याच्या पँटवरच सांडला!!

दांडोबा घाबरून जोऽऽरात किंचाळला! खुर्चीतून उडी मारताना वेडावाकडा नाचला!

मावशी हसत हसत म्हणाली, ''अरे कमालच आहे! जरा गंमत केली तर एवढा घाबरलास! आणि घाबरून नाचलास?

''अरे ती बब्बड बघ. तिनं अगदी जवळून 'दांडोबा राक्षस' पाहिला! इतक्या लहान वयात 'असला राक्षस' पाहिला! पण ती अजिबात नाही घाबरली! तिनं यँव का त्यँव नाही केलं.

''आणि दांडोब्या, मी नुसतं 'झुरळ' म्हणताच तुझी पँट ओली झाली!

अरे दांडोब्या, आता ती बब्बड हसेल ना तुला!!??''

दांडोबानं हातातला रिकामा ग्लास खाली ठेवला. ओली पँट सावरत तो माझ्याकडे आला.

''काय ग बब्बड? तू हसणार मला?'' असं दांडोबानं म्हणताच, मी काही बोललेच नाही. मी फक्त त्याच्याकडे टुकुटुकु पाहात राहिले.

''अरे बघ, ती तुझ्या 'ओल्या पँटकडे' पाहतेय!'' असं मावशीनं म्हणताच दांडोबा लाजला! सुर्रकन पळाला.

माझ्या मनातलं आईनं बरोब्बर ओळखलं!

मला हलकेच चापटी मारत आई म्हणाली, ''गप गं बब्बड. वात्रट कुठली!''

दांडोबा कुरकुरत म्हणाला, ''आता मी ओल्या पँटनं घरी कसा जाऊ?''

मावशी हसून म्हणाली, ''चल, आता आपण रिक्शानंच जाऊ.''

मावशी आणि दांडोबा गेल्यावर आईनं माझं भिजलेलं दुपटं बदललं.

पाळणा जोरात हलला तेव्हा मी जाम घाबरले होते. पण त्यानंतर कशीबशी सावरले होते. तो भयानक दांडगोबा राक्षस पाहिल्यावर मात्र मी दुपटं भिजवलं होतं!

आई मला जवळ घेत म्हणाली, ''अगं वेडाबाई, मला हाक नाही का मारायचीस? मी नसते का आले लगेच! बरं असू दे.

अगं, त्या मावशीला कळलंच नाही की तू सूसू केली आहेस!

लब्बाड!!''

इतक्यात दारावरची बेल वाजली.

दारात धापा टाकत दांडोबा उभा!

आईनं त्याच्याकडे पाहत भुवया उंचावल्या!

मला कळेना, आता हे काय झालं?

दांडोबा तोंड वेडंवाकडं करत आणि पँट सावरत आईला म्हणाला, ''काकू... काकू... आई गेली चालत. पण मी कसा जाणार चालत?

''काकू... काकू... आज रिक्शा बंद आहेत म्हणून. जरा पंखा जोरात लावा ना!!''

आई आणि मी दांडोबाकडे पाहातच राहिलो.

दांडोबा लाजत लाजत म्हणाला, ''काकू... मी तासभर तुमच्याकडेच थांबतो. पंख्याखाली बसतो. पँट वाळली की घरी जातो!!''

हे ऐकल्यावर मात्र मी जोऽऽऽरात हसले, ''फुर्रऽऽऽ फुर्रऽऽऽ फूऽऽऽ''



नवे कोरे

लेखिका
मलाला युसूफजई

सहलेखिका
क्रिस्टिना लॅम्ब

अनुवाद
सुप्रिया वकील

सचिन तेंडुलकर याच्या 'प्लेइंग इट माय वे' या आत्मचरित्रपर मराठी अनुवादाच्या मुखपृष्ठाचे अनावरण करताना, (डावीकडून) मा. सुनिल मेहता, अनुवादक दीपक कुळकर्णी व मा. अनिल मेहता.

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 May. 2015 Posting Date : 11 May. 2015

आमची नवीन पुस्तके













BOOK POST
Printed Matter

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.